भालचंद्र नेमाडे



भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार

# त्रिवेणी

सन २०१४-२०१५

मराठी

**संपादन समिती**

अध्यक्ष :
प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे

संपादक :
प्रा.डॉ.तानाजी पाटील

विभागीय संपादक :
प्रा.सुहास निर्मळे (मराठी)
प्रा.डॉ.वंदना मोहिते (हिंदी)
प्रा.श्रीमती लतिका पाटील (इंग्रजी)
प्रा.डॉ.अभय पाटील (सामाजिक शास्त्रे)
प्रा.श्रीमती मनिषा माळी (अहवाल)

रयत शिक्षण संस्थेचे,

## सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज

ता.कराड, जि.सातारा - ४१५ १०९

# त्रिवेणी

सन २०१४-२०१५

*All Human Beings Are Born Free And Equal in Dignity*



## ॥ कर्मवीर जयंती सोहळा ॥



भित्तिपत्रकाचे उद्घाटन करताना प्रभारी कुलगुरू मा.डॉ.अशोक भोईटे



रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन करताना मा.सचिव प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर



प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देताना प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना मा.सचिव प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर



सौ.मंगलताई जगताप यांचा सत्कार करताना मा.सचिव प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर



अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रभारी कुलगुरू डॉ.अशोक भोईटे



रयत शिक्षण संस्थेचे,

# सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज

ता.कराड, जि.सातारा - ४१५ १०९

२०१४-२०१५

# त्रिवेणी

### संपादक समिती

- अध्यक्ष
  प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे
- संपादक
  प्रा.डॉ.तानाजी पाटील
- विभागीय संपादक
  प्रा.सुहास निर्मळे (मराठी)
  प्रा.डॉ.वंदना मोहिते (हिंदी)
  प्रा.श्रीमती लतिका पाटील (इंग्रजी)
  प्रा.डॉ.अभय पाटील (सामाजिक शास्त्रे)
  प्रा.श्रीमती मनिषा माळी (अहवाल)
- विद्यार्थिनी प्रतिनिधी
  मनिषा धाडगे बी.ए.भाग ३



## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- विद्यार्थिनी संख्या ३२९
- विद्यापीठापेक्षा महाविद्यालयाचे निकाल अधिक
- विद्यार्थिनींच्या बौध्दिक व व्यक्तिमत्व विकासाचे अनेक उपक्रम
- मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास व समाजशास्त्र इ. स्पेशल विषय
- विविध शॉर्ट टर्म कोर्सेस
- अद्ययावत संगणक प्रयोगशाळा
- कर्मवीर विद्याप्रबोधिनी
- स्पर्धा परिक्षा केंद्र
- इंग्लिश स्पिकींग कोर्स
- सुसज्ज महिला वसतिगृह
- ज्युडो, कराटे प्रशिक्षण
- ह्यूमन राईटस् एज्युकेशन फाऊंडेशन कोर्स
- फॅशन डिझाईनिंग कोर्स
- ट्रॅव्हल्स् ॲण्ड टूरिझम कोर्स
- कलादालनद्वारे मुलींच्या सुप्त गुणांना वाव



२०१४-२०१५
त्रिवेणी


त्रिवेणी
दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स नियम ८,
फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती

- प्रकाशन स्थळ :
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज
- प्रकाशन काल : वार्षिक
- प्रकाशक : प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे
- राष्ट्रीयत्व : भारतीय
- पत्ता : सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
- दूरध्वनी : (०२१६४) २६४२३५
- ईमेल : rssmmuks@yahoo.co.in
- संपादक : प्रा.डॉ.तानाजी पाटील
- राष्ट्रीयत्व : भारतीय
- पत्ता : सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज, ता.कराड, जि.सातारा
- मोबा : ९४२०६२८७१५
- मुद्रक : श्री.संदेश शहा
- राष्ट्रीयत्व : भारतीय
- पत्ता : २६७ ब/२, दौलतनगर, सातारा
- फोन : (०२१६२) २३४०४९
- मालकी : रयत शिक्षण संस्थेचे, सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय उंब्रज, ता.कराड, जि.सातारा

मी प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे असे जाहीर करतो की, वर नमूद केलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.
■ प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे

या अंकातील साहित्यातून व्यक्त झालेली मते संबंधित लेखकांची आहेत. संपादक मंडळ त्या मतांशी सहमत असेलच असे नाही.






२०१४-२०१५
त्रिवेणी

दिव्य अलौकिक तुमचे जीवन
स्मृतीस तुमच्या शतशः वंदन !



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक

**पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पायगोंडा पाटील (डी.लिट)**

पूर्ती आकांक्षा अन् आशा
गुणगुणती या दाही दिशा



रयत माऊली
**सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील**

रयत शिक्षण संस्थेचे
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज

## • पदाधिकारी •

निश्चयाचा महामेरू ।
बहुत जनांचा आधारू ॥



मा.नामदार शरदचंद्रजी पवार
अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.ॲड.रावसाहेब शिंदे
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा
(दि.२६ जानेवारी २०१५ पर्यंत)



मा.डॉ.अनिल पाटील
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.प्राचार्य डॉ.डी.डी.पाटील
सहसचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.प्राचार्य शहाजी डोंगरे
ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा

## • महाविद्यालय स्थानिक सल्लागार समिती •



मा.डॉ.अनिल पाटील
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.प्रिं.डॉ.गणेश ठाकूर
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.श्री.द.श्री.जाधव



मा.श्री.शिवाजीराव कुलकुटे



मा.श्री.सुधीर जाधव



प्रा.रामचंद्र यादव



प्रा.डॉ.तानाजी पाटील



प्रा.श्रीमती आशा महावी



श्री.अशोक खराडे



प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे

त्रिवेणी
रयत शिक्षण संस्थेचे
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज

## ।। महाविद्यालयाचे कुशल व अभ्यासू नेतृत्व ।।




मा.प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे

## ।। आमचे संशोधनप्रिय प्राचार्य व प्राध्यापक वर्ग ।।



प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे
आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये
शोधनिबंध प्रसिद्ध



प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे
आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात जपान
येथे शोधनिबंध सादर



प्रा.डॉ.अभय पाटील
शिवाजी विद्यापीठाची एम.फिल
ची गाईड शिप



प्रा.डॉ.तानाजी पाटील
आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये
शोधनिबंध प्रसिद्ध



प्रा.लालासाहेब पवार
आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये
शोधनिबंध प्रसिद्ध



प्रा.श्रीमती आशा महावी
आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये
शोधनिबंध प्रसिद्ध



प्रा.बद्रीनाथ ढाकणे
आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये
शोधनिबंध प्रसिद्ध

## ।। विद्यार्थिनी मंडळ व आमचे गुणवंत ।।

विद्यापीठ प्रतिनिधी


मनिषा घाडगे : बी.ए.भाग ३


ज्योती जगदाळे : बी.ए.भाग २


रहिना मुलाणी : बी.ए.भाग १


पूजा यादव : बी.ए.भाग २


अपर्णा यादव : बी.ए.भाग २


उज्वला मोरे : बी.ए.भाग ३


मेघा जांभळे : बी.ए.भाग ३


विश्रांती कांबळे : बी.ए.भाग १


रहिना मुलाणी : इ.१२ वी


ज्योती जगदाळे : बी.ए.भाग १


मनिषा घाडगे : बी.ए.भाग २


दिपाली माळी : बी.ए.भाग ३

## ।। एन.एस.एस.विभाग ।।


विशेषश्रम संस्कार शिबीरार्थींना मार्गदर्शन करताना
मा.आमदार बाळासाहेब पाटील


विशेषश्रम संस्कार शिबीरार्थींना मार्गदर्शन करताना
मा.प्राचार्य डॉ.मोहन राजमाने


विशेषश्रम संस्कार शिबीरामध्ये
प्रास्ताविक करताना
मा.प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



## प्राचार्यांचे मनोगत

महाविद्यालयाचा एकूणच परिसर विविध झाडा-फुलांनी जेवढा नटलेला, बहरलेला आणि फुललेला असतो त्याहीपेक्षा कितीतरी पटीनं तिथे वावरणाऱ्या तरूणाईनं बहरलेला असतो. कल्पनेत रंगवलेलं जीवन व वास्तवातलं आयुष्य यातल्या सीमारेषा अधिक गडद होण्याचं हे वय असतं. अनुभव, समजुती आणि प्रचिती या सर्वांमधलं द्वंद्व समजून घेण्याचं हे वय. घर, समाज आणि महाविद्यालयातील पोषक वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता असते आणि त्यादृष्टीने ही तरूणाई पावले उचलत असते. ही तरूणाई पूर्वग्रहरहित असल्याने ती मनाने प्रांजळ व नितळ असते. अशा अनघड तरूणाईला एक सुंदर घाट देण्याचा प्रयत्न आमचं महाविद्यालय सतत करीत असतं.

विद्यापीठ सिलॅबस, अध्यापन, महाविद्यालयीन परीक्षा आणि विद्यापीठीय परीक्षा इत्यादींच्या पलीकडे विद्यार्थीनींसाठी खूप काही करणं आवश्यक ठरतं. विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्त्वातल्या बलस्थानांची जाणीव, कर्तव्यबुद्धी, राष्ट्रीयत्वाची भावना, विवेकवादी विचारांची रूजवण, बंधुभाववृद्धी, सामाजिक जाणीव, सलोखा, मानवतावादी दृष्टिकोन, पर्यावरणविषयक जाणीव, विज्ञानवादीवृत्ती, स्त्री-पुरूष समानतेचा विचार आणि करिअर संबंधी जागरूकता इत्यादींसाठी आम्ही जाणीवपूर्वक उपक्रम राबवितो. हे सर्व उपक्रम राबविताना विद्यार्थीनींमध्ये प्रत्यक्ष काय फरक पडतो का याचं मॉनिटरींग करतो. तसेच 'योगा', 'पत्रकारिता', 'ट्रॅव्हल टूरिझम' हे तीन कोर्स जून २०१५ पासून चालू करणार आहोत. लेडीज होस्टेल पूर्णत्वाच्या मार्गावर व वाणिज्य शाखा काढण्याचे नियोजन.

स्पर्धा परीक्षा, वाङ्मय मंडळ, भित्तीपत्रकं, शॉर्ट टर्म कोर्सेस, काव्य लेखन स्पर्धा आणि अग्रणी महाविद्यालया अंतर्गत विविध व्याख्याने इत्यादी उपक्रम केवळ नाविण्यपूर्ण नाहीत तर विद्यार्थीनींच्यात मूल्यांचं संस्करण होण्यास कारणीभूत ठरतात. स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन समितीच्या वतीने तज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रा.भास्करराव कदम, प्रा.संतोष पोरे, प्रा.विकास येलमार,डॉ.निळकंठ लोखंडे,डॉ.शिवाजी पाटील, श्री.तुकाराम जगदाळे,श्री.राजकुमार यादव,प्रा.एस.डी.पवार,प्रा.विनोद पिसाळ आणि प्रा.व्ही.डी.पाटील तसेच हिंदी दिवस समारंभ प्रसंगी डॉ.दिलीपकुमार कसबे, ह्यूमन राईटस् कार्यक्रम प्रसंगी डॉ.गेल ऑमवेट (U.S.A), प्राचार्य डॉ.पूजा नरवाडकर, श्री.भारत पाटणकर कुलगुरू डॉ.एन.जे.पवार, प्रकुलगुरू डॉ.अशोक भोईटे व विजया दहिफळे तसेच अग्रणी

महाविद्यालय अंतर्गत कार्यक्रमासाठी डॉ.दिपा पाटील, डॉ.शिवाजीराव पाटील आणि वाङ्मय मंडळ उद्‌घाटन प्रसंगी डॉ.शिवाजीराव ठोंबरे, डॉ.शिवाजीराव होडगे अशा अनेक मान्यवरांची व्याख्याने विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी राबवली आहेत.

महाविद्यालयाच्या प्रगतीचा व कल्पक उपक्रमांचा प्रभाव उंब्रज व उंब्रज परिसरात निश्चित झाला आहे; त्यामुळेच विद्यार्थीनींच्या संख्येत आता लक्षणीय वाढ झाली आहे. महाविद्यालयातील अभ्यासू, उपक्रमशील, संशोधनमग्न प्राध्यापक वर्ग आमचे खरे ॲसेट आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थीनींसाठी ज्यूडो कराटे, बॉक्सिंग सारखे कोर्स चालू करून विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना दिली. या सर्वांमध्ये आमचे प्राध्यापक कमी नाहीत. आज ५ पीएच.डी, ५ एम.फिल्. आणि ४ सेट/नेट तसेच विद्यापीठाच्या विविध कमिट्यांवर प्राध्यापक कार्यरत आहेत.

यु.जी.सी कडून १२व्या योजनेअंतर्गत महाविद्यालयास विविध योजनांतर्गत आर्थिक मदत मिळविलेली आहे. सन २०१४-२०१५ या वर्षात महाविद्यालयास जनरल डेव्हलपमेंट असिस्टंटस योजनेतंर्गत रूपये ३१,८४,५००/- मंजूर झाले असून त्यापैकी प्रत्यक्ष रूपये ४,२०,०००/- मिळालेले आहेत. महाविद्यालयाला विविध अद्यावत साधने व उपकरणे घेण्यासाठी या पैशाची मदत होणार आहे. तसेच 'फॅशन डिझायनिंग कोर्स' सुरू करण्यासाठी रूपये ७,००,०००/- मंजूर झालेले आहेत. 'ह्यूमन फाऊंडेशन कोर्स' साठी रूपये २,५०,००० मंजूर झाले असून त्यापैकी रूपये २,३५,०००/- मिळाले आहेत. 'IQAC' साठी रूपये ३,००,०००/- मंजूर झाले असून त्यापैकी रूपये २,७०,००० मिळालेले आहेत.

क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच काव्यवाचन, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि एन.एस.एस. मध्ये विद्यार्थीनींनी चांगले यश मिळविले आहे. केवळ परिक्षेतील यश हे नोकरीसाठी पुरेसे ठरत नसल्याने विविध कोर्सचे नियोजन करण्यात आले. विद्यार्थीनींना स्वतःच्या पायावर उभे राहता येईल असे अल्प मुदतीचे व्यवसायपूरक कोर्सेस दिले आहेत.

बहुआयामी, सजग, समर्थ व सक्षम पिढी घडविण्यासाठी आमचे प्राध्यापक, प्राध्यापिका, शॉर्ट टर्म कोर्स व ज्युडो, कराटे, बॉक्सिंगचे शिक्षक-शिक्षिका व प्रशासकीय सेवक वर्ग हरेक प्रयत्न करीत असतात. हा अंक म्हणजे महाविद्यालयाच्या आंतर्बाह्य स्वरूपाचं जणू प्रतिबिंबच !

महाविद्यालयाच्या प्रत्येक विकास कामात हाकेला प्रतिसाद देणाऱ्या उंब्रज व उंब्रज परिसरातील असंख्य मान्यवरांना माझा कृतज्ञापूर्वक नमस्कार !


**डॉ.कैलास जगदाळे**
प्राचार्य,
सौ.मं.रा.जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज


## संपादकीय



रसिक हो, नमस्कार.

पूजनीय डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील व सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करून 'त्रिवेणी' २०१४-२०१५चा अंक आपल्या हाती सुपूर्द करताना मला मनस्वी आनंद होत आहे.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या अथक प्रेरणेतून स्थापन झालेल्या रयत शिक्षण संस्थेने सन १९६९ साली उंब्रज ता. कराड या ठिकाणी महिला महाविद्यालय सुरू केले. या महाविद्यालयाची पंचवीस वर्ष पुर्ण झाली आहेत. आज आमचे महाविद्यालय अनेक सुविधांनी परिपूर्ण आहे. विद्यार्थीनी स्वतःच्या पायावर उभी राहावी यासाठी अनेक शॉर्ट टर्म कोर्सेस चालू केले आहेत. यामध्ये कुकरी, शिलाई मशीन, बालवाडी शिक्षक प्रशिक्षण कोर्स, ब्युटी पार्लर, स्पोकन इंग्लिश, ज्युडो, कराटे, स्पर्धा परीक्षा, परीक्षा मार्गदर्शनपर कोर्स असे अनेक कोर्सेस उपलब्ध करून विद्यार्थीनींच्या सर्वांगीण विकासासाठी कॉलेज कटिबद्ध आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास जगदाळे साहेब यांच्या प्रेरणेतून जून २०१५ पासून 'ग्रामीण पत्रकारिता' व 'ट्रॅव्हल आणि ट्यूरिझम' असे नवीन कोर्सेस सुरू करून महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये अधिकच भर पडणार आहे. आज महाविद्यालयात एकूण ३५० विद्यार्थीनी उच्च शिक्षण घेत आहेत.

'त्रिवेणी'च्या अंकात अनेक विषयावरील वैविध्यपूर्ण लेखांचा समावेश केला आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि सामाजिक शास्त्रे या भाषांमधील लिखाणातून एक वेगळा ठसा इथे उमटतो आहे. त्याचबरोबर सतत यशाची चढती कमान ठेवणारे आमचे वार्षिक अहवाल म्हणजे एक यशोगाथाच होय. आमच्या प्राध्यापकांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे. आज आमच्या महाविद्यालयात ५ डॉक्टरेट, ५ एम.फिल आणि ४ सेट/नेट तसेच संशोधनपर मायनर प्रोजेक्ट, नॅशनल, इंटरनॅशनल पेपर अशा विविध गुणांनी परिपूर्ण आमचे प्राध्यापक विद्यापीठाच्या विविध कमिट्यामधून काम करीत आहेत याचा फायदा आमच्या विद्यार्थीनींना होत आहे.

'त्रिवेणी' नियतकालिक कसे असावे, त्याचा दर्जा कसा असावा, रंगीत पाने कोणती असावीत तसेच लेख, कविता यांचा दर्जा विद्यापीठ पातळीवर कसा असावा, मुखपृष्ठ या सर्व बाबतीत मा. प्राचार्य डॉ. कैलास जगदाळे साहेबांनी आम्हांस मार्गदर्शन केले आहे. त्यांची निरिक्षण शक्ती या अंकात आम्हांला खूप उपयोगी पडली आहे. तसेच विद्यार्थीनींचा सर्वांगीण विकास हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन शिक्षक, पालक व समाज या सर्व घटकामध्ये सुसंवाद साधला जावा यासाठी प्राचार्य जगदाळे साहेब यांच्या प्रेरणेने व कुशल मार्गदर्शनाने महाविद्यालयात या वर्षी विविध उपक्रम राबविण्यास आले. यामध्ये पालक मेळावा, महिला मेळावा, व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा, अग्रणी महाविद्यालयाच्या अंतर्गत विविध कार्यशाळा, स्पर्धा परीक्षा, पत्रकार दिन, हिंदी दिन, कर्मवीर जयंती, वाङ्मय मंडळ, वार्षिक क्रिडा स्पर्धा, विशेष श्रमसंस्कार शिबीर, सांस्कृतिक कार्यक्रम, शॉर्ट टर्म कोर्सेस, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आणि श्रावणी काव्य संमेलन इत्यादी उपक्रमांचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.

९ सप्टेंबर २०१४ रोजी दहिवडी कॉलेज दहिवडी येथे संपन्न झालेल्या 'युवा महोत्सवा'मध्ये आमच्या विद्यार्थीनींनी 'लोककला' स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षिस मिळून कॉलेजची शान राखली आहे. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे विद्यार्थीनींच्या अंगी असणाऱ्या कला गुणांना वाव देऊन उत्तम कलाकार निर्माण करण्याचे आदर्श कार्यही महाविद्यालय करीत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून श्रमदान, ग्राम स्वच्छता, वृक्षारोपन, रक्तदान, एड्स जनजागृती, पशुचिकित्सा, गाव सर्वेक्षण अशा विविध उपक्रमात आमच्या विद्यार्थीनी सतत सहभागी असतात. यावर्षी दिनांक २०/१२/२०१४ ते २६/१२/२०१४ या कालावधीत मौजे कवठे ता. कराड येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबीरात ५० विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या.

आमच्या विद्यार्थीनी साहित्याच्या क्षेत्रातही मागे नाहीत. विद्यार्थीनींच्या साहित्यिक मनाला फुंकर घालून त्यांच्या मनात साहित्यिक बीज अंकुरण्याच्या कामी भितीपत्रकाचा सिंहाचा वाटा आहे. कविता, लेख, विनोदी चुटके, समीक्षापर लेख, चरित्रात्मक लेख, ऐतिहासिक लेख आणि विज्ञानपर लेख, पेन्सिल रेखाटने, वात्रटिका अशा विविध विषयावरचे लेख भितीपत्रकाच्या माध्यमातून प्रसिद्ध करण्यात आले.

सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात देश, राज्य व विविध संस्थांमधील मान्यवर, कलावंत, साहित्यिक, प्राध्यापक, कर्मचारी तसेच रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन ॲड.रावसाहेब शिंदे, माजी उपमुख्यमंत्री आर.आर.पाटील (आबा), मा.कॉ.गोविंद पानसरे, डॉ.वसंत गोवारीकर,खासदार गोपीनाथजी मुंडे, खासदार सदाशिवराव मंडलीक, माजी उपमुख्यमंत्री ए.आर.अंतुले, सिनेअभिनेता सदाशिव अमरापूरकर तसेच धारातीर्थी पडलेले जवान, यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली !!

रसिक वाचक हो, या वर्षीचा 'त्रिवेणी' २०१४-२०१५ हा अंक मुखपृष्ठापासून ते मलपृष्ठापर्यंत अवलोकनीय व वाचनीय झालेला आहे. अंकाची मांडणी ही आकर्षक अशी झालेली आहे. विद्यार्थीनींनी परिश्रमपूर्वक साहित्य निर्मिती केलेली आहे. यामध्ये कथा, कविता, ललित लेख, वैचारिक लेख, विनोदी लेख, मुलाखत अशा विविध व दर्जेदार साहित्य प्रकारांचा समावेश झालेला आहे. त्याचबरोबर श्रद्धांजली, विभागीय अहवाल, वैयक्तिक अहवाल, स्थानिक व्यवस्थापन समिती, सल्लागार समिती, सेवक वर्ग, विद्यार्थीनी मंडळ, मान्यवर व विविध उपक्रमांचे फोटो इत्यादी विविध सामग्रीने हा अंक नटलेला आहे. हा 'त्रिवेणी' २०१४-२०१५ हा अंक आपल्या हाती देताना आम्हांला मनापासून आनंद होत आहे. या अंकासाठी महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. कैलास जगदाळेसो।, सर्व सहसंपादक, प्राध्यापक वर्ग, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, शिक्षकेत्तर सेवक वर्ग आणि लेखन करणाऱ्या आमच्या गुणी विद्यार्थीनी तसेच प्रिंट ओम ऑफसेट, सातारा येथील मा.श्री. संदेश शहा, मा.श्री. जतीन शहा, टाईप इनोव्हेटर्सचे मा.श्री. प्रशांत गुजर या सर्वांनी घेतलेल्या प्रामाणिक परिश्रमामुळेच हा अंक परिपूर्ण व वेळेवर प्रसिद्ध होत आहे. याबद्दल सर्वांचे मनापासून व कृतज्ञतापूर्वक आभार. महाविद्यालयाच्या उज्ज्वल भविष्याची आकांक्षा मनात बाळगून संपादकीय मनोगतास इथेच अल्पविराम देतो. धन्यवाद......!

जय हिंद, जय कर्मवीर !

प्रा. डॉ. तानाजी ज्ञा. पाटील
संपादक

# त्रिवेणी
## २०१४-२०१५

## मराठी विभाग

'ना तरि बाळक, बोबडां बोलीं ।
कां वाकुडां विचकां पांउली ।
चोज करूंनि माउली ।
रिझेवि जेवि ।।६।।

।। ज्ञानेश्वरी नववा अध्याय ।।
।। ओवी क्र.६ ।।

विभागीय संपादक
प्रा.सुहास निर्मळे

# अनुक्रमणिका


गद्य विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| १) शब्दसूर्य मावळला : नामदेव ढसाळ | कु.अपर्णा यादव | बी.ए.भाग-२ | ९ |
| २) आदर्श राजमाता जिजाबाई | कु.शैलजा थोरात | बी.ए.भाग-१ | ९ |
| ३) नोबेल ललना | कु.रश्मी जाधव | बी.ए.भाग-३ | १३ |
| ४) प्रशासनातील कर्तृत्वशालिनी अधिकारिणी | कु.स्वाती कोळेकर | बी.ए.भाग-३ | १७ |
| ५) सन्मान | कु.ज्योती कदम | बी.ए.भाग-१ | २० |
| ६) आजच्या युवकांसाठी यशवंतराव चव्हाणांचे विचारधन | कु.अपर्णा यादव | बी.ए.भाग-२ | २१ |
| ७) औंधची सुकन्या : कादंबरी यादव | कु.संजीवनी शिंदे | बी.ए.भाग-२ | २६ |
| ८) तरुणाईच्या वाटेवर | कु.संजीवनी शिंदे | बी.ए.भाग-२ | २७ |
| ९) पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील | कु.सुप्रिया घाडगे | बी.ए.भाग-३ | २८ |
| १०) माझ्या आयुष्यातील मैत्रिणींसोबतची पहिली पाणीपुरी ! | कु.स्नेहल लामजे | बी.ए.भाग-२ | ३२ |
| ११) मरणयातना | कु.आरती कुडाळकर | बी.ए.भाग-१ | ३४ |
| १२) जीवनातील हास्य हरविले तर... ? | कु.स्नेहल यादव | बी.ए.भाग-१ | ३६ |
| १३) पाल खंडोबा देवस्थान : धार्मिक स्थळ | कु.कोमल पवार | बी.ए.भाग-३ | ४० |
| १४) स्वामी विवेकानंद | कु.स्नेहल घाडगे | बी.ए.भाग-3 | ४४ |

पद्य विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| १) सावित्री | कु. मोनाली पिसाळ | बी.ए. भाग - २ | ८ |
| २) का...? | कु. स्नेहल यादव | बी.ए. भाग - १ | १६ |
| ३) घर... | कु. आशा सुतार | बी.ए. भाग - ३ | १६ |
| ४) आई | कु. रश्मी जाधव | बी.ए. भाग - ३ | ३१ |
| ५) एक महान कर्मयोगी कर्मवीर भाऊराव पाटील | कु. सोनाली घाडगे | बी.ए. भाग - ३ | ३१ |
| ६) कन्यारत्न | कु. तेजस्विनी संकपाळ | बी.ए. भाग - २ | ३३ |
| ७) एक होतं माळीण गाव | कु. स्नेहल घाडगे | बी.ए. भाग - ३ | ३९ |
| ८) वर्षा | कु. मोनाली पिसाळ | बी.ए. भाग - २ | ३९ |
| ९) हे जग असे भ्रष्टाचार ! | कु. शैलजा थोरात | बी.ए. भाग - १ | ४३ |
| १०) मी तुझीच ! | कु. स्नेहल घाडगे | बी.ए. भाग - 3 | ४३ |
| ११) प्रेम | कु. अपर्णा यादव | बी.ए. भाग - २ | ४६ |
| १२) क्षण | कु. मोनाली पिसाळ | बी.ए. भाग - २ | ४७ |
| १३) आयुष्य | कु. रेश्मा राठोड | बी.ए. भाग - १ | ४८ |
| १४) हुंडा बंदी | कु. मोनाली पिसाळ | बी.ए. भाग - २ | ४८ |




# शब्दसूर्य मावळला : नामदेव ढसाळ

कु.अपर्णा यादव
बी.ए.भाग-२



सूर्याकडे पाठ फिरवून त्यांनी शतकांचा प्रवास केला.
आता अंधारयात्रिक होण्याचे नाकारलेच पाहिजे...
हा आपला बाप अंधार वाहून-वाहून
अखेर पोरका झाला.
आता त्याच्या पाठीवरला बोजा
खाली ठेवलाच पाहिजे...
या वैभवनगरीसाठी आपलाच खून सांडला
आणि दगडी खाण्याचा मक्ता मिळाला.
आता आभाळमुका होणाऱ्या
हवेल्यांना सुरुंग लावलाच पाहिजे.
सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षानंतर लाभला
आता सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे...

पुणे जिल्ह्यातल्या एका छोट्या खेड्यात १५ फेब्रुवारी १९४९ या दिवशी जन्मलेल्या नामदेव ढसाळ यांच्या घरी अठराविश्व दारिद्र्य होते. पोटाची खळगी भरावयासाठी वडिलांच्या बरोबर बालपणीच ते मुंबईला आले. त्यांचे वडील मुंबईतल्या 'गोलपीठा' म्हणजेच लाल बत्ती, या समाजाने क्रुर विटंबना केलेल्या महिलांच्या वसाहतीच्या भागात झोपडीत राहत असत. त्यांचा खाटकाचा व्यवसाय होता. बालपणीच उपेक्षितांचे, वंचितांचे, अनाथांचे लाजिरवाणे जीणे ढसाळ यांनी अनुभवले. त्यांच्या व्यथांनी ते गलबलून गेले. सामाजिक समतेचे सोडाच, पण साधे माणुसकीचेही अधिकार आणि हक्क नाकारलेल्या, समाजाने झिडकारलेल्या या वंचितांच्या वेदनांनी ते पुरते ढासळून गेले आणि त्यामुळेच त्यांच्या कवितेतील शब्द अंगारासारखे फुलले. त्याचेच शब्दांकन 'गोलपीठा'त झाले. पारंपारिक कवितेतल्या प्रेम आणि अन्य विषयांना नाकारणाऱ्या या बंडखोर कवितेला गरम रक्ताचा स्पर्श होता. बंडखोर संत तुकाराम महाराज यांच्या अभंगांचा वारसा सांगणारी त्यांची ही कविता असल्यानेच तिचे मराठी साहित्य क्षेत्रात स्वागत झाले. चाकोरीबद्ध कवितेचे वळण बदलले. तिला क्रांतीची दिशा मिळाली. धार्मिक रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, जातिभेदाचा कराल विळख्यात हजारो वर्षे सक्तीने डांबून-जखडून ठेवलेल्या दरिद्री आणि उपेक्षित सामाजिक घटकांचा, शोषितांचा नामदेव ढसाळ हा विद्रोहाच्या क्रांतीची तुतारी फुंकणारा स्वर होता. त्यांचा पहिलाच 'गोलपीठा' हा कविता संग्रह ४० वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाला, तेव्हा मराठीसह भारतीय साहित्य विश्वही हादरून गेले. सूर्याकडे पाठ फिरवून शतकांचा प्रवास करणाऱ्या शोषितांनी आता अंधार यात्रिक व्हायचे नाकारायलाच हवे, नव्हे नाकारणारच, असे आपल्या बुलंद आवाजात आक्रमकपणे सांगणारा हा महाकवी होता. १९७२च्या दशकात अमेरिकेतल्या ब्लॅक पँथर चळवळीची प्रेरणा घेऊन ढसाळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दलित पँथर संघटनेची स्थापना केली. जाहिर सभा, मेळावे, मोर्चे, आंदोलन याद्वारे दलितांना सामाजिक न्याय मिळवून देणारे नवे व्यासपीठ निर्माण झाले. या चळवळीचाही आधारस्तंभ ढसाळच होते.

प्रतिभावंत कवी असलेल्या ढसाळांचा पहिला कविता संग्रह त्याच काळात प्रसिद्ध झाला होता. त्या संग्रहातल्या कवितांतले शब्द शहरी आणि

पांढरपेशा वर्गाचे नव्हते. ते उपेक्षित, शोषित आणि पिडीत समाजाने भोगलेल्या-सोसलेल्या दु:खांचे-व्यथांचे-वेदनांचे प्रकटीकरण करणारे होते. या दाहक आणि जळजळीत शब्दांनीच 'गोलपीठा' कविता संग्रह प्रचंड गाजला. द. आशियातल्या साहित्यावरही त्याचे दूरगामी परिणाम झाले. ही कविता क्रांतीचे आणि सामाजिक समतेचे गान गाणारी, प्रस्थापित व्यवस्थांना सुरूंग लावणारी, ती नष्ट करून नवी समतेवर आधारित सामाजिक व्यवस्थेच्या निर्मितीला प्रेरणा देणारी होती.

दलितांच्या व्यथा, वेदनांचा तो स्फोट होता. तो ऐकून मराठी आणि देशातल्या अन्य प्रादेशिक भाषातले साहित्यिक-कवी आणि जनताही हादरली. 'नामदेव ढसाळ' यांनी 'गोलपीठा' कविताद्वारे सामाजिक दु:ख, व्यथा आणि वेदना यांचे प्रकटीकरण केले होते. सोसले होते आणि भोगलेही होते.....

❑ ❑

## सावित्री

सावित्री सांग बरे
मानू तुझे आभार कसे
झेलूनी अंगावर शेण तू
घेतलास आपला हक्क तू
म्हणूनी जगतो आज आम्ही
म्हणूनी शिकतो आज आम्ही ॥ १ ॥
केले खर्च आयुष्य तू
टाकिले सुख यज्ञात तू
म्हणूनि लिहितो आज आम्ही
म्हणूनि वाचतो आज आम्ही ॥ २ ॥
उचलते ठोस पाऊल तू
दिला शिक्षणाचा वसा तू
म्हणूनि लढवितो निवडणूक आज आम्ही
म्हणूनि गाजवितो सत्ता आज आम्ही
मानू तुझे आभार कसे
मानू तुझे आभार कसे
"सावित्री सांग बरे"
म्हणूनच एक म्हणावेसे वाटते
तु हो सावित्री त्या फुलेंची
लोक तुला "क्रांतीज्योती" म्हणतील.

**कु. मोनाली पिसाळ**
बी.ए. भाग - २

## उखाणे

१) नमस्कार करता येतो मला छान वाकून
..........चे नाव घेते तुमचा मान राखून.
२) रामाची सीताबाई झाली होती लुप्त
..........राव अन् मी राहू नेहमी तृप्त.
३) वर्तन असावे नम्र, शब्द असावा गोड
..........रावांच्या संसाराला माझी आनंदी जोड.
४) वृक्षाच्या छायेत वनदेवी घेते विसावा
..........चे नाव घेते सर्वांचा आशिर्वाद असावा.
५) नाशिकची द्राक्ष, गोव्याचे काजू
..........चे नाव घ्यायला मी कशाला लाजू.
६) राजहंसाच्या पिलास चारा हवा मोत्याचा
..........रावांच नाव घेते आशिर्वाद द्यावा सौभाग्याचा.
७) विवड्यात घालतात खोबऱ्याचे काप
..........रावासमवेत ओलांडते मी उंबरठ्यावरचे माप.
८) चांदीची जोडवी, सौभाग्यवतीची खूण
..........चे नाव घेते ..........ची सून.
९) भाऊबिजेच्या दिवशी भाऊरायाला ओवाळीन
..........चे नाव घेते ..........ची बहिण.
१०) सोन्याचं मंगळसूत्र सोनारानं जडवलं
..........चे नाव घेते मैत्रिणीनी अडवलं.
११) बागेमध्ये फुलतात गुलाब रोज ताजे
..........चे नाव घेते तेच सौभाग्य माझे.

**कु. स्नेहल पाडगे**
बी.ए. भाग - ३





# आदर्श राजमाता जिजाबाई



**कु. शैलजा थोरात**
बी.ए. भाग-१

भारताला कीर्ती व वैभव प्राप्त करून देणाऱ्या राष्ट्रपुरूषांची चरित्रे सर्वांना माहित आहेत; पण त्यांच्या मातांची चरित्रे व कार्य याची माहिती मात्र फारशी नाही. युगपुरूष शिवाजी महाराजांच्या मातोश्री 'जिजाबाई' अशा मातांपैकीच एक आहेत. शिवाजी महाराजांना स्फूर्ती देऊन मार्गदर्शन करण्याचे काम त्यांनी अत्यंत समर्थपणे केल्यामुळेच शिवाजी महाराजांना शून्यातून स्वराज्याची निर्मिती करता आली. त्यांनी शहाजी राजांचे शिवाजी राजांकडे दुर्लक्ष असतानाही 'शिवाजी' राजांना घडविले व अप्रत्यक्षपणे महाराष्ट्राच्या इतिहासाला वेगळे वळण देण्याची कामगिरी बजावली.

जिजामाता यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी लखुजी जाधव व गिरजाबाईच्या पोटी विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील सिंदखेडराजा या गावी झाला.

जिजाबाईला लहानपणापासूनच राजकीय पार्श्वभूमी लाभली होती. जिजाबाईचे शिक्षण तत्कालीन, पारंपारिक रूढीप्रमाणे आणि राजघराण्यातील प्रथेप्रमाणे झाले होते. जिजाबाईस मूळ अक्षराचे शिक्षण देण्याची व्यवस्था त्यांच्या आई-वडिलांनी केली होती. तसेच पौराणिक पद्धतीचे संस्कार, रामायण-महाभारतातील कथानके आणि दक्षिणेत पूर्वी होऊन गेलेल्या शालीवाहन, शिलाहार, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव आणि विजयनगर साम्राज्य इत्यादींची माहिती करून दिली होती. जिजाबाईचे वडील लखुजी जाधव हे अत्यंत पराक्रमी, महत्त्वाकांक्षी व कुलाभिमानी सरदार होते. लखुजी जाधव हे स्वत:ला देवगिरीच्या यादवांचे वंशज समजत. इ.स. १५५० मध्ये ते जन्मास आले असावेत. शिवपूर्व काळात विशिष्ट परिस्थितीत निजामशाही व आदिलशाहीच्या आश्रयाने जी काही मराठा कुळे उदयास आली त्यात सिंदखेडचे जाधव, वेरूळचे भोसले, फलटणचे पवार-निंबाळकर यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. लखुजी जाधव यांची समाधी सिंदखेड राजा येथे असून तिला घुमट आहेत व या घुमटाच्या पूर्व व उत्तर दरवाजावर दोन शिलालेख आहेत. त्यातील मजकुरावरून लखुजी जाधव यांच्या आईचे नाव ठकाबाई व वडिलांचे नाव विठोजी होते. लखुजीला ३ बायका होत्या. त्यापैकी गिरजाबाई ही जिजाबाईची आई होती. लखुजी जाधवांना ४ मुलानंतर जिजाबाई झाल्या होत्या. आपणास कन्या व्हावी यासाठी जिजाबाईच्या आईने नवस केल्याचा उल्लेख एका पोवाड्यात आहे.

लखुजी जाधव हे अत्यंत मुत्सदी, कर्तबगार होते. निजामशाहीत ते पंच हजारी मनसबदार होते. पुढे त्यांना सिंदखेडची 'देशमुखी' मिळाली. सिंदखेडला स्थायिक झाल्यानंतर दहा हजारी मनसबदारी, २८ महाल व ५२ चावड्यांचे वतन मिळाले. विजापूर दरबारातील मातब्बर सरदार म्हणून ते ओळखले जात. इ.स. १५९४-१६०० या काळात सम्राट अकबराने निजामशाही बुडविण्याचा प्रयत्न केला तेव्हा ती वाचवण्याचे श्रेय काही प्रमाणात लखुजी जाधव यांच्याकडे जाते. पुढे इ.स. १६२९ मध्ये लखुजी जाधव, त्यांचे दोन पुत्र व एक नात व एक नातू यांची हत्या दौलताबाद मुक्कामी निजामशहाच्या उपस्थितीत झाली. आदरदर्शी व मद्यपी निजामशहाने त्याच्या

सरदारांचे ऐकून हे हत्याकांड घडून आले. या हत्याकांडामुळे जिजाबाईवर जणू दु:खाचा डोंगरच कोसळला. त्यांचे माहेरचे छत्र हरवले होते. शहाजीराजे यांनी चिडून निजामशाहीचा मुलुख लुटण्यास प्रारंभ केला. निजामशाहीत फंदफितुरी वगैरे संकटे त्यांनी उभी केली. त्यामुळे निजामशाहीत सरदार फुटून काही मोगलशाहीत तर काही आदिलशाहीत गेले.

जाधव घराणे व भोसले घराणे यांच्यात जिजाबाई-शहाजीच्या रूपाने जो विवाह संबंध झाला त्यामुळे दोन्ही घराण्यांचा लौकिक वाढला होता. या विवाहासंबंधी बखर साहित्यात काही नोंदी आल्या आहेत. त्यानुसार लखुजी जाधवांच्या बायकांचा जिजाबाई भोसल्यांच्या कुळास द्यावयास विरोध होता. भोसल्यांनी बळजबरीने जिजाबाईला आपल्या कुळास द्यावयास भाग पाडले. जाधव भोसले वैराच्या कथा ज्या बखरकारांनी दिल्या आहेत. त्यात एकवाक्यता नाही. समकालीन साधन 'शिवभारत'कारांच्या नोंदीनुसार "उत्तम लक्षणांनी युक्त दानशील, दयाशील, युद्धकुशल, महातेजस्वी अशा मालोजीपुत्र शहाजीला पाहून कुबेरागत श्रीमंत जाधवरावांनी ज्योतिषाने सांगितलेल्या, अनुकूल ग्रह असलेल्या शुभ मुहूर्तावर आपली विजयलक्ष्मी कमलनेत्रा व कुलास शोभा आणणारी कुलवान कन्या जिजाऊ वरदक्षिणेसह शहाजीस अर्पण केली. रामसिंग भाट व बजरंग भाटाच्या कथनातील माहितीनुसार जिजाबाई ५ वर्षांची व शहाजीराजे ८ वर्षांचे असताना शहाजी व त्यांचे वडील सिंदखेडराजा येथे दरबारी आले असता जिजा-शहाजी गुलाल खेळू लागले तेव्हा मालोजीराजे आनंदाने मोठ्याने ओरडून म्हणाले, "मंडळी, ऐकलंत का ? झाला प्रकार पाहिलात ना ? जाधवराव आमचे व्याही झाले. जिजा आमची सून झाली." बखरकारांनी जाधव-भोसले वैर गृहीत धरून लग्नप्रसंगी केलेली मांडणी चुकीची आहे. जिजाबाई-शहाजीराजे यांचे लग्न इ.स. १६१० च्या सुमारास चांगल्या वातावरणात व रूढीप्रमाणे झाले होते.

"हिचे पुत्र आम्ही, हिचे पांग फेडू,
हिला बैसवू वैभवाच्या शिरी."

जिजाबाई-शहाजीला एकूण ६ पुत्र झाले. त्यापैकी संभाजी व शिवाजी हे दोघे जगले. बाकी ४ अल्पजीवी होते. शिवनेरी किल्ल्यावर जन्म झाला, म्हणून नाव ठेवले 'शिवाजी' असे कवी परमानंद लिहितो. परंतु शिवनेरी किल्ल्यावर श्री भवानी शिवाईदेवी ही नवसाला पावली म्हणून पुत्राचे नाव शिवाजी ठेवले असे बखरकार म्हणतात.

"हीच जिजाऊ जिच्या प्रेरणेने, उजळे स्वराज्य ज्योती
हीच जिजाऊ जिने घडविले, राजे शिवछत्रपती."

इ.स. १६३६ मध्ये शहाजीराजांनी कर्नाटक हे स्वत:चे कार्यक्षेत्र निश्चित केल्यानंतर जिजाबाईला पुण्याच्या जहागिरीची व्यवस्था पाहण्यासाठी बालशिवाजी व दादोजी कोंडदेव यांच्यासोबत ठेवले. इ.स. १६३०-३२ या काळातील भीषण दुष्काळ, इ.स. १६३४-३६ या काळातील मोगली आक्रमण, विजापूरकरांनी पुणे जहागिरीवर केलेले हल्ले इत्यादीमुळे पुणे परगणा बेचिराख झाला होता. शहाजीराजांचे पुण्यातील वाडे बेचिराख झाल्याने कोठे राहावयाचे हा प्रश्न होता. पुण्याच्या दक्षिणेत सात कोसांवर खेडबारे येथे दादोजींनी जागा विकत घेऊन शिवाजी राजे व जिजाबाईसाठी वाडा बांधला. जिजाबाईनेच खऱ्या अर्थाने शिवाजीराजे घडविले. रामायण-महाभारतातील कथा जिजाबाईंनी, बालशिवाजीस ऐकविल्या. हिंदूंचे मुसलमानांकडून होणारे धर्मांतर, गोहत्या, मंदिरांचा विध्वंस हे चित्रही त्यांनी शिवाजी पुढे उभे केले. बालमन हे अत्यंत संस्कारक्षम असते. या वयातच जिजाबाईने शिवाजी राजाचे मन घडविले. अन्यायाचा तिरस्कार व प्रतिकार करण्याची शिवाजी राजाची मानसिकता तयार करण्यामागे जिजाबाईचे योगदान मोठे होते यात शंकाच नाही. जिजाबाईने स्मृतिपुराणे, विविध शास्त्रे व राजनीती इ. चेही शिक्षण शिवाजी महाराजांना दिले होते.





जिजाबाईच्या अंगी अनेक गुण होते. ती पतीव्रता, विचारी, धीरगंभीर, परोपकारी स्त्री होती. जिजाबाईच्या परोपकारी स्वभावामुळे ती पुणे जहागिरीतील लोकांचे आदरस्थान बनली. शिवाजी महाराजांच्या मनात स्वदेश व स्वधर्माबद्दल जो ओढा, आकर्षण निर्माण झाले होते, ते करण्यास जिजाबाईस कारणीभूत होती. स्वत: जिजाबाई अत्यंत धर्मनिष्ठ होत्या. आळंदीच्या ज्ञानदेवाच्या पुजेअर्चेसाठी नंदादीपाची व नैवेद्याची उत्पन्ने त्यांनी लावून दिली होती. पुण्यातील दर्गे-मशिदी यांचीही चोख व्यवस्था त्यांनी ठेवली होती. आदिलशहाकडून मिळालेल्या जहागिरीच्या प्रदेशाची पुन्हा व्यवस्था करणे हे अत्यंत कठीण काम होते. पण जिजाबाई यांनी ते आव्हान स्वीकारले होते. शुन्यातून विश्व निर्माण करण्याइतके हे काम अवघड होते.

पुणे जहागिरीची व्यवस्था जिजाईने अत्यंत कुशलतेने सांभाळली. याचा अर्थ त्यांच्यात प्रशासकीय गुण होते. हेच प्रशासकीय गुण शिवाजी महाराजांनी घेतले होते. मोगल बादशहाने शिवाजीराजे व त्यांचे पुत्र शंभुराजे या दोघांना आग्रा येथे कैदेत ठेवले होते. आग्रा येथून परत येईपर्यंत स्वराज्याचे शासन सुरळीतपणे जिजाबाईंनी चालविले होते.

जिजाबाईचे जीवन तसे एका अर्थाने अनेक संकटांनी भरलेले दिसते. वडील, दोन भावांची निजामाकडून झालेली हत्या, पुत्र संभाजीचे निधन, पतीचा अल्प सहवास, पुण्यासारख्या ओसाड जहागिरीची जबाबदारी, पुत्रावर आदिलशहा व मोगलांकडून होणारे वारंवार हल्ले पाहता तिच्या मनाची काय अवस्था झाली असेल याची कल्पना करवत नाही. वीरता, धैर्य, समजूतदारपणा, सोशीकपणा, विनय, पतिनिष्ठा, पुत्रप्रेम इ. गुण त्यांच्या अंगी असल्यामुळे त्या या संकटावर मात करू शकल्या. सर जदुनाथ सरकार यांनी "जिजाबाईचे तारूण्य संपल्यामुळे व तुकाबाई या नवीन सुंदर मुलीशी विवाह झाल्यामुळे शहाजी राजाने जिजाबाईला टाकून दिले." असे विधान केले आहे. पण ते वस्तुस्थितीवर आधारलेली नाही. पुण्याच्या जहागिरीची व्यवस्था पाहणे व शिवाजी राजांनी त्यांच्याबरोबर हत्ती, घोडे, पायदळ, ध्वज, खजिना, विश्वासू, अमात्य, पराक्रमी सरदार पाठविले होते. विविध शास्त्रात व कलामध्ये निष्णात असणारा अध्यापक वर्गच शिवाजी राजाबरोबर कर्नाटकातून पाठवला होता. आपल्या पतीच्या पराक्रमावर, धाडसावर तिची पूर्ण श्रद्धा होती. पुणे जहागिरीतील प्रजेस न्यायनिवाडा देण्याचे कामही तिने पाहिले. तसेच तिने काही सनदाही दिल्या होत्या. शहाजी राजास पेचात पकडण्यासाठी मोगल सरदार महाबतखान याने एका सरदारामार्फत जिजाबाईला अटक केली; पण जिजाबाई घाबरल्या नाहीत. जिजाबाईचा चुलता मोगलांच्या दरबारी असल्याने त्याच्या प्रयत्नातून जिजाबाईची सुटका झाली. मोगलांशी लढा देण्याची महत्त्वाकांक्षा व इच्छा जिजाबाईने मनाशी बाळगली होती. त्या दिशेने व त्यांनी शिवाजी राजावर संस्कार केले होते. जिजाबाईची ही इच्छा पुढे शिवाजी महाराजांनी पूर्ण केली.

**पुढे जिजाबाईबद्दलचे इतिहासकारांचे अभिप्राय :**

जिजाबाईच्या कामाचे, चरित्राचे मूल्यमापन अनेक इतिहासकारांनी केलेले आहे.

गो.स.सरदेसाई यांच्या मते, "शिवाजीला योग्य ते प्रोत्साहन देऊन त्याच्याकडून मराठ्यांचे स्वराज्य स्थापण्याची इच्छा जिजाबाईने पूर्ण करून घेतली. नानाविध विपत्ती सहन करून जो हा सुयोग तिने घडवून आणला त्यामुळे महाराष्ट्राचा भाग्योदय झाला."

भारताचार्य चिंतामणराव वैद्य म्हणतात, "शिवाजी महाराजांची मातृभक्ती विलक्षण होती. सुदैवाने

जिजाऊसारखी पुण्य, नि:स्पृह, करारी, सद्गुणी अशी त्यास माऊली लाभली होती. तिची भक्ती ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला व कोणतीही गोष्ट तिला विचारल्याशिवाय केली नाही.''

महादेव गोविंद रानडे यांनी 'Rise of Maratha Power' या ग्रंथात म्हटले आहे, ''जिजाबाई केवळ थोर कुळात जन्माला आली व तिचा शरीरसंबंध (लग्न) थोर घराण्याशी झाला होता. या एवढ्याच गोष्टीवर तिची थोरवी अवलंबून नव्हती. तिच्या थोरपणास तिच्या अंगचे गुण कारणीभूत होते. शिवाजीचे आईवर अतोनात प्रेम होते. प्रत्येक गोष्टीत तो आईचा सल्ला घेई. जिजाबाईने पाजलेल्या बाळकडूनेच स्वकर्तव्याची त्यास पूर्ण ओळख करून दिली. कोणत्याही अवघड कामगिरीवर जावयाचे असले म्हणजे शिवाजी प्रथम आईचा आशिर्वाद घेत. शिवाजी महाराजांच्या उदयास बहुतांशी त्यांची आई जिजाबाईच जबाबदार होती. डॉ.बाळकृष्ण यांनी 'Shivaji the Great' या इंग्रजी ग्रंथात म्हटले आहे की, "In one word Jijabai had the head of man over the shoulders of a women. She remained a guide, Philosopher and friend of Shivaji throughout her life. She anxiously watched the rising sun of the glory of her son and was fortunate to witness it's climox in the from of his coronation of as an independent King as an ornament of the Kshatriya Kula."

कै.वासुदेवशास्त्री खरे यांनी 'शिवसंभव' या नाटकात जिजाबाईची तेजस्वी व्यक्तिरेखा रंगविली असून शिवाजी महाराजांच्या ठायी 'स्त्री' जातीबद्दल इतका आदर होता त्याचे मुख्य कारण त्यांची आदर्श माता होय असे म्हटले आहे.

सेतू माधवराव पगडी यांच्या मते, ''आपल्या विख्यात पुत्राच्या आयुष्यभर चाललेल्या संघर्षात जिजाबाई ही त्यास स्फूर्ती देणारी शक्ती ठरली. परस्परांवर निष्ठा व माया असणाऱ्या माता-पुत्रांची अशी उदाहरणे इतिहासात क्वचित आढळतील.'' शिवाजी राजांना वडिलांचा थोडाच सहवास लाभला. त्यामुळे आई,वडिल,भाऊ, बहिण, शिक्षक, मार्गदर्शक इ. सर्व नाती जिजाबाईनाच वठवावी लागली.

जिजाबाईंनी रणांगणावर पराक्रम केला नसला तरी शिवाजी राजासारख्या पुत्रास जन्म दिला. 'शिवाजी'ची जडणघडण केली म्हणून तिचे नाव इतिहासात नोंदविले गेले आहे. शिवरायांना युद्धोपयोगी कला शिकविण्याची व्यवस्था जिजाऊंनी केली होती. शिवरायांच्या मनात साहस, शौर्य, सदाचार इ. गुण वाढीस लावण्याचे काम जिजाऊंनी केले. पती निधनानंतर सती जाण्याचा जिजाबाईचा मानस होता. पण शिवाजी राजांनीच आई जिजाबाईला सती जाण्यापासून परावृत्त केले. जिजाबाई धर्मनिष्ठ होत्या; पण अंधश्रद्धा बाळगणाऱ्या नव्हत्या. जिजाबाईंनी पुण्यात कसबा पेठेत गणपतीची स्थापना केली आणि जोगेश्वरी व केदारेश्वर मंदिरांचाही जीर्णोद्धार केला. शिवाजी राजाने स्वतंत्र राज्य स्थापन करावे हे जिजाबाईचे स्वप्न होते. ते स्वप्न शिवाजी राजाच्या राज्याभिषेकाने साध्य झाले. त्या एका अर्थाने तृप्त, आनंदी व समाधानी झाल्या होत्या. आपला पुत्र एका स्वतंत्र राज्याचा 'छत्रपती' झाला हे पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले होते. १७ जून, १६७४ रोजी रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड या गावी त्यांचा मृत्यू झाला.

अशा या जिजाबाईचे व्यक्तिमत्त्व रेखाटताना शहाजी राजांच्या दरबारातील कवी जयराम पिंड्ये यांनी म्हटले आहे की,....

जशी चंपकेशी खुले फुल्लजाई ।
भली शोभली ज्यास जाया जिजाई ।।
जिचे किर्तीचा चंबु जंबुद्विपाला ।
करी सावली माउलीसी मुलाला ।।

वरील जिजाबाईच्या कर्तृत्वाचे समकालीन कवीने केलेले वर्णन खरोखरच सार्थ आहे.

❑ ❑ ❑





# नोबेल ललना

कु.रश्मी जाधव
बी.ए.भाग-३



जगातील सर्व पुरस्कारामध्ये सर्वोच्च समजला जाणारा पुरस्कार म्हणजे 'नोबेल पुरस्कार' होय. जगात नोबेल पुरस्कार मिळवणाऱ्या स्त्रियांची माहिती सर्व वाचकांना व्हावी यासाठी काही पुस्तकांची निर्मिती करण्यात आली. 'मेरी क्युरी', 'मदर तेरेसा', 'पर्ल बक' अशा काही बोटांवर मोजण्याइतक्या स्त्रियांचीच आपणाला माहिती आहे.

स्त्रियांना एक व्यक्ती म्हणून स्वत:चा शोध घेण्यासाठी स्वत:ला पूर्ण समजावून घेण्यासाठी समाजात असणाऱ्या आपल्या परंपरांच्या चाकोरीतून बाहेर पडून आपल्या दैनंदिन कामातून वेळ काढत काही तरी वेगळे असे रचनाबद्ध कार्य करणे आवश्यक आहे. आपल्या समाजात असणारी स्त्री-पुरुष भेदातील दरी कमी करण्याचा प्रयत्न करावा.

केवळ अप्रगत मागास नव्हे तर प्रगत देशांतही स्त्रीभोवती एक मोहमयी जाळं तयार केलं जाते. पण आजच्या स्त्रीची गरज आहे हे मोहमयी जाळ तोडून बाहेर पडण्याची आणि स्वत:च्या क्षमतेनुसार स्वकर्तृत्वावर समाजात काही वेगळं करण्याची. अशा स्त्रियांना आत्मविकासाबरोबर समाजोन्नतीचा मार्ग खुला होतो. स्त्रियांना योग्य संधी मिळाली की, त्यांच्या कर्तृत्वाला अंकुर फुटू लागतात.

स्त्रियांनी केलेला कर्तबगारीचा प्रवास पुढील येणाऱ्या पिढीतील युवक-युवतींना स्फुर्ती देणारा नक्कीच ठरतो. मुळात नोबेल पुरस्काराचे निकष अत्यंत उच्च दर्जाच्या पातळीवरचे आहेत. समतेचे तत्त्व अवलंबून सामाजिक स्तर उंचावणे आणि साऱ्यांना विश्वबंधुत्वाची जोड मिळणे यांच्या निकषावर ही पारितोषिके दिली जातात.

नोबेल पारितोषिक मिळविणाऱ्या कर्तृत्ववान स्त्रियांपैकी काही महत्वाच्या स्त्रिया खालीलप्रमाणे आहेत.

**शिरिन इबादी - शांतता पुरस्कार - २००३**
**(इराणी शांतिदूत)**



शिरिन इबादी या इराणच्या पहिल्या महिला, ज्यांना 'शांततेचा नोबेल पुरस्कार' मिळाला. त्यांच्या या पुरस्काराने जगभरातील मुस्लिम स्त्रियांचा गौरव केला. याचा अर्थ कोणत्याही स्त्रिला, कोणत्याही क्षेत्रात पुरस्कार मिळणे ही सर्व स्त्रीवर्गासाठी अभिमानास्पद बाब आहे. शिरिन इबादी या अशा देशातील आहेत की, ज्या देशात ''स्त्रियांच्या संचारालाही मर्यादा येतात'' अशा स्त्रिला 'नोबेल पुरस्कार' मिळणे याचे महत्त्वच वेगळ आहे.

शिरिन इबादी यांचा जन्म २ जून १९४७ रोजी 'हमिदान' येथे झाला. त्यांनी आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यावर १९६५ साली कायदेविषयक अभ्यासासाठी 'तेहरान' येथे गेल्या. १९६९ साली त्या न्यायाधीश झाल्या. त्याकाळात महिलेने न्यायाधीश होणे ही एक अतर्क्य वाटणारी घटना त्यांनी प्रत्यक्षात आणली.

नोकरी करत असतानाच कायदेसंबंधात तेहरान विद्यापीठाची पीएच.डी. मिळवली. त्यांनी कायदाविषयक, बालहक्क-संरक्षणविषयक, स्त्री हक्क, मानवी हक्कांसंबंधात अनेक लेख लिहिले. पुरुषसत्ताक व पुरुषकेंद्री समाजरचना आपल्या धर्मात प्रमाण न मानता स्वतःच्या देशाचा आणि धर्माचा योग्य अभिमान बाळगून त्या वक्तव्य करतात.

'असोसिएशन फॉर सपोर्ट ऑफ चिल्ड्रन राइट्स' ही मुलांचे हक्क संरक्षणाची संस्था तेहरान येथे १९९५ मध्ये चालू केली आणि त्यांच्या प्रयत्नांतून अखेर शासनाने मानवी हक्क व बालहक्क विषयक कायदा संमत केला.

''धर्माच्या नावाखाली अन्याय करणे म्हणजे धर्मभंग करणे'' असे म्हणणाऱ्या शिरिनचा फोर्ब्ज मासिकाने जगातील शंभर शक्तिशाली स्त्रियांमध्ये समावेश केला आहे.

**एल्फ्रिड येलिनेक -**
**साहित्य पुरस्कार**



''वापरून गुळगुळीत झालेल्या, अर्थ हरवलेल्या शब्दांची, वचनांची, हास्यास्पदता त्यातील मुर्खपणा आणि त्यांच्या ठिकाणी असलेली वर्चस्व शक्ती उघड करणारी लेखिका'' या शब्दांमध्ये एल्फ्रिड येलिनेक यांना गौरविण्यात आले. त्यांचा जन्म २० ऑक्टोबर १९४६ रोजी स्टिरिया प्रांतातील 'मुर्झ श्लॅग' या गावात झाला.

''एल्फ्रिड येलिनेक यांना संगीताची आवड असल्याने त्यांना पियानो, ऑर्गन, गिटार वाजवण्याचा छंद होता. त्यांनी गद्य आणि पद्य लेखनास प्रथम सुरुवात केली. त्यांचे लेखन नियतकालिके व दैनिके यातून प्रसिद्ध होवू लागले. 'लिसाज शॅटन' या एकविसाव्या वर्षी लिहिलेल्या कवितासंग्रहाने तिच्यासाठी मानसोपचाराचे काम केले.

''मायलेक बॅन ॲडोलेसंट नॉव्हेल फॉर ॲन इन्फंटाइल सोसायटी'' ही त्यांनी पारंपारिक भाषेपेक्षा वेगळी भाषा वापरून कादंबरी लिहली. या कादंबरीने ऑस्ट्रियन साहित्यविश्वात तिची दर्जेदार लेखिका म्हणून गणना होवू लागली. लढवय्यी स्त्रीवादी असणाऱ्या एल्फ्रिडने १९७५ साली 'विमेन ॲज लव्हर्स' ही कादंबरी लिहिली.

''द पियानो टीचर'' ही १९८३ साली लिहिलेली आणि सर्वात गाजलेली कादंबरी होय. ''तडजोडवादी भूमिका न स्वीकारणारे आणि कुणापुढेही न झुकणारे साहित्य रचणारी'' असा गौरव त्यांचा आहे. 'द यंग ऑस्ट्रियन कल्चर पोएट्री ॲंड प्रोझ' हा १९६९ साली त्यांना साहित्य क्षेत्रात मिळालेला पहिला पुरस्कार होय.

साहित्यातून परखडपणे परिवर्तनवादी विचार मांडणारी आणि प्रत्यक्षात लोकसंपर्काला घाबरणारी अशी 'एल्फ्रिड येलिनेक' आहे.

**लिंडा बक**
**वैद्यकीय पुरस्कार**



''सामान्य दर्जावर कधीही समाधान मानू नये'' असे आईने सांगितलेले वाक्य आयुष्यभर लक्षात ठेवून आपल्या आचरणात तंतोतंत पाळणाऱ्या लिंडा बक यांना वैद्यकीय क्षेत्रामध्ये २००४ साली नोबेल पुरस्कार मिळाला.

लिंडा बक यांचा जन्म २९ जानेवारी १९४७ रोजी अमेरिकेतील सिॲटल या शहरात झाला. त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर 'मानसशास्त्र' विषयात पुढील शिक्षण घेण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी 'जीवशास्त्र' विषय निवडला. टेक्सास विद्यापीठातून त्यांनी १९७५ साली सूक्ष्म जीवशास्त्र या विषयात पदवी मिळवली.





पीएच.डी. साठी त्यांनी लिम्फ पेशी (Lymphocytes) हा विषय निवडला. याच विषयात आणखी संशोधनासाठी १९८० साली त्या न्यूयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठात गेल्या. त्यानंतर त्यांनी चेतनाविज्ञान हा विषय निवडून त्या प्रकल्पावर काम करत होत्या. माणूस/सस्तन प्राणी जवळजवळ विविध प्रकारच्या दहा हजारपेक्षा जास्त गंधाना त्या ओळखू शकतात. चेतापेशीतील 'न्युरोपेप्टाइड' या प्रथिनविषयक प्रकल्पाचे काम पूर्ण करून त्यांनी इतर प्रकल्प हाती घेतले.

मेंदूतील चेतापेशींच्या नकाशाची ठेवण व एखाद्या गंधाची संवेदना मेंदूपर्यंत गेल्यावर पूर्वस्मृतीवर त्या प्रकारची भावना उद्दिपित करणे या विषयावर संशोधनासाठी त्यांना दहा वर्षे लागली. त्यांना व 'रिचर्ड ॲक्सेल' यांना या शोधाबद्दल २००४ साली 'वैद्यकीय नोबेल पुरस्कार' मिळाला.

''बदलत्या आधुनिक काळात तरूण संशोधक स्त्रियांना काम करण्यास भरपूर वाव आहे'' असे त्या म्हणतात.

**एलिनॉर ऑस्ट्रॉम -**
**अर्थशास्त्र - २००९**



''सामान्य माणसांमध्ये काम करण्याच्या अफाट क्षमता असतात. ही माणसे एकत्र आली व त्यांनी योजनाबद्ध रितीने काम करायचे ठरवले तर अनेक अवघड कामे सहज साध्य होतील.'' असे त्या म्हणतात.

अमेरिकेच्या अर्थतज्ञ म्हणून 'एलिनॉर ऑस्ट्रॉम' यांना ओळखले जाते. अर्थशास्त्र विभागामध्ये नोबेल पुरस्कार मिळवणारी ही पहिली स्त्री आहे. स्त्रिला गृहस्वामिनी असे म्हणतात पण आर्थिक व्यवहार स्त्रियांच्या हाती यायला विसावे शतक उजाडावे लागले. कुटूंबाचे वित्तव्यवहार स्त्रियांकडे सरसकटपणे दिले जात नव्हते.

एलिनॉरचा जन्म ७ ऑगस्ट १९३३ रोजी अमेरिकेतील 'लॉस एंजलिस' शहरात झाला. त्यांचा राज्यशास्त्र विषय आवडता असल्याने 'UCLA' या विद्यापीठातून १९५४ रोजी त्यांनी बी.ए. पदवी मिळवली. १९६२ साली एम.ए. पूर्ण केल. १९६५ साली राज्यशास्त्र विषयात पीएच.डी ही पदवी मिळवली.

एलिनॉर यांची हुशारी, अभ्यास करण्याची वृत्ती, प्रामाणिकपणा या गुणांमुळे तिला तिच्या सहकाऱ्यांनी व प्राध्यापकांनी सहकार्य केले. १९६५ मध्ये विवाह झाल्यावर त्यांनी 'इंडियाना विद्यापीठात' पुढील शिक्षण घेतले. त्यांचा पहिला प्रकल्प पोलीस खात्याचे विकेंद्रीकरण नंतर कोणत्याही कामासाठी शासनावर अथवा खाजगी संस्थेवर अवलंबून न राहता योग्य दिशेने स्वप्रयत्न केले. तर उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर लाभ मिळतो हे सूत्र सिद्ध करणाऱ्या एलिनॉरला २००९ सालचा 'अर्थशास्त्र नोबेल पुरस्कार' मिळाला. ''या विभागाची पुरस्कार मिळवणारी मी पहिली स्त्री आहे परंतू शेवटची निश्चित नाही.'' असे त्या म्हणतात.

**अदा योनॅथ -**
**रसायनशास्त्र - २००९**



''मी स्त्री आहे म्हणून मी केलेल काम काही वेगळं आहे, अवघड आहे असं समजण्याचं कारण नाही'' असे त्या म्हणतात. गेल्या शतकात स्त्रियांना नोबेल पुरस्कार मिळण्याचे प्रमाण खूप कमी होते या शतकात मात्र परिस्थिती सुधारते आहे असे म्हणतात.

अदा योनॅथ यांनी रसायनशास्त्रामध्ये ''रायबोझोम्स'' या सजीवांच्या पेशीमधील घटकाच्या

स्वरूप व कार्य यांच्यावर संशोधन करणाऱ्या अदाला तिच्यामध्ये असलेल्या गुणांमुळे यश संपादन करता आल.

अदा योर्थेनचा जन्म २२ जून १९३९ रोजी इस्त्राईल देशात 'जेलसलेम' येथे झाला. 'टायकॉन हदश' या हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण घेतले. विज्ञानाची आवड असल्याने तिने पुन्हा जेलसलेम येथील हिब्रु विद्यापीठात प्रवेश घेतला. १९६२ साली रसायनशास्त्र विषयात B.S. पदवी मिळवली. १९६४ साली जैवरसायनशास्त्र या विषयात M.S. ही मास्टर्स डिग्रीही मिळवली. 'एक्स रे' क्रिस्टलोग्राफी हा विषय तेव्हा समृद्ध होता. १९६८ साली त्यांनी 'क्ष-किरण' तंत्रात पीएच.डी. मिळवली.

त्यांनी १९७० नंतर 'बायोलॉजिकल क्रिस्टलोग्राफी' ही प्रयोगशाळा स्थापन केली. १९९०च्या मध्यावर ''रायबोझोम्सच्या'' अगदी छोट्या भागाचा 'इलेक्ट्रॉन डेन्सिटी मॅप' करणे शक्य झाले. नंतर त्यांच्या २० वर्षाच्या परिश्रमांवर त्यांना यश आले. त्यामुळे रसायनशास्त्र व जीवशास्त्रातील गुढ बार्बीवर प्रकाश टाकता आला. याचा विशेष आनंद आहे. २००९ मध्ये यासाठी रसायनशास्त्राचा नोबेल पुरस्कार मिळाला. त्यावेळी त्यांचे वय सत्तर होते.

''उच्चकोटीची कामगिरी केल्यानंतर स्त्री वा पुरूष हा भेद तळाला जातो. माणूस एक व्यक्ती म्हणून स्वत:च विचार करू लागतो.''

''म्हणूनच साक्षर आई सर्व विश्वाला पुढे नेई''

ही उक्ती वरील कर्तबगार स्त्रियांच्या कामगिरीमुळेच खरी होते !

❑ ❑ ❑ ❑

## का...?

फुलाप्रमाणे ज्याचे मन त्याच्याच
वाट्याला काटे का ?
लढा आहे ज्याच्या जीवनात
त्याच्याच वाट्याला संघर्ष का ?
जिव्हाळा आहे त्याच्यावर
त्याच्यापासून दुरावा का ?
हसत रहावं नेहमी त्याला
त्याच्याच वाट्याला रडू का ?
नाती जोडतो जो त्याच्याच वाट्याला ताटातुट का ?
दुर गेलो असलो तुझ्यापासून जरी तू
मला विसरणार नाही ना ?
खरचं नाही ना ?

**कु. स्नेहल यादव**
बी.ए. भाग - १

## घर...

घर असावे कौलारू
सर्वासाठी कल्पतरू.....
घरात असावीत माणसे चार
नातवंडांना आजी आजोबांचा आधार.....
घर असेना का मातीचं
पण वृंदावन हव तुळशीचं.....
त्या घरास हवा परंपरेचा वारसा
पण पाहताच दिसे संस्कारांचा आरसा.....
घर असेना का छोटे
पण हवे माणुसकीने मोठे.....
तिथं असावी एक आई
जी घरास घरपण देई.....
तिथं असावेत एक बाबा
जे मायेचे छत्र देई.....

**कु. आशा सुतार**
बी.ए. भाग - ३





# प्रशासनातील कर्तृत्वशालिनी अधिकारिणी

**कु.स्वाती कोळेकर**
बी.ए.भाग-३

देशाच्या लोकसंख्येचा अर्धा हिस्सा असणाऱ्या स्त्रियांच्या क्षमतांचा उपयोग केल्याशिवाय देशाची प्रगती पूर्ण होऊ शकणार नाही. संधी मिळाली तर स्त्रिया कोणतीही जबाबदारी पार पाडण्यास सक्षम असतात, हे त्यांनी वेळोवेळी सिद्ध केलेले आहे.

आपल्याकडे यु.पी.एस.सी. म्हटले की आय.ए.एस. किंवा 'कलेक्टर' इतकेच विचारात घेतले जाते. पण या व्यतिरिक्त पदांची/विभागांची ओळख तसेच त्यांचे महत्त्वसुद्धा या सेवांच्या दृष्टीने खूप मोठे आहे. यासाठीच १९७० पासून या क्षेत्रात कार्यरत असलेल्या काही वरिष्ठ महिला अधिकारी यांच्याविषयी थोडक्यात विचार मांडले आहेत.

### १ राणी जाधव (I.A.S.)

राणी म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर राणी जिजाबाईपासून झाशीच्या राणीपर्यंत अनेक प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभ्या राहतात. तसं पाहिलं तर आजच्या पिढीतील स्त्रिया या लढवय्या राण्याच आहेत. कारण कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी अगदी कुशलतेने पार पाडताना स्वत:च्या



विकासाबद्दलही त्या तितक्याच दक्ष असलेल्या दिसतात. यापेक्षा काही पावले पुढे होऊन राणी या सामर्थ्य लाभलेल्या नावाला पुर्णत: न्याय देण्याची किमया सापली आहे. ती भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी.

राणी जाधव यांनी अनेक आजारी उद्योगांमध्ये नवचैतन्य आणले. 'मॅफ्को'सारख्या अन्नप्रक्रिया उद्योगाचे विस्तारीकरण करण्यासाठी पावले उचलली. टेरिफ अॅथोरिटी फॉर मेजर पोर्टस (TAMP) या संस्थेच्या चेअरमन म्हणून कार्यभार सांभाळणाऱ्या राणी जाधव या १९७०च्या बॅचच्या आय.ए.एस. अधिकारी. या मूळ पंजाबच्या आहेत. त्यांनी याच कालावधीत त्यांनी इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ पोर्टस् अॅन्ड हार्बर्स (IAPH) या संस्थेच्या सदस्या म्हणून कामकाज पाहिले. प्रशासकीय अधिकारी जसे बुद्धिवान असावेत अशी अपेक्षा केली जाते, तशीच ती समाजसेवेला वाहून घेतलेली चांगल्या मनाची व्यक्ती असावी अशीदेखील अपेक्षा केली जाते. हे अधिकारी समाजातूनच आलेले असतात हे आपल्याला दिसून येते. म्हणूनच आपण चांगल्या व्यक्ती तयार करण्याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. मग आपोआपच त्या व्यक्ती स्वत:च्या चांगुलपणाने आणि कर्तृत्वाने खऱ्या अर्थाने यशस्वी होवू शकतात.

### २ नीला सत्यनारायण

प्रशासनातील नियमबद्ध रोखठोकपणा आणि साहित्यातील मनस्वी संवेदनशीलता याचा अर्थाअर्थी फारसा संबंध नाहीच. पण प्रशासकीय अधिकारी 'साहित्यिक असू शकतो' हे आपल्याला समजले. प्रशासकीय



अधिकारी गद्यलेखन, काव्यलेखन, संगीतरचना या सगळ्यातही प्रशासनाइतकाच कॉंपीटंट असू शकतो.

हे नीला सत्यनारायण यांनी दाखवून दिले आहे. प्रशासना-सारख्या क्षेत्रात असूनही ज्यांच्या नावावर वहापेक्षाही जास्त वाङ्मयीन पुरस्कार आहेत अशी महिला आय.ए.एस. अधिकारी नीला सत्यनारायण होय.

५ फेब्रुवारी १९४९ रोजी जन्मलेल्या नीलाताईंचे शालेय शिक्षण मुंबई, नाशिक, पुणे आणि दिल्ली अशा वेगवेगळ्या ठिकाणी झाले. १९६५ मध्ये दिल्ली बोर्डातून १२वी च्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवून त्यांनी संस्कृत भाषेमध्ये उच्चतम प्राविण्य (Distinction) मिळविले. दिल्ली विद्यापीठातून B.A. (English) आणि पुणे विद्यापीठातून M.A. (English) पूर्ण केल्यानंतर पुढच्या वर्षी त्या यू.पी.एस.सी.च्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन महाराष्ट्र कॅडरमध्ये आय.ए.एस. या पदावर रूजूदेखील झाल्या.

सध्या महाराष्ट्र सरकारच्या राज्य निवडणूक आयुक्त म्हणून कार्यभार सांभाळत असलेल्या नीला सत्यनारायण यांनी कला क्षेत्रातही योगदान मिळविले आहे. प्रशासकीय सेवा हे क्षेत्र खूप धकाधकीचे आणि सामाजिक प्रश्नांनी भेडसावणारे आहे. इथे लेखन तेही काव्यलेखन स्फुरणे किंवा त्यासाठी वेळ मिळणेच कठीण ! त्यामुळे केवळ प्रशासकीय अधिकारी नाही तर एक लेखिका किंबहुना कवयित्री म्हणून नीलाताईंची ख्याती दूरवर पसरली आहे. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

### ३ शर्वरी गोखले



स्वत:चे आयुष्य स्वत:च्या 'टर्मस'वर जगण्याचे साहस खरेच प्रत्येकामध्ये नसते. जीवनाचा खरा अर्थ उमगल्यानंतर माणूस सामाजिक चौकटीच्या किंचित पुढे होऊन आपल्यासाठी वेगळी वाट शोधतो, तशीच काहीशी वेगळी वाट चोखाळणाऱ्यांपैकी एक शर्वरी गोखले या आहेत. एखाद्याचे विचार परखड असणे, याला फारसे महत्त्व नसते. परंतु तितक्या परखडपणे आपण ते विचार अमलात आणत असेल तर 'बात में कुछ दम हैं' असं म्हणता येईल. पण परखडपणा अंगी बाणविण्यासाठी आपले व्यक्तिमत्त्वही तसेच 'हटके' असायला हवे आणि तेही ओढून-ताणून नाही, तर उपजतच !

१९७१च्या बॅचच्या आय.ए.एस. अधिकारी शर्वरी गोखले या त्यांच्या विचारांशी आणि निर्णयांशी नेहमीच इतक्या सहजपणे ठाम राहिलेल्या आहेत की, त्यांनी कधीच त्यांच्या आयुष्यात एकसुरीपणा अनुभवला नाही की कोणत्या गोष्टीबद्दल पश्चातापही नाही. नवेपणा, साहस आणि उत्सुकता या गोष्टी आपल्या दररोजच्या आयुष्यात अनुभवता आल्या पाहिजेत आणि त्यासाठी आपण स्वत:च्या विचारां-बाबत स्पष्ट आणि प्रामाणिक असणं गरजेचं आहे.

दिल्ली विद्यापीठातून फिलॉसॉफी (तत्वज्ञान) विषय घेवून बी.ए. आणि पुढे पुणे विद्यापीठातून त्याच विषयात एम.ए.ची पदवी घेतल्यानंतर सर्वसाधारणपणे निवडले जाणारे करिअर म्हणजे लेक्चरशिप. आय.ए.एस. हे करिअर निवडणे म्हणजे त्यांना मनापासून ॲडव्हेंचरस असं करायचं होत. १९७४च्या काळात मुलींनी घराबाहेर पडून करिअर करणे हेच खूप आव्हानात्मक होते आणि म्हणूनच प्रत्येकाच्या आयुष्यात कोणते तरी श्रद्धास्थान असतेच. शर्वरी गोखले यांनी आपले पुरोगामी विचार आणि प्रामाणिकपणा या दोन घटकांना श्रद्धास्थान मानले आहे.

### ४ लीना मेहेंदळे



महिला सक्षमीकरण हा शब्दप्रयोग फारसा प्रचलित नव्हता. त्या काळात आपले स्वतंत्र आणि सक्षम व्यक्तिमत्त्व जाणीवपूर्वक घडवणाऱ्या लीना मेहेंदळे आज प्रशासक, विचारवंत आणि लेखिका म्हणून सर्वज्ञात आहे.





लीना मेहेंदळे यांचा जन्म महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथे झाला. १९७० मध्ये पटना विद्यापीठातून भौतिक शास्त्रामध्ये एम.एस्सी.ची पदवी घेतल्यानंतर लेक्चरर म्हणून नोकरी करतानाच १९७४ मध्ये त्यांची भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड झाली. १९९८ मध्ये यु.के. च्या ब्रॅडफोर्ड विद्यापीठातून प्रोजेक्ट प्लॅनिंग मध्ये एम.एस्सी.ची पदवी प्राप्त केली. त्यानंतर २००६ मध्ये हिस्सार विद्यापीठातून Human Resources विषय घेवून एम.बी.ए. केले. तसेच २०१० मध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठातून एल.एल.बी.ची पदवी संपादित केली.

सध्या बंगळूरमध्ये CAT (Central Administration Tribural) च्या सदस्य म्हणून त्यांची नेमणूक झाली आहे. सुरूवातीपासून लेखनाची आवड असल्याने हिंदी, मराठी, इंग्लिश तसेच बंगाली भाषांवर त्यांनी प्रभुत्व संपादन केले होते. कॉम्प्युटरवर मराठी, हिंदी या भाषा टायपिंग करणारे लोक कमी असतात व सामान्य टाईपरायटरच्या पद्धतीने केले तरी लेखन इंटरनेटवर टिकत नाही आणि त्यामुळेच आपल्याला आपल्या भाषेमधील लेखन कॉम्प्युटरवर प्रदर्शित करता येत नसल्याचे अनेकांनी सांगितले होते. आपण पहिलीमध्ये शिकलेली वर्णमाला म्हणजेच भारतीय भाषांचा पाया ! आज त्यांच्या blog वर मराठी-हिंदीमधील विविध लेख, काव्ये अगदी मराठीतील भगवतगीतेचे अध्यायसुद्धा वाचायला मिळतात. त्यातून अनेक तरूणांना, नवलेखकांना, प्रेरणा मिळाली नाही तर नवलच !

### ५ मीरा चड्ढा-बोरवणकर



मीरा बोरवणकर हे नावच पुरेसे आहे !! त्यांची ओळख सांगण्यासाठी कोणत्याही प्रकारची अतिरिक्त माहिती कुणालाच द्यावी लागत नाही. मुंबई क्राईम ब्रँचच्या १५० वर्षांच्या प्रदिर्घ इतिहासात प्रथमच एक महिला आयुक्त या विभागात रूजू झाली, ती म्हणजे 'मीरा चड्ढा-बोरवणकर'. मूळच्या मीरा चड्ढा-बोरवणकर पंजाब प्रांतातील 'फझिलका' या सीमेवरच्या छोट्या शहरात वाढलेल्या. वडील पंजाब पोलिस व बॉर्डर सिक्युरिटी फोर्स (BSF) मध्ये अधिकारी. त्यामुळे सीमाभागातच वडिलांचे कार्यक्षेत्र असे.

दहावीनंतर जालंधरच्या त्यालपूर खालसा कॉलेजमधून बी.ए.ची पदवी घेऊन जालंधरच्याच डी.ए.व्ही. कॉलेजमध्ये मीराजींनी पोस्ट ग्रॅज्युएशन केले. अभ्यासात कुशल असल्याने आदर्श विद्यार्थिनी आणि म्हणूनच विद्यार्थी प्रतिनिधी असलेल्या मीरा, त्यांच्या महाविद्यालयीन जीवनात अनेक नाटकांमध्ये तसेच वादविवाद स्पर्धांमध्ये नेहमीच सहभागी असत. याशिवाय पंजाबच्या क्रिकेट टीममध्येही त्या सहभागी होत्या. परंतु आयुष्यात काहीतरी करायचे आणि लग्नापर्यंतच येऊन सर्व काही थांबवायचे नाही. हे मात्र त्यांना ठाऊक होते. लग्न हा आयुष्यातला एक महत्वाचा क्षण आहे. तरीही ते अंतिम ध्येय नाही यावर त्यांचा दृढविश्वास होता.

अमेरिकेच्या मिनेसोटा विद्यापीठातून कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भातील धोरणांचे विश्लेषण (Police Analysis in Law Enforcement) याविषयी अभ्यास करताना काही नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या असे मीराजी म्हणतात.

पोलिस सेवेतील कारकिर्दीतील सन्मान म्हणून त्यांच्या गुणवत्तापूर्ण सेवेसाठी १९९७ मध्ये त्यांना राष्ट्रपती पदकाने गौरविले होते. एक म्हणजे 'पोलिस' हे क्षेत्र खूप थरारक अनुभवांनी भरलेले असते. स्वत:च्या दमदार कर्तृत्वाने या महिलांनी एकेक 'बॅंच-मार्क' सेट केला आहे. ज्यांची प्रेरणा नव्या पिढीने घेऊन त्याच्या पावलांवर पाऊल ठेवणे किंबहुना त्याहीपेक्षा एक पाऊल पुढे जाणे गरजेचे आहे.

❑ ❑ ❑

## सन्मान

कु.ज्योती कदम
बी.ए.भाग-१



माणसाच्या आयुष्यामध्ये महत्त्वाच्या गोष्टी अनेक असतात. तो खूप मेहनत घेऊन पैसे, नाव, इज्जत, सन्मान कमवू शकतो. पण त्यामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट असते ती म्हणजे, सन्मान. जर व्यक्तीला सन्मान मिळत नसेल तर त्या व्यक्तीच्या जीवनाला किंवा त्याच्या कामाला महत्त्व राहत नाही. आता हा सन्मान म्हणजे नक्की काय असते ? तर त्यामध्ये अनेक गोष्टी येतात. प्रेम, विश्वास, मैत्री, सामाजिक पुढाकार, आव्हाने, धैर्य, चिकाटी या सर्व गोष्टीतून माणसाला सन्मान मिळत राहतो. म्हणूनच या सर्व गोष्टीतून मला सन्मान म्हणजे काय ? त्याची व्याख्या पुढीलप्रमाणे -

''जो समाजामध्ये आपला ठसा त्याच्या मेहनतीने, कष्टाने, प्रेमाने, चिकाटीने, विश्वासाने उठवतो त्याला सन्मान असे म्हणतात.''

जर त्या व्यक्तीने लोकांच्या मनामध्ये विश्वासाची भावना अत्यंत प्रेमाने, जिव्हाळ्याने निर्माण केली असेल तर त्याला सन्मान हा नक्कीच मिळतो. सन्मान हा कोठून विकत घेता येत नाही तर तो मिळवावा लागतो आणि तो मिळवण्यासाठी माणसामध्ये जिद्द आणि चिकाटी असणे महत्त्वाचे असते. आपल्याला समाजामध्ये अनेक लोक भेटतात आणि ते आपल्या समाजामध्ये कोणते कार्य केले पाहिजे, समाजामध्ये एकोपा कसा निर्माण केला पाहिजे हे सांगतात. पण चांगल्या लोकांच्या बरोबर वाईट लोक सुद्धा असतात. परंतू जर आपला आपल्यावर विश्वास असेल तर त्या वाईट लोकांचा आपल्या विचारावर परिणाम होतच नाही.

समाजामध्ये सन्मान मिळवण्यासाठी नेता हा महत्त्वाचा घटक असतो. नेता आव्हान स्विकारतो. सतत येणाऱ्या वेदनेवर मात करण्यासाठी लागतो तो मनाचा कणखरपणा. सर्वोत्तम गोष्टीसाठी तयारी करणं पण त्याच वेळी अत्यंत वाईट गोष्ट स्वीकारायची तयारी ठेवणं आवश्यक असतं. चमत्कार होऊ शकतात पण काहीही झालं तरी वाटचाल थांबवायची नसते. या सर्व गोष्टीचा विचार करून नेत्याने/व्यक्तीने आपले कार्य करत राहिले तर त्याला सन्मान हा नक्कीच भेटू शकतो.

आयुष्यामध्ये अनेक गोष्टीबरोबर महत्त्वाची आणखी एक गोष्ट म्हणजे, विश्वास होय. विश्वास ही भावना प्रेमापेक्षा कैक पटीनी थोर आहे. आयुष्यात असेही लोक भेटतात ज्याच्यावर आपण प्रेम करतो पण विश्वास मात्र ठेवू शकत नाही. म्हणून समाजामध्ये सन्मान मिळवण्यासाठी प्रेमाची भावना असणे हेदेखील गरजेचे आहे. प्रेम माणसाला जगण्याची प्रेरणा देते. प्रेम जीवनात उत्साह व आनंद वाढविते. या सर्वातूनच व्यक्तीचा 'सन्मान' होत असतो. दुःख, भय, चिंता, याच्या पलीकडे जाणे म्हणजे 'सन्मानास' पात्र होणे होय.

❑ ❑ ❑ ❑





## आजच्या युवकांसाठी यशवंतराव चव्हाणांचे विचारधन

कु.अपर्णा यादव
बी.ए.भाग-२



ज्येष्ठ नेते स्व.यशवंतराव चव्हाण यांचा उल्लेख झाला की महाराष्ट्राचे शिल्पकार, पहिले मुख्यमंत्री, साहित्य-संगीत रसीक, विचारवंत अशी नाना प्रकारची विशेषणे त्यांना लावली जातात. ही सगळी खरीही आहेत, मात्र पुरेशी नाहीत. कारण एखाद्या विशेषणाने यशवंतरावांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व समजावून सांगता येणार नाही, एवढे त्यांचे व्यक्तित्व व्यामिश्र आणि विविधांगी पैलू असलेले होते. लोकनेता कसा असावा, त्याच्यासारखे दुसरे उदाहरण क्वचितच आढळेल.

राज्यशास्त्र आणि प्रशासन या दोन्ही विषयांचा स्व.यशवंतराव यांचा गाढा व्यासंग होता. ते स्वतःला राज्यशास्त्राचे विद्यार्थी समजायचे. वेगवेगळ्या शासन प्रणालींचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. राज्यशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र असल्याने ते परिवर्तनीय आहे, असे त्यांचे मत होते. आपण जेव्हा एखाद्या सामाजिक शास्त्राचा विचार करू लागतो, तेव्हा आपण बदलत्या जगात राहत आहोत व सामाजिक जीवन परिवर्तनशील आहे, हे सत्य लक्षात घ्यावे लागते, असा त्यांचा त्यामागचा विचार आहे. लोकशाहीवर, विशेषतः भारताने स्विकारलेल्या संसदीय लोकशाही प्रणालीवर त्यांची नितांत श्रद्धा आणि निष्ठा होती.

प्रशासनाबद्दल त्यांनी अगदी मुलभूत विचार केला होता. शासन आणि प्रशासन या दोन निराळ्या गोष्टी आहेत. प्रशासन म्हणजे राज्यकारभार. मात्र ती शासनाची एक बाजू आहे. शासनाची दुसरी बाजू राजकीय आहे. या दोन्ही बाजूंचा सुरेख समन्वय आणि संगम झाला तर त्याचे पर्यवसान साहजिकच लोकांच्या समाधानात होईल, असे त्यांचे साधे आणि सोपे सूत्र होते. मात्र लोकांचे समाधान हा एक वेगळाच प्रकार आहे, याचीही त्यांना कल्पना होती. यामुळे राजकिय लोकशाहीला सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची जोड असणे आवश्यक आहे. तशी जोड ज्यावेळी मिळेल, तेव्हाच तिला खऱ्या लोकशाहीचे स्वरूप प्राप्त होईल, अशी त्यांची भूमिका होती.

हिमालयावर येता घाला,
सह्याद्री हा धावून आला.
मराठमोळ्या पराक्रमाने,
दिला दिलासा इतिहासाला...
या मातीच्या कणाकणातून,
तुझ्या स्फुर्तीची फुलतील सुमने,
जोवर भाषा असे मराठी
''यशवंताची'' घुमतील कवने.....

शब्दांच्या सामर्थ्यावर आणि सौंदर्यावर नितांत विश्वास ठेवणारे यशवंतराव हे राजकारण आणि साहित्य यांचा समन्वय साधणारे अतिशय दुर्मिळ नेते होते. 'राजकारण आणि साहित्य' दोघांचेही माध्यम शब्द आहे. राजकारणी हे साहित्यिकांचे शब्दबंधू असतात, असे ते म्हणत. यशवंतरावांनी

अनेक वृत्तपत्रांमध्ये विविध विषयांवर लेख लिहिले. 'कृष्णाकाठ' आणि 'ऋणानुबंध' ही त्यांची आत्मचरित्रात्मक पुस्तके आजही रसिकांचे आकर्षण आहेत. साहित्य व्यवहार आणि साहित्य संमेलन ही त्यांच्या मर्मबंधातील ठेव होती. अतिशय व्यस्त अशा दिनक्रमातूनही ते संधी मिळेल तेव्हा साहित्यिक उपक्रम, नाटके-संगीताच्या मैफिली यांना हजेरी लावायचे. मात्र त्यांनी अशा ठिकाणी जाताना किंवा तिथे वावरताना आपल्या साहित्य गुणांचा टेंभा कधीही मिरवला नाही. एक रसिक म्हणूनच ते अशा कार्यक्रमांचा आनंद लुटायचे. मराठी भाषा, तिच्यातील साहित्य, साहित्यिक यांच्याबद्दल त्यांच्या मनात एक प्रकारचा अकृत्रिम जिव्हाळा होता.

कोणत्याही भाषेच्या माध्यमातून जे विचार प्रकट होत असतात, त्या विचारप्रवाहांवरच तिची प्रगती अवलंबून असते. त्या विचारप्रवाहात प्राण आणि गती असेल तर असे प्रवाह जनतेच्या मनापर्यंत पोहचतात. म्हणूनच लोकजीवनातून खरेखुरे, रसरशीत साहित्य निर्माण होते, अशी मांडणी यशवंतराव करतात. आपला हा मुद्दा स्पष्ट करताना ते संतसाहित्य, लोकगीते यांचे अतिशय चपखल उदाहरणही देतात. यशवंतराव केवळ विचारवंत नव्हते, त्यांच्या व्यक्तिमत्वात एक कृतिशील विज्ञानवादी समाविष्ट होता. भारताची शास्त्रशुद्ध पुनर्रचना करण्यासाठी विज्ञानवादी तरूण निर्माण झाले पाहिजेत अशी त्यांची भूमिका होती.

विज्ञान प्रसाराबाबत त्यांची स्वतःची अशी ठाम विचारसरणी होती. समाजाला विज्ञाननिष्ठ बनविण्यासाठी आपल्याला प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. विज्ञानाचे मूळ स्वरूपच तर्कसंगत, बुद्धिसंमत विचार असे आहे. हा विचार जनतेच्या मनात दृढमुल झाल्यावरच आपण एक आधुनिक समाज निर्माण करू शकतो. जुन्या कल्पना काढून टाकण्याचा हाच एक कार्यक्षम उपाय आहे. या दिशेने जितक्या जलद वाटचाल होईल, तितक्या लवकर आपला देश प्रगतशील राष्ट्रांच्या मालिकेत जाऊन बसेल, अशी आग्रहपुर्वक मांडणी ते करीत असत. आज एवढ्या वर्षानंतरही आपल्या समाजाची रूढीप्रियता आणि त्यातून येणारी अगतिकता पाहिली की यशवंतरावांच्या विचारांचे महत्त्व पटते. यशवंतरावांचा राजकिय पिंड स्वातंत्र्याच्या आंदोलनावर पोसलेला होता. भारतीय राजकारणातील गांधी युगाला, सत्याग्रह-सविनय, कायदेभंग-प्रतिकार या मोहिमेला वेग आणि परिपक्वता आलेल्या काळात यशवंतरावांचा राजकिय प्रवास सुरू झाला. देशात तेव्हा देशभक्तीचा अंगार फुललेला होता. पंडित जवाहरलाल नेहरूही स्वयं तेजाने तळपत होते. महात्मा गांधीजींचा संदेश सत्याग्रहाचा होता. त्याला रशियन राज्यक्रांतीचा संदर्भ होता. रशियन क्रांतीने उभ्या जगाला हादरवून टाकले होते. पंडितजींचे संस्कारक्षम मन या क्रांतीने भारून गेले होते.

संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती हा यशवंतरावांच्या राजकीय कर्तृत्वाचा कळसाध्याय होता. संयुक्त महाराष्ट्राची जोरदार चळवळ महाराष्ट्रात सुरु होती. त्याच दरम्यान राज्य पुनर्रचना मंडळाचा अहवाल जाहिर झाला. या अवहालात 'समतोल द्वैभाषिक' राज्याची कल्पना मांडण्यात आली होती. या संकल्पनेला यशवंतरावांनी कठोरपणे विरोध केला. संयुक्त महाराष्ट्राच्या दैदिप्यमान चळवळीबाबत नव्याने काही लिहिण्याची गरज नाही. कराड मतदार संघातून १९५७ साली निवडून आल्यावर यशवंतरावांवर द्विभाषिक राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी आली. द्विभाषिकाचे मुख्यमंत्री म्हणून सुमारे दीड वर्ष काम केल्यावर एकदा पंडित नेहरू मुंबईच्या दौऱ्यावर आले असता या प्रयोगाबाबत या दोघांचीही चर्चा झाली होती. त्यावेळी शासकियदृष्ट्या हा प्रयोग द्विभाषिक मुंबई राज्य चांगले चाललेले असले तरी लोकभावना मात्र त्याला अजिबात अनुकूल नाही आणि राजकियदृष्ट्या हा प्रयोग योग्य ठरणार नाही, हे आपले मत त्यांनी निर्भिडपणे पंडितजींसमोर मांडले होते.

यानंतर पंडितजी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला हळूहळू अनुकूल झाले. या आधी १९५७ साली प्रतापगड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुर्णाकृती अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरण समारंभावेळी पंडितजींनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचा आणि लोकभावनेचा अनुभव घेतला होताच. अखेर १ मे १९६० रोजी तो मंगल दिवस उजाडला आणि पंडितजींसह यशवंतराव संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश घेऊनच महाराष्ट्रात परतले.

पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते १ मे १९६० रोजी पहाटे संयुक्त महाराष्ट्राच्या नवीन राज्याचे उद्घाटन झाले. पहिल्या दिवशी महाराष्ट्राला उद्देशून यशवंतरावांनी जे भाषण केले ते नव्या राज्याबद्दल त्यांची संकल्पना स्पष्ट करणारे होते. ते म्हणाले, "गेल्या काही वर्षात महाराष्ट्रातील जनतेची जी विचलित अशी अवस्था झाली होती, ती आता संपून महाराष्ट्राला यापुढे स्थैर्याचे दिवस येतील, अशी आशा करण्यास मुळीच हरकत नाही. त्यायोगे लोकांना आता आपल्या विकासाच्या प्रश्नांकडे कटाक्षाने लक्ष देता येईल व विकास कार्याच्या बाबतीत येणाऱ्या निरनिराळ्या अडचणींना ते अधिक परिणामकारकपणे तोंड देऊ शकतील. नव्या महाराष्ट्र राज्याच्या जन्माने आपल्याला भरभराटीचे व सुखाचे दिवस येतील, ही सामान्य जनतेची अपेक्षा योग्य अशीच आहे. हा जनतेच्या अपेक्षापूर्तीचा क्षण जवळ आणणे हा महाराष्ट्र राज्याचा मी मानबिंदू मानतो."

संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद स्विकारल्यानंतर यशवंतरावांनी आपले लक्ष पूर्णपणे राज्याच्या विकासावर केंद्रित केले. विशेषतः शेती, उद्योग, बेरोजगारी आणि अर्थव्यवस्था या महत्वाच्या विषयांकडे त्यांनी जाणून बुजून लक्ष दिले. यासाठी पहिल्या दिवसापासून अतिशय जागरूकतेने त्यांनी उद्योग खात्याची जबाबदारी स्वतःकडेच ठेवली. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ म्हणजेच एमआयडीसीची स्थापना करून त्यांनी महाराष्ट्रातील कारखानदारीला आणि उद्योग व्यवसायांना शासकीय अभय मिळवून दिले. बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामीण भागात लहान लहान उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात सुरू झाले पाहिजेत असा प्रयत्न त्यांनी केला. 'शेती' हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा उद्योग आहे. शेती आणि पाणी यांचाही अभेद्य संबंध आहे. या प्रश्नांचा गंभीरपणे विचार करून यशवंतरावांनी इरिगेशन कमिशन नेमले. कर्जाचे ओझे, शेतमालाच्या किंमतीचे संकट आणि अधूनमधून पडणारा दुष्काळ या संकटांच्या विळख्यात सापडलेला शेतकरी स्वतःच्या पायावर कसा उभा राहिल यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. शेती महामंडळाची स्थापना, कमाल जमीन धारणेचा कायदा आदि शेती क्षेत्रातील पुरोगामी पावले त्यांनी उचलली.

शिक्षण प्रसारावरही त्यांनी लक्ष दिले. शहरे आणि गावे यांच्यात नवा संवाद सुरू झाला पाहिजे असे ते मानायचे. आचार-विचारांची देवाण-घेवाण वाढली तर एकजीनशी समाजजीवन निर्माण करण्याच्या दिशेने प्रगती होईल असे त्यांचे मत होते. राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना करून त्यांनी साहित्य-संस्कृती व्यवहाराला शासकिय अधिष्टान प्राप्त करून दिले. नव्या महाराष्ट्राला त्यांनी अत्यंत आवडीने 'जगन्नाथाचा सार्थक रथ' अशी उपमा दिली होती. सर्वांचे हात लागल्याशिवाय हा रथ हालणारही नाही व चालणारही नाही. महाराष्ट्राच्या भवितव्याची लांबच लांब सफर आपणा सर्वांना पुरी करायची आहे. कारण त्यातच जनतेचे

कल्याण आहे, असे ते म्हणत. त्यांचे हे शब्द महाराष्ट्राला सदैव मार्गदर्शक ठरतील.

सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रेसारख्या अत्यंत छोट्या खेडेगावात जन्माला येवून राष्ट्रीय पातळीवर स्वतःचे स्थान निर्माण केलेले यशवंतरावजी चव्हाण हे एका अर्थाने कोडेच आहे. कॅलिडिओस्कोप मधून प्रत्येक वेळी जसे वेगवेगळे चित्र दिसते, तसेच यशवंतरावांच्या बाबतीत आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे हे फार कठीण काम आहे. वेळोवेळी सत्तापदे उपभोगलेला एक राजकिय नेता, कार्यक्षम आणि लोकाभिमुख प्रशासक, साहित्य-संगीताचा रसिकाग्रणी, मोठा मित्र परिवार असणारा, दिलखुलास लोकसंग्राहक अशी त्यांची विविध रूपे आहेत. यात उजवे-डावे करणे फार कठिण आहे. यशवंतराव हे सर्वार्थाने मोठे होते, एवढेच नव्हे तर मोठेच आहेत. त्यांनी आखून दिलेल्या मार्गावरून महाराष्ट्राची कालक्रमणा सुरू आहे. गेल्या अर्धशतकात महाराष्ट्राने वेगवेगळ्या क्षेत्रात जी नेत्रदीपक प्रगती केली आणि राष्ट्राच्या पटावर आपले स्वतःचे जे स्थान निर्माण केले, त्याचे श्रेय निःसंशयपणे यशवंतरावांच्या दूरदृष्टीला जाते हे नक्की.

यशवंतराव चव्हाण साहेबांनी जातिभेद विरहित, सुसंस्कृत आणि संपन्न महाराष्ट्राचं स्वप्न पाहिलं. आपलं राज्य केवळ देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात प्रगतशील राज्य बनले पाहिजे. हा त्यांचा ध्यास होता. ४० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी घेतलेला प्रत्येक निर्णय राज्याच्या प्रगतीला गती आणि सर्वसामान्य माणसाला बळ देणारा होता. राज्यातील जनतेचं कल्याण हेच एकमेव ध्येय उराशी बाळगून त्यांनी अविरत कार्य केलं.

भविष्यातील महाराष्ट्र कसा असावा याबाबत चव्हाण साहेबांचे मत अत्यंत स्पष्ट होते. राज्याच्या कृषी, शैक्षणिक, आर्थिक, औद्योगिक, सांस्कृतिक विकासाला त्यांनी योग्य दिशा दिली. समाजकारण आणि राजकारणात चव्हाण साहेबांच कार्य आपल्याला ठळकपणे दिसत असले तरी साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती अशा अन्य क्षेत्रातही त्यांचं योगदान मोठं आहे. चव्हाण साहेबांचे विचार सर्वांसमोर यावेत, विशेषतः तरूण पिढीसमोर यावेत आणि चिरंतन रहावेत, असा प्रयत्न आहे. त्यासाठी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात त्यांच्या नावाने 'अध्यायन केंद्र' सुरू करण्यात येत आहे.

कोटि-मुखानी आशीर्वाद दे, महाराष्ट्र माता
औक्षवंत व्हा, विजयवंत व्हा, प्रियतम यशवंता.
तुमच्या लेखी नगरी नगरी देवराष्ट्रे होई
घराघरातून उभ्या ठाकल्या वरदा विठाबाई.
'स्वति' वांछितो जनपुरूषोत्तम, उंचावून शतां...
सह्याद्रीच्या शिखरी उठती स्वायंभव नाद.
सातपुड्यांच्या कड्यात घुमती त्याचे पडसाद
'अजातशत्रू' आज लाभला आम्हां राष्ट्रनेता...
शिवस्मृतींची शाल अर्पिती लोक लोकमान्या
टिळकपणाचा तिलक लावती तुम्हां नागकन्या.
प्रतिपच्चंद्रापरी वाढू द्या अशीच जयगाथा...
लोकशाहीचे तुम्ही पेशवे, सेवेचे स्वामी
तुमच्यामागे राहो जनता नित्य पुरोगामी
समर्थ होवो महाराष्ट्र हा, भारतं-भू-त्राता...

देशासाठी काहीही आणि कोणताही त्याग करण्याची चव्हाण साहेबांची अगदी लहानपणापासून तयारी होती. याचा प्रत्यय १९६२च्या चीन आक्रमणाच्या वेळी आला. तात्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी मोठ्या विश्वासाने त्यांना दिल्लीला बोलावून घेतले आणि त्यावेळची अत्यंत महत्त्वाची 'संरक्षणमंत्री' पदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. चव्हाण साहेबांनीही ते आव्हान समर्थपणे पेलले.

आपल्या नेतृत्वानं भारतीय अधिकाऱ्यांमध्ये विश्वास निर्माण केला. लष्कराचं मनोधैर्य वाढवलं.





पंडित नेहरूंच्या बोलण्यावरून चव्हाण साहेब ज्यावेळी दिल्लीला गेले त्यावेळी ''हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेला'' अशा शब्दात जाणकरांनी त्यांचा गौरव केला होता. यशवंतरावांचा तो गौरव म्हणजे महाराष्ट्राच्या प्रत्येक सुपुत्राचा गौरव होता, असे मला वाटते.

चव्हाण साहेबांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू सांगता येतील. ते थोर विचारवंत होते. साहित्यिक होते. मुत्सद्दी होते. विरोधकांचा मान राखणारे संयमी राजकारणी नेते होते. त्यांच्या राजकारणाला वैचारिक अधिष्ठान होते. जनतेच्या सुख दुःखाशी समरस झालेले, जनमताची नाडी अचूक ओळखणारे ते लोकनेते होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सर्वांना भावणारा सुसंस्कृतपणा होता. सर्वात महत्त्वाचं म्हणजे राजकिय क्षेत्राला त्यांनी वेगळी उंची प्राप्त करून दिली. त्या बळावर, राज्यातीलच नव्हे, तर देशातील जनतेचा विश्वास त्यांनी संपादन केला होता.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचं ध्येय पूर्ण केल्यानंतर प्रगतशील महाराष्ट्र घडविणाऱ्यांवर त्यांनी लक्ष केंद्रित केलं. मुंबई, कोकण, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ अशा भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधता असलेल्या राज्याला एका सुत्रात बांधण्याचं काम करीत असतानाच राज्यातल्या जनतेत भावनात्मक एकजुट निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. महाराष्ट्रातल्या ७० टक्के जनतेचं जीवन शेतीवर अवलंबून आहे हे लक्षात घेऊन त्यांनी कृषी उद्योगांना प्रोत्साहन दिलं. गावांमध्ये आर्थिक सहकारी संस्था स्थापन झाल्या पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. सहकारी बँका, सहकारी साखर कारखानदारी सुरू करण्यासाठी त्यांनी मदत केली. सरकारच्या माध्यमातून ग्रामीण भागात विकासाची गंगा नेली. ग्रामीण भागातच मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल यासाठी प्रयत्न केले, यामुळे साहजिकच ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाला गती मिळाली.

चव्हाण साहेबांचं व्यक्तिमत्त्व उत्तुंग आणि कर्तृत्व महान आहे. त्यांच्या संपूर्ण यशात आणि जडणघडणीत आई 'विठाबाई' आणि पत्नी 'वेणूताईनी' प्रत्येक सुख-दुःखात त्यांच्याबरोबर खंबीर साथ दिली. संरक्षणमंत्री म्हणून केंद्रात जाण्यासारखे अनेक महत्वाचे निर्णय केवळ 'वेणूताईच्या' आग्रहामुळेच ते घेऊ शकले. वेणूताईशिवाय चव्हाणसाहेब हा विचार करणे अशक्य आहे. चव्हाण साहेबांच्या संपूर्ण जीवनकार्यावर नजर टाकली तर ते युगपुरूष असल्याची खात्री पटते. त्यांनी महाराष्ट्राला अनेक गौरवाचे आणि अभिमानाचे क्षण प्राप्त करून दिले. त्यांच्यासारखा महापुरूष या भूमीत जन्माला आला हे आपलं भाग्य आहे. महाराष्ट्राला जगातील सर्वात प्रगत राज्य बनविणे हे चव्हाण साहेबांचं स्वप्न होतं, ते स्वप्न पूर्ण करणं हे आपल्या सर्वांचे कर्तव्य असून, तीच यशवंतराव चव्हाण साहेबांना खरी आदरांजली ठरणार आहे... !

❑ ❑ ❑ ❑

## सुविचार

१) आईने प्रेमळपणाने पाठीवरून हात फिरवून केलेला उपदेश साऱ्या ग्रंथालयातील ज्ञानापेक्षा पवित्र असतो.

२) विद्यार्थी हा पुस्तकाच्या पानातून शिकण्यापेक्षा शिक्षकांच्या जीवनातून जास्त शिकतो शिक्षक हेच खरे पाठ्यपुस्तक आहे.

कु. स्नेहल घाडगे
बी.ए. भाग - ३

# औंधची सुकन्या : कादंबरी यादव

कु. संजीवनी शिंदे
बी.ए.भाग-२

औंध येथील कु. कादंबरी यादव हिने छत्तीसगड, रायपूर येथे झालेल्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत विजेतेपद पटकावून अटकेपार झेंडा फडकविला. मूळची औंधची असलेली कु. कादंबरी यादव हिला बालपणापासूनच तिचे वडील माधव यादव यांच्याकडून क्रिडा क्षेत्रात जाण्यासाठी वेळोवेळी प्रोत्साहन दिले. घरात शैक्षणिक वातावरण असूनही कादंबरीला विविध खेळांची आवड लहानपणापासूनच होती. पुणे येथील नवोदय विद्यालय समितीमार्फत रायपूर येथे घेण्यात आलेल्या नवोदय विद्यालय राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत कादंबरीने अंतिम सामन्यात विजेतेपद पटकावले. तसेच महाराष्ट्र, गुजरात, गोवा या तीन राज्याचे नेतृत्व करण्याचा मान ही तिने पटकावून एक वेगळा आदर्श सर्वांसमोर ठेवला आहे.

देगाव, सांगली येथील नवोदय विद्यालयामध्ये ती इयत्ता १०वी मध्ये शिक्षण घेत आहे. मागील महिन्यात ९ ते ११ ऑक्टोंबर दरम्यान छत्तीसगड, रायपूर येथे झालेल्या टेबलटेनिस स्पर्धेत तिने विजेतेपद पटकावले. या अगोदर तिने कोकण विभागात घेण्यात आलेल्या टेबल टेनिस स्पर्धेत उपविजेतेपद, टेबल टेनिस असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेत चारवेळा विजेतेपद तसेच राज्यस्तरीय स्पर्धेतही विजेतेपद पटकाविले.

टेबल टेनिस नैपुण्याबरोबरच ती शैक्षणिक क्षेत्रात आघाडीवर आहे. शालेय स्तरावरील शिष्यवृत्ती परिक्षा व अन्य स्पर्धा परीक्षांमध्येही तिने नावलौकिक प्राप्त केला आहे. तिचे वडील माधव यादव हे शिक्षक असून ते ही उत्कृष्ठ व्हॉलिबॉलपटू आहेत. त्यांनी अतिशय प्रतिकुल परिस्थितीतून मार्गक्रमण करीत आपल्या मुलीलाही घडवले आहे. कादंबरीने अवघ्या १४व्या वर्षी मिळवलेले यश आपल्या तरूणाईसाठी, खेळाडूंसाठी प्रेरणादायी असून सातारा जिल्ह्याचे नाव एका वेगळ्या उंचीवर नेवून ठेवले आहे.

❑ ❑ ❑ ❑

## चारोळी

कु. स्नेहल घाडगे
बी.ए. भाग - ३

आठवण येता तुझी कधी
मन सैरभैर होते.
तुझ्या सहवासासाठी मग ते
फुलपाखरू होते.

एकामागून एक दिवस
येतो नि जातो.
सुख-दुःखाच्या स्वप्नांशी
नातं आपलं जोडून जातो.





# तरुणाईच्या वाटेवर



कु. संजीवनी शिंदे
बी.ए.भाग-२

प्रचंड अभ्यास, प्रचंड व्यायाम, अवांतर वाचन करण्याच्या तारूण्याच्या वयात तरूणांच्या उर्जेची वाट चुकलेली आढळते. ती वाट कितीही प्रयत्नांनी पुन्हा सापडणार नसते. ती उर्जा पार्टी करणे, मारामाऱ्या करणे यामध्ये वाया जाते. नेमके योग्य ज्ञान तरूणांना निवडता येत नाही. तारूण्याच्या उंबरठ्यावर विवेकशून्य होऊन चुकीच्या निर्णयाने जीवन भरकटण्याचा धोका असतो. आपले तारूण्यभान हरवून आपले कान बंद करणारे तरूण आपले तेच खरे करणारे असतात. पोटापुरते शिक्षण घेऊन एखादी कागदी पदवी घेऊन नोकरी मिळवता येते. परंतू प्रतिष्ठा, प्रसिद्धी मिळवण्यासाठी काहीतरी वेगळे, असामान्य करायचे असते, पण ज्ञानाची तहान त्यांना कधीच लागत नाही.

तारूण्याच्या वाटेवर...
वाचनालयाच्या उंबरठ्यावर
कवितेच्या लाटेवर
कथांच्या काठावर

अशी परिस्थिती आजकाल किती तरूणांची होते हे सांगणेच कठीण. शिखराच्या आणि घसरण्याच्या वाटा एकमेकांच्यात घट्ट बांधून असलेलं हे वय पुन्हा येणारं नसतं. कोणत्याही नवीन शब्दाची गुगलवरून माहिती मिळवून त्या शब्दाची चव संपवून टाकणारे तरूण मनाला कल्पनांचे पंखच फुटू देत नाहीत. मग स्वैरपणे उडणे तर दूरचीच गोष्ट.

व्हिडिओ लायब्ररीत कॅसेट बदलण्यासाठी धावपळ करणाऱ्या याच तरूणांना हे माहित नाही की, जगाच्या लायब्ररीत त्यांच्या आयुष्याचे पुस्तक असेच धुळ खात पडणार आहे. फेसबुकवर तासनतास बसणाऱ्या आजच्या तरूणांना आत्मचरित्र हा शब्द नवीन वाटतो. ही शोकांतिकाच आहे. मोठमोठ्या लेखकांची पुस्तके वाचनालयात जळमटलेली आहेत. एखाद्या भिकाऱ्याने मंदिरासमोर भिक मागावी तशी ही पुस्तके 'मला वाचा ना' म्हणून भिक मागत आहेत. हे न वाचणारे तरूण जीवनाच्या महाभयानक प्रवासातून कसे वाचणार ?

पिकनिक स्पॉटवर जाऊन रम्य निसर्गाचा आल्हाददायक अनुभव घेणाऱ्यांची गर्दी कमी तर व्हॉटसॲपवर इमेज पाठवण्यासाठी फोटो काढणाऱ्यांचीच गर्दी जास्त असते. फेसबुकवर कोणाला किती लाईक्स मिळणार यात स्पर्धा करणारी तरूण पिढी जीवनाच्या स्पर्धेत हारणार हे स्पष्ट दिसतंय. अशा तरूणांचे आयुष्य देव कधीही फॉरवर्ड करणार नाही. गुगलवर तासन् तास बसणाऱ्या तरूणांनो गुगलवर स्वतःचे नाव सर्च करून पहा, आपण कुठे आहोत ते कळेल. तारूण्याच्या वाटेवर सारे काही अतिशय कठीण झाले आहे. युवकांनो, जगाच्या बाजारात जा, मगच तुम्हाला जग समजेल. 'जग' ही एक रंगभूमी आहे. त्या रंगभूमीमध्ये आपले स्थान निश्चित करता आले पाहिजे. त्यासाठी सतत वाचन, नव-नवीन शोधण्याची वृत्ती, जगण्यातला प्रामाणिकपणा आणि कष्ट करण्याची वृत्ती असेल तर आपले जीवन समाजमय बनेल असा मला विश्वास वाटतो.

❑ ❑ ❑ ❑

# पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील

कु.सुप्रिया घाडगे
बी.ए.भाग-३



रत्ना वा मौक्तिका मूल्य मुळी नुरे ।
रमणीची कूस जिथे नृमणिखनी ठरे ॥

असे जे माझ्या महाराष्ट्रभूचे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी आपल्या 'महाराष्ट्र गीतात' वर्णन केले आहे, ते खरोखरच यथार्थ आहे. या महाराष्ट्रात वेळोवेळी अशा व्यक्ती जन्माला आल्या की, त्यांच्या कार्याच्या तेजापुढे कोट्यावधी रत्नेही निष्प्रभ ठरावीत. असाच एक रत्न या विसाव्या शतकाच्या पुर्वार्धात जन्माला आला आणि तो म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील.

आण्णांचं मूळ घराणं मुडबुद्रीच. मुडबुद्री हे कर्नाटकातल्या मंगलोर तालुक्यातल छोटस गाव. देसाई हे त्यांचे आडनाव. कर्मवीरांचे पूर्वज नशीब आजमवण्यासाठी महाराष्ट्रात आले व ऐतवडे बुद्रुक, जि.सांगली येथे स्थिरावले. पुढे त्यांच्या घराण्यात पाटीलकी आली. त्यामुळे त्यांचे देसाई हे आडनाव जाऊन पाटील हे आडनाव रूढ झाले.

पायगौंडा पाटील आणि गंगाबाई या दांपत्याच्या पोटी भाऊरावांचा जन्म कुंभोज गावी आश्विन शु. ५ ललित पंचमी या दिवशी म्हणजे २२ सप्टेंबर १८८७ या साली झाला. भाऊराव जन्मताच सशक्त होते. जसे जसे दिवस जात होते तस तसे भाऊराव अंगापिंडानं वाढत होते. भाऊराव बेडर होते. भिती त्यांना माहित नव्हती. एकदा ते नदीत पोहायला गेले असताना डोहातून सुसर बाहेर आली. त्यांचे सगळे मित्र घाबरून पळून गेले. एकटे भाऊराव तिथे निश्चलपणे उभे होते. भाऊराव बंडखोर होते. अन्यायाची त्यांना प्रचंड चीड होती. अन्याय करणारा मग कितीही मोठा असो ते त्याच्याविरूद्ध पेटून उठत. भाऊरावांच्या आई गंगाबाई एकदा पाणवठ्यावर पाणी भरण्यासाठी गेल्या होत्या. अनेक ब्राह्मण स्त्रियांना वारंवार विनवण्या करूनही त्यांना पाणी कुणी देत नव्हतं. भाऊरावांना या अवहेलनेची चीड आली. त्यांनी आपल्या सारख्याच बंडखोर मित्रांना गोळा केलं आणि विहिरीचं पाणी शेंदायला सुरूवात केली. त्या स्त्रियांना पहात राहण्याखेरीज गत्यंतर उरलं नाही.

भाऊरावांच्या वडिलांची, पायगौंडा पाटलांची नोकरी फिरतीची असल्यानं भाऊरावांचं प्राथमिक शिक्षण सांगली जिल्ह्यातल्या विटा या गावी झालं. विट्यात पुढच्या शिक्षणाची सोय नव्हती. भाऊरावांना पुढच्या शिक्षणासाठी कोल्हापूरला पाठवण्यात आलं. भाऊराव जरी अभ्यासासाठी राहत असले तरी अभ्यासाकडे त्यांचं पूर्ण दुर्लक्ष होते. खेळ आणि सार्वजनिक कार्य यातच ते गुंग असत. भाऊराव इंग्रजी सहावीत नापास झाले आणि त्यांच शिक्षण थांबले. भाऊरावांना वय अठरा वर्षे झालं तेव्हा त्यांच्यासाठी वधुसंशोधन चालू झालं. मुली पहाता पहाता कोल्हापूरातल्या कुंभोज गावची आदगोंडा पाटलांची मुलगी आदाक्का पायगौंडा पाटलांच्या घरातल्या सगळ्यांना आवडली. जैन समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे या वधूवरांचा विवाह समारंभ १९१२ साली धुमधडाक्यात साजरा झाला. कुंभोजची 'आदाक्का' ऐतवड्याच्या पाटलांच्या घरची 'लक्ष्मी' झाली.





एकदा भाऊरावांच्या जीवनाला प्रचंड कलाटणी देणारी घटना घडली. पायगौंडा पाटलांच्याकडे पाहुणे आले होते. ते दुपारी जेवायला बसले. गंगाबाई आणि लक्ष्मीबाई त्यांना जेवण वाढत होत्या. तेवढ्यात त्यांनी पायगौंडा पाटलांना सहज विचारले 'तुमचे चिरंजीव भाऊराव काय व्यवसाय करतात.' तसे ताडकन पायगौंडा पाटील म्हणाले 'काही करत नाही. दोन वेळा खातो आणि गावभर फिरतो.' सासऱ्यांनी आपल्या पतीचा केलेला हा अपमान लक्ष्मीबाईच्या जिव्हारी लागला. चटकन त्यांच्या डोळ्यात पाणी आलं. आपल्या वडिलांनी आपल्या पत्नीदेखत केलेला अपमान भाऊरावांच्या काळजात रूतला. काही करून दाखवावं म्हणून त्यांनी घर सोडलं आणि ते सातारला निघून आले. विचार करता करता आपण शिकवण्या घ्यायच्या अस ठरवलं. शिकवण्या घ्यायच्या म्हणजे त्या विषयाचं ज्ञान हवं यासाठी त्यांनी शहरातील विद्वानांकडे जाऊन त्यांनी शिकायला सुरूवात केली. अभ्यासात कधीच यश न मिळालेल्या भाऊरावांना या शिकवणीच्या व्यवसायात अपूर्व यश मिळालं. भाऊरावांचं नाव सगळीकडे होऊ लागले. पाटील मास्तर म्हणून ते साताऱ्यात नावाजले जाऊ लागले.

ग्रामीण भागामध्ये शिक्षणाची पुसटशी जाणीव नसतानाही तेथे शिक्षणाची जाणीव त्यांनी निर्माण केली. तळागाळातील गोरगरीब समाजाची अवस्था अत्यंत दयनीय होती. गोरगरीब मुलांच्या शिक्षणाच्या उन्नतीकरिता शिक्षण संस्था स्थापन करणे गरजेचे आहे आणि अशी संस्था स्थापन करायचं ठरलं. सामान्य जनता म्हणजे रयत आणि या रयतेला शिक्षण देणारी संस्था म्हणून या संस्थेच नाव 'रयत शिक्षण संस्था' असं ठेवण्यात आलं. ४ ऑक्टोंबर १९१९ रोजी विजयादशमीच्या दिवशी या संस्थेची स्थापना काले या गावी झाली.

एखाद्या कार्याची सुरूवात करणे सोपे असते परंतू सातत्याने पुढे चालू ठेवणे तितकेच कठीण असते. सुरवातीच्या काळात दुधगाव, नेर्ले, काले येथे जी वसतिगृहे सुरू केली होती. तेथील मुलांच्या जेवण्याखाण्याची, पुस्तके, वह्या, पाटी, दप्तर या शैक्षणिक साहित्याच्या खर्चाची सोय करणे अत्यंत कठीण काम होते. परंतू भाऊरावांनी त्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये मोठ्या जिद्दीने सर्व अडचणींवर मात केली. गावागावातून, घराघरातून आपल्या कार्याचा प्रसार व प्रचार केला आणि समाजाचे पाठबळ मिळवले. रयत शिक्षण संस्था म्हणजे एक वटवृक्ष आहे, जो यांच्या छायेखाली येतो, त्याला विसावा मिळतो. म्हणूनच अण्णांनी संस्थेचे 'वटवृक्ष' हे बोधचिन्ह ठरविले.

वटवृक्षाच्या या छायेखाली विद्यार्थ्यांची संख्या हळूहळू वाढत गेली. त्यांच्या खर्चाची सर्व जबाबदारी भाऊरावांवर असल्याने ते सतत मदत मिळवण्यासाठी प्रयत्नशील असत. अनेक मित्रांनी, धनिक, व्यापाऱ्यांनी त्यांच्या या शैक्षणिक कार्यास मदत केली. अण्णा वसतिगृहाच्या खर्चासाठी धान्य व पैसे गोळा करण्यासाठी वारंवार फिरतीवर जात असे. त्यावेळी वसतिगृहाची सर्व व्यवस्था वहिनींना पाहावी लागे. वहिनी 'सर्व विद्यार्थ्यांच्या माता' झाल्या होत्या. प्रत्येक विद्यार्थ्यास वाटे, वहिनींचे आपल्यावर प्रेम आहे. इतक मोठं वसतिगृह चालवायच म्हणजे अवघड काम होत. पूर्वी वसतिगृह चालू असताना भाऊराव स्वतः काही ना काही व्यवसाय करत. त्यांचा येणारा पैसा वसतिगृहासाठी वापरत पण पुढे भाऊरावांचं व्यक्तिगत उत्पन्न कमी होत गेले तेव्हा भाऊरावांकडे किर्लोस्कर कंपनीचे काही शेअर्स होते ते वेळोवेळी भाऊराव विकत गेले. शेअर्स संपल्यानंतर त्यांचं लक्ष लक्ष्मीबाईच्या दागिन्याकडे गेलं. लग्नात लक्ष्मीबाईंना त्यांचे बंधू कलगौंडा पाटलांनी गळ्यात जवळजवळ नव्वद तोळ्यांचे दागिने घातले होते. शेअर्स नंतर वसतिगृहाच्या अडीनडीप्रमाणे लक्ष्मीबाईच्या गळ्यातील एक एक दागिना कमी होऊ लागला.

भाऊराव पहाटे उठत. एका हातात कंदिल आणि दुसऱ्या हातात काठी घेऊन मुलांना पहाटे उठवून अभ्यासाला बसवत. मुलांची प्रगतीपुस्तक पहात. कुणाला कमी मार्क असतील तर वरच्या वर्गातल्या मुलाला त्याचा अभ्यास घ्यायला सांगत. एकदा भाऊराव फिरतीवर गेले होते. त्यावेळी वसतिगृहाची परिस्थिती अत्यंत बिकट होती. वसतिगृहातल सर्व धान्य अगदी कडधान्यही संपली होती. व्यापारी पूर्वीची उधारी जास्त राहिल्याने उधार द्यायला तयार नव्हते. वसतिगृहातील पोरं उपाशी राहण्याचा प्रसंग आला होता. सुरुवातीला काय करावं ते त्यांना समजेना. थोडा विचार केल्यावर त्यांच्या मनानं काही तरी निर्णय मनाशी ठाम केला. वसतिगृहातील रेक्टरीला बोलावून घेतलं आणि गळ्यातील अखेरचा दागिना सौभाग्य अलंकार मणीमंगळसूत्र काढलं आणि त्यांच्या हातात देत त्या म्हणाल्या, 'सोनाराकडे जा, हे गहाण ठेव आणि पैसे आण.' त्यातून धान्य, मीठ, मिरची, तेल घेऊन ये. काही झालं तरी पोरं उपाशी राहता कामा नयेत. ३० मार्च १९३०ला वसतिगृहातील मुलांची आई त्यांना सोडून दूर निघून गेली कधीच परत न येण्यासाठी.

कष्टाविना ज्ञान दिल्यास त्यांची किंमत वाटत नाही असे भाऊराव मानत. कमवा, शिका आणि शिकवा हे त्यांचे धोरण होते. भाऊरावांनी मुलांना 'कमवा व शिका' हा मंत्र दिला. 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' हा कानमंत्र मुलांना दिला. वंचितांचे शिक्षण, संमिश्र वसतिगृहे आणि राष्ट्रीय एकात्मता, परिवर्तनवादी समाज आणि सार्वत्रिक शिक्षण हा ध्येयवाद पूर्ण करण्यासाठी भाऊरावांनी व 'रयतेने' स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय आणि समता या पंचसूत्रीचा अवलंब केला. शिक्षण संस्थासाठी जागा, धन व गुणी विद्यार्थी आणि गुणी शिक्षक मिळवण्यासाठी भाऊराव अखंड हिंडत. अशा भटकंतीत त्यांनी अनेक हिरे मिळवले आणि त्यांना पैलू पाडले.

कर्मवीरांना, स्वत:ला उच्च शिक्षण घेता आले नव्हते. तरीही त्यांनी शिक्षणकार्य हातात घेतले आणि महात्मा फुले यांच्यासारखीच मनाची व वृत्तीची उदारता ठेवून ते वाढविले. म्हणून ते महाराष्ट्राचे 'कर्मवीर' झाले. राष्ट्रपतींनी त्यांना 'पद्मभूषण' किताब देऊन त्यांच्या सेवेचा गौरव केला. पुणे विद्यापीठाने 'डी.लिट' पदवी देऊन त्यांचा सन्मान केला. पण बहुजन समाजाने त्यापूर्वीच त्यांचा गौरव त्यांना 'कर्मवीर' असे संबोधून केला होता.

कर्मवीरांनी नोकरीच्या निमित्ताने दुर्गम, दुष्काळी डोंगराळ भाग पायी तुडविला होता. महात्मा फुले यांच्या प्राथमिक शिक्षणाविषयीची तळमळ व प्रयत्न त्यांनी अभ्यासले होते. मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय जोपर्यंत होत नाही व ते त्यांना मिळत नाही तोपर्यंत त्यांचे उच्च शिक्षण करणे व होणे अशक्य आहे हे त्यांनी जाणले होते. म्हणून त्यांनी प्राथमिक शाळा काढण्याकडे प्रथम लक्ष केंद्रित केले. स्वत:च्या माध्यमिक शाळा नसल्यामुळे कर्मवीरांना आपल्या शाळेमध्ये असा नवनिर्माण प्रयोग राबविता येत नव्हता म्हणून कर्मवीरांनी माध्यमिक शाळा सुरू करण्याचा संकल्प केला. संस्थेच्या शाळेतून माध्यमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी कोल्हापूर, पुणे, सांगली, मुंबई इ. ठिकाणी पाठवावे लागे. त्यांचा खर्च संस्थेमार्फत कर्मवीरांना करावा लागे. त्याचा मोठा ताण कर्मवीरांना सहन करावा लागे. त्यामुळे त्यांनी कॉलेज स्थापन करण्याचा निश्चय केला. रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील एक सर्वात मोठी शिक्षण संस्था आहे. कर्मवीर आण्णा कायम भविष्यकाळाचा विचार करीत असत. गावोगावी शाळा काढताना त्यांनी स्थानिक कार्यकर्त्यांना या कार्यात सहभागी करून घेतले. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेचे कार्य सुरळीत चालू राहिले.

१९१९ साली रयत शिक्षण संस्थेच्या रूपाने कर्मवीरांनी एक छोटेसे रोपटे लावले. त्याचे संगोपन केले. त्याचे कालांतराने महान वटवृक्षात रूपांतर झाले. हे करताना कर्मवीरांनी ऊन, वारा, पाऊस यांची तमा बाळगली नाही. आयुष्यात अनंत अडचणी आल्या. जीवघेणी संकटे आली. कर्मवीरांनी त्यावर सर्व शक्तीसह मात केली. वटवृक्ष कधीही कोसळू दिला नाही. अविरत कष्टांचा परिणाम कर्मवीरांच्या प्रकृतीवर झाला. रक्तदाब, हृदयविकारासारख्या व्याधी जडल्या. शेवटी पुण्याच्या ससून रुग्णालयामध्ये त्यांना दाखल करण्यात आले. ९ मे १९५९. शिवजयंतीचा दिवस. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज ही कर्मवीरांची स्फूर्तीस्थाने. कर्मवीरांचा शिवजयंतीच्या दिवशीच मृत्यू झाला. ज्ञानाचा यज्ञ मांडणाऱ्या एका महान ऋषीचा अंत झाला. रयतेचा तारणहार रयतेला पारखा झाला.

*ज्ञानाची ज्योत फुलविणाऱ्या त्या कर्मवीर भाऊरायांना व 'रयत शिक्षण संस्थेला' माझा कोटी-कोटी विनम्र प्रणाम !*

❑ ❑

## आई



जीवनाच्या वाटेवर जगताना
जीवनाच्या वाटेवर जगताना
आईसारखे प्रेमळ कुणी नाही
सुख दु:खात साथ देते आईची वाणी.

तिच्या पाखराला होता काही
किती वेदना तिच्या मनी
तिच्या मायेपुढे फिके सर्व काही.

देव्हाऱ्यातील देवासमान असते आई
गेले उडून पाखरू घरट्यातूनी.
वाट पाहताना तळमळते
हीच आई, हीच आई.

वादळातून सुखरूप जाण्याची
हिंमत देते फक्त आई.
तिच्याच पदराखाली मिळते
सर्व दु:खांना मुक्ती.

**कु. रश्मी जाधव**
**बी.ए. भाग - ३**

❑ ❑

## एक महान कर्मयोगी कर्मवीर भाऊराव पाटील

कुंभोज गावात घडले दिव्य वारणा नदीच्या काठी.
कर्मवीरांनी घेतला जन्म गंगाबाई मातेच्या पोटी.
वटवृक्षाच्या सावली खाली
भरवली ज्ञानाची गंगा.
अण्णांनी स्थापन केली
'रयत शिक्षण संस्था'
ज्ञानदिपांच्या फुलवल्या ज्योती
प्रकाश उजळला दाही दिशांनी.
विद्येची गंगा पोहचवावी गोरगरिबांसाठी
हा ध्यास त्या महान कर्मवीरांनी घेतला हाती.
गोरगरिबांना शिक्षण देऊन
दिली प्रेरणा शैक्षणिक कार्याला.
पुण्यश्लोक कर्मवीर झाले स्वर्गवासी
९ मे १९५९ला
असे हे महान कर्मवीर समाजहितचिंतक
आता पुन्हा होणे नाही.
नि:पक्ष समाज उद्धारकाने
उजळून टाकल्या दिशा दाही.

**कु. सोनाली घाडगे**
**बी.ए. भाग - ३**

# माझ्या आयुष्यातील मैत्रिणींसोबतची पहिली पाणीपुरी !



कु.स्नेहल लामजे
बी.ए.भाग-२

मैत्रिणींनो, तुम्हाला माझ्या आयुष्यातील मैत्रिणींसोबतचा एक किस्सा, एक 'मुव्हमेंट' शेअर करायचंय. खूप दिवसांची गोष्ट आहे. असं सांगून तुम्हाला 'बोअर' नाही करणार ! काय सांगू मैत्रिणींनो, रात्रीची वेळ होती. फार रात्रीची पण नाही, सायंकाळचे ७ वाजले होते. त्यावेळी आमच्या मैत्रिणींच्या ग्रुपने ठरवलं, चला आज काही तरी मस्त चमचमीत खाऊया. थोडं बाजारात फिरून आलो. जवळजवळ दिवे लागलेच होते. म्हटलं चला आयुष्यात थोडा 'टाईमपास' करूया. सायंकाळचे पाऊणेसात वाजले होते. आम्ही सर्व मैत्रिणींनी एक रोड गाड्यांना चकवा देत पार केला. मध्येच एखाद्या गाडीचा प्रकाश तोंडावर पडे ! आम्ही त्या गाडीवाल्याला पुटपुटत आणि हसत कसा तरी तो रोड पार केला. जवळ जवळ 'तारेवरची कसरतच' म्हणावी लागेल ती. रोडवर नुसते हॉर्नच ऐकू येत होते.

रोडच्या बाजूलाच एक पाणीपुरीवाल्याचा आमच्यासाठी गाडा-कम-हॉटेल होता. मोठ्या मुश्किलीने आम्ही साऱ्याजणी तेथे पोहचलो. उभे राहण्याशिवाय पर्याय नव्हता. कारण त्या पाणीपुरीवाल्याने काय 'फाईव्हस्टार' नव्हतं बांधलं, आमच्यासाठी आम्ही येणार म्हणून..... ! रोडवरच असल्याने काही 'टवाळ मुले' तेथे पाणीपुरी खाण्याच्या बहाण्याने मुलींना पाहण्यासाठी येत असतील. त्यांच्या सोबत त्याचं 'घोडं' ते तर पाचवीलाच पुजलेलं. ते लोक 'त्या' घोड्यावर फाईव्ह स्टारमध्ये बसल्यासारखे ऐटीत बसले होते. आम्हाला नाईलाजाने उभेच रहावे लागले. उभे राहून पाय दुखू लागले. नाही तरीपण पाणीपुरी खायचीच होती ना !! महाराणी असल्यासारखे सगळ्यांनी ऑर्डर दिली !!

ऑर्डर केल्याप्रमाणे दोन प्लेट भेळ व ३ प्लेट पाणीपुरी भेटली. पाणीपुरीची प्लेट भेटल्यासरशी आम्ही गपागप खायला सुरूवात केली. आवासल्यानंतर एखाद्याने तोंडात काहीतरी कोंबावं तसं आम्ही पाणीपुरी तोंडात बसत नसतानाही कोंबत होतो. मध्येच त्या पाणीपुरीवाल्याला खुश करण्यासाठी पाणीपुरी खरंच किती छान आहे ! असं म्हणत होतो. आम्ही सगळ्या जणींनी महिनाभर उपाशी राहून एखाद्याने ताट पटापट संपवावं तशी पाणीपुरी पूर्ण संपवली. खाता येत नसतानाही ती पाणीपुरी सर्व चेहऱ्या बाजूने अंगावर सांडत संपवली. पोट गच्च झालेलं. आता नंबर येतो ते बिल भागवण्याचा. तो किस्सा तर खूप गंमतीशीर !!!!

तोंड पुसत आपलेआपले पैसे एकजणीजवळ गोळा केले. एकूण बिल ७० रू. झाले. जिच्याकडे गोळा केले होते तिने ते घाईघाईने पाणीपुरीवाल्याला फक्त तिच्याजवळ गोळा झालेले ५० रू दिले. कारण आम्हाला तेथून पटकन सटकायचं होतं. तिथे मुलांचीही गर्दी खूप वाढत चालली होती. तसेही ते पाणीपुरीवाला मधून मधून आमच्याकडे बघायचा कारण बिचाऱ्याकडे थोड्याच डिश होत्या. त्यात आम्ही गप्पा मारत मारत खात असल्याने त्याला डिश कमी पडत होत्या. त्याने तर आम्हाला मनातल्या मनात शिव्याही दिल्या असतील. ज्या दोघींनी भेळ घेतली होती, त्या शेवटी राहिल्या. त्यांनाही आम्ही थोडी भेळ खाऊ लागलो. तरीही ती भेळ काही संपली नाही. म्हणून शेवटी ती भेळ घरी घ्यावी लागली. आम्ही डिश पाणीपुरीवाल्याला दिल्या आणि तेथून पटकन सटकलो. अंधार फार होत चालला होता. आम्ही खूप घाईत होतो. तेवढ्यात मागून आवाज आला "आहोऽऽ २० रू. दिलेच नाहीत !"

एखाद्याने जोरात थोबाडात मारावी तसं झालं मनात ! परत माघारी न जाता तेथेच एकमेकींना दोष देत पैसे जमवले व परत त्याला दिले. आमचा चाललेला गोंधळ पाहून तेथील सर्वजण आम्हाला हसायला लागले. आम्हाला खूप लाजल्यासारखं झालं. आमचा मोठा 'पोपट' झाला. नंतर आम्हीही सर्वजणी एकमेकींकडे पाहून जोरात हसू लागलो. कारण म्हणतात ना मैत्रीत सगळं माफ असतं. तसंही स्वतःच्या अपमानावर स्वतः हसल्यावर तो मोठा अपमान वाटत नाही आणि तसंही तो झालेला अपमान एकटीचा नव्हता. आमच्या सर्वजणींचा होता. त्यामुळे अपमानाचं ओझं खूप हलकं होतं. त्यामुळे काहीच वाटल नाही. खरंच मैत्रिणींनो, मैत्रिणींमध्ये वेळ घालवायला खूप छान वाटतं. मैत्रीचा सहवास नेहमीच हवा-हवासा वाटतो. मैत्रीत खूप मोठी ताकद आहे. असा हा मैत्रिणींसोबतचा पाणीपुरीचा किस्सा सफल झाला.

❑ ❑ ❑ ❑

## कन्यारत्न



आले कन्यारत्न पोटी
दु:ख झाले साऱ्या जगी.
काय सांगू माझी व्यथा
किती सोसायचे तरी.

सुख दु:खाचे सोबती
नाही कुणी वाटेवरी.
आयुष्याच्या दारी आहे
एकटीच उभी.

साथ सोबत कुणाची
त्या डोळ्यातील आसवांची
ना सोबत सोडून जाणार ते कधी.

जन्म घेतला लेकीचा
म्हणूनी आईला येई कमीपणा.

स्वाभिमानाने जगेन
ताठ मानेने राहिन.

न झुकणार या जगी
कर्तव्य गाजविण सर्व लोकी.
न बळी पडेन समाजाला
या रूढी परंपरेला.

मग होईल आनंद
थोर आपण भाग्यवंत.
'कन्यारत्न' आले पोटी
कोटी कोटी धन्यवाद
असे म्हणेल माय-बाप

कु. तेजस्विनी संकपाळ
बी.ए. भाग - २

# मरणयातना

कु.आरती कुडाळकर
बी.ए.भाग-१

स्वयम उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी त्याच्या मामाच्या गावी आला. त्याच्या मामाच्या शेजारी एक जाधव कुटूंब राहत होतं. या कुटूंबातील अनिता नावाच्या स्त्रीला हृदयविकार असल्याचे तिचा नवरा प्रकाश याला कळते. या दोघांना विनायक, अमृता नावाची दोन मुले असतात. प्रकाशला त्याच्या बायकोला हृदयविकार आहे याचा राग येतो व तो तिच्याशी वाईट प्रवृत्तीने वागतो. असेच ३, ४ वर्ष जातात आणि नंतर प्रकाश दुसऱ्या बाईच्या सोबत लोकांना दिसतो. खुप दिवस असेच चालू असते. पण एक दिवस प्रकाश त्या बाईसोबत पळून जातो व लग्न करतो. पहिली बायको व दोन मुले असताना तो असा विचित्र वागतो.

३ महिन्याने प्रकाश त्याची दुसरी बायको सोनाली हिला घेवून त्याच्या राहत्या घरी येतो. अनिताला राग येवून पण काहीच फायदा नव्हता. कारण तिच्या घरातील दुसरी माणसे तिला तिच्या आजाराबद्दल हिणवतात व समजवतात. तिच्या नंतर तिच्या मुलांचे संगोपन कोण करणार ? म्हणून ती शांत राहते व तिच्या सवतीचा स्वीकार करते व जे व्हायला नको ते होते. तिच्या सवतीमुळे तिचा नवरा, मुले तिच्यापासून दुरावतात. आधीचं जीवघेणा आजार असताना जवळची माणसं कायमची दुरावत होती. तिच्या तब्येतीसाठी तिला चांगल्या हॉस्पिटलमध्ये नेत नव्हते. शेजारची मदत करत होते तर ती पण तिच्या घरातील माणसे स्वीकारत नव्हती. योग्य औषधउपचार नसल्याने तिची प्रकृती अधिकच बिघडली. ती आज मरेल कि उद्या अशी स्थिती निर्माण झाली. दूर गावची माणसं, तिचे नातेवाईक तिला भेटून जाऊ लागले. ती अंथरुणावर पडून मरणाची वाट पाहू लागली.

एक दिवस स्वयम तिला पाहिला गेला होता तर ती जोर-जोरात किंकाळत होती. तिला रक्ताची उलटी झाली. तिला हॉस्पिटलमध्ये नेले तर डॉक्टरांनी ''आता काहीचं होऊ शकतं नाही'' हे उद्गार काढले. तिला परत घरी आणले. अनिताला अफाट वेदना होत होत्या. ति तिच्या नवऱ्याला म्हणाली, ''अहो बघा ना मला खुप दुखतयं माझं पोट..... ! आणि जोर-जोराने रडायला लागली. तिचा नवरा मात्र फक्त पाहत राहिला.

त्या घरातील फक्त तिचा लहान दीर तिच्या वेदनांची कदर करत होता. पण त्याच्या त्या काळजीला तिच्या नंदेने वेगळाच अर्थ लावला. अनिताचे आणि तिच्या लहान दिराचे अफेअर आहे असे तिने सगळ्या गल्लीत उठवले. हेच नाही तर अनिताची मुलगी अमृता १२ वर्षांची. तिला तिच्या नंदेने तमाशात नेले. अनिताची इच्छा होती अमृताने खूप शिकावे, पोलिस व्हावे. पण तस नाही झाले. दिवसेंदिवस तिच्या वेदना वाढत होत्या. हृदय आतल्या आत विरत जात होतं. तिचं पूर्ण शरीर सुजलं होतं. रक्ताच्या उलट्या सारख्या करत होती. हे सगळ स्वयम पाहत होता. त्याला ते सहन नाही झाले. तो गावी परत आला. दोन दिवसांनी फोन आला ''अनिता वारली.''



स्वयम पुन्हा मामाच्या गावी अनिताला शेवटचं पाहावं म्हणून आला. अनिताची नणंद, सवत, जाऊ, सासरा मोठं-मोठाने रडत होते. नणंद म्हणजे पुनम मी काय केले अनितासाठी ते रडत रडत सांगत होती. स्वतःचे गुणगाण कळत-नकळत करत होती. तिची सवत सोनाली म्हणाली 'अनिता का मला सोडून गेलीस; काळजी करू नकोस. तुझी मुलं तिच माझी मुलं.' अनिताची मुलगी अमृता म्हणाली 'तु माझी आई नाहीस. आज माझी आई मेली. इथून पुढे मी माझ्या काकूला आई म्हणेन पण तुला नाही. अनिताचा मुलगा विनायक याला माहित नव्हत काय झालं. कारण तो ५ वर्षांचा होता. पण तो रडत होता. आई गेल्याचे त्याला कोठे तरी जाणवत होतं. स्वयमला वाटलं अनिता मेली ते बरच झालं. कारण अनिताला होणारा शारीरिक व मानसिक त्रास स्वयमने पाहिला होता. पण त्याने पाहिले ते तर माणुस जातीलाच लाजवणारे होते. अनिता मेली नव्हती. तिच अंग सुजल्यामुळे आणि हृदय आतल्या-आत चिरल्यामुळे तिला काहीच हालचाल करता आली नव्हती. स्वयमने अनिताला सुक्ष्म नजरेनं पाहिलं; तर तिच तोंड, डोळ्याची पापणी कळत-नकळत हालत होती.

स्वयम दुसऱ्या लोकांना सांगणार तोच अनिताच्या नंदेनं तिचं तोंड दाबलं. तिच्या नाकात कापूस घातला. तिचे कान आवळून बांधले आणि तिची मांडी घालून तिला डांबाला बांधली. श्वास कोंडून सुद्धा अनिता ३,४ तास जिवंत होती. कारण मेल्यानंतर चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात. अंग थंड होतं. पण हे सगळे बदल तिच्यात ३,४ तासाने झाले. हे नक्की स्वयमचा भास होता कि हे सगळं खरं तेच समजत नव्हतं. मनाने मेलेल्या अनिताला शरीराने वाचवण्यात काहीच अर्थ नव्हता. म्हणून स्वयमने काहीच आरडा-ओरडा केला नाही. अनिताच्या मरणाला तिचं सर्वच कुटुंब हिस्सेदार होते. अनिता मेली याचं दुःख कोणालाच नव्हतं. पण अनिता फक्त २५ वर्षे जगली याच वाईट मात्र वाटत होतं. अनिताने खुप कमी वयात खूप त्रास, वेदना सहन केल्या होत्या. काही लोक तिच्या मृत्यूसाठी देवाला दोष देत होते, पण यात देवाचा काय दोष. अनिताला तर तिच्याच कुटुंबियांमुळे मनाचा आणि शरीराचा त्याग करावा लागला. अनिताने खूप वेदना सहन केल्या होत्या. तिने ज्या मरणयातना सहन केल्या त्या वेदना होत्या कि 'मरणयातना' हे मात्र तिलाच माहित... !

❑ ❑

## 'कवडसे.....चांदण्याचे !'

डोळे पुसायला कोणी असेल तर,
रूसायला बरे वाटतं.....
ऐकणार कोणी असेल तर
बोलायला बरे वाटतं.....
आशेला लावणार कोणी असेल तर
वाट बघायला बर वाटतं.....
आणि,
आपल्यावर मरणार कोणी असेल
तर,
मरेपर्यंत जगायला बरं वाटतं.....

❑ ❑

किती बरे झाले असते,
भविष्य प्रत्येकाला ठरविता आले असते.
आपले कोण ?
परके कोण ? हे ओळखून,
त्याच्यावरती प्रेम करता आले असते...

❑ ❑

काही आबोलक्या भावना
शब्दाच्या कुशीत निजतात.....
कधी हास्यात फुलतात
तर, कधी आसवात भिजतात.....

कु. अपर्णा यादव
बी.ए. भाग - २

# जीवनातील हास्य हरविले तर... ?

कु.स्नेहल यादव
बी.ए.भाग-१



माणूस जेव्हा जन्माला येऊन त्याच्या जीवनात प्रत्येक प्रकाराच्या कृतीला तो महत्त्व देत असतो. जेव्हा आपण भांडणातून आपला राग व्यक्त करतो, तसेच आपणाला जेव्हा आनंद होतो, तेव्हा आपल्या चेहऱ्यावर उमटलेलं हसू आपण दुसऱ्याजवळ व्यक्त करतो. माणूस भांडणाला, रागाला, दिसण्याला अशा प्रत्येक प्रकारच्या कृतीला महत्त्व देत असतो. पण क्वचितच माणसे आपल्या स्वतःच्या हसण्याला महत्त्व देत असतात.

हास्य म्हणजे तर काय ? हास्य म्हणजे हसणे. जेव्हा आपणाला आनंद किंवा हास्य विनोद झाला असेल तेव्हा जे आपल्या चेहऱ्यावर दिसते ते हसणे असते. जी व्यक्ति कधीच हसत नाही. त्यांना काय कळणार हसण्याचे महत्त्व. पण जी व्यक्ति सतत हसतमुख असतात त्यांनाच जीवनातील हास्य माहित असणार, असं म्हटलं जातं की,

"आनंदात असताना हास्य
तुमचे असावे, तुम्ही सर्वजण
दुःखात असताना थोडे तरी अश्रू
माझे असावेत, मी एकाकी असताना
सोबत तुम्हां सर्वांची असावी, अशीच
तुमच्या सर्वांची माया माझ्यावर असावी.

खरचं आपल्या मानवी जीवनात हसणे हे आलेच पण...त्यामुळे मानवी जीवनावर काही परिणाम तरी होणार नाही ना... ? त्यांची वयोमर्यादा तरी उलटणार नाही ना... ? असे प्रश्न माझ्या मनामध्ये सतत चालू राहिले.

पण नाही...? हे असले विचार केले म्हणू प्रश्नांची उत्तरे मिळाली ना... ? मला जे प्रश्न पडले ते योग्यच होते.

खरचं माणूस जेव्हा हसतो तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर तेज दिसते; म्हणून माणसाने अगदी खळखळून हसले पाहिजे. जसा समुद्र खळखळ त्याच्यापेक्षा जोरात हसले पाहिजे. समुद्र खळखळ की समुद्रातील लाटेला वाटतं हसण्यासाठी किनाऱ्याकडे जावावं पण किनाऱ्याला मात्र वाट जमिनीचच असतं. 'मी' मला 'तु' तुला असं समुद्रातील लाटेचं व किनाऱ्यालगतच्या जमिनीचं असतं असं म्हणतात की,

"लाटेच असतं एकच उद्दिष्ट,
कसंही करून किनाऱ्याला गाठावं.
किनाऱ्याला नसेल का वाटत लाटेकडे
धावावं कदाचित वाटत असूनही त्याला
ते शक्य नसावं, आधार द्यायचं
वचन त्याचं जमिनीशी पक्क असावं."

असं या समुद्राच्या किनाऱ्याचं आणि त्या किनाऱ्याच्या काठावर आपटणाऱ्या लाटेचं असतं. पण व्यक्तिच तसं नसतं. एखादी व्यक्ति ध्येयाकडे जायचं आहे ना ? तर ते स्वतःच जायचं आणि तेही सगळ्यांच्याबरोबर हसतमुखाने पुढे जायचं. क्वचितच एखादी व्यक्ति अशी असेल की ती दुसरा पुढे जात असताना त्याला मागे ओढते कारण तो कधीच मनाने, स्वभावाने, निर्मळ व स्वच्छ





नसतो आणि कधीच तो हसतमुख नसतो. या विचारांनी त्याच्या चेहऱ्यावर हास्य भाव कधीच नसतो. तो सतत विचारांच्या पायऱ्या दिवसेंदिवस मोजत असतो. जर रस्त्याने जात असलो तरी मोठ्या आजी, आजोबा बऱ्याच अशा व्यक्ति दिसल्या तर आपण थोडेतरी स्मित हास्यात त्यांचे स्वागत केले पाहिजे.

माणसाच्या जीवनामध्ये सुख-दुःख, धैर्य, आयुष्याची वाटचाल, कयास, डोळ्यातील अश्रू, नाती-गोती, परिस्थिती, नियत, स्वप्न, लढाई, काळ-वेळ, दुसऱ्याच्यात गुरफटणे, जिव्हाळा या गोष्टी येतातच पण त्याच्यात एक महत्त्वपूर्ण अशी ही गोष्ट असते; ती हास्यवंदन... ! नेहमी माणसे स्मितहास्य झाले नाही तर हास्यवंदन करायला विसरत नाही. मला म्हणावेसे वाटते की,

जीवन हे असच असतं
धैर्याने सामोरे जायचं असतं,
कधीही मागं सरायचं नसतं.
सुखदुःखांनी भरलेलं असतं,
जीवन हे असंच असतं.
वाटलं नव्हतं जन्माला आले तेव्हा,
जीवनात आयुष्याची वाट घेवून जाईल कुठं.
कारण वाट अवघड आहे. म्हणून घाबरायचं नसतं.
जीवन हे असचं असतं.
एक मात्र मनी कयास होता
विद्यार्थीनीमध्येच माणूस बनेन
हाच ध्यास होता.
कारण माणसाचं जगणं माणुसकीचं असतं,
जीवन हे असंच असतं.
लढली कित्येकदा जिंकली स्वतःशीच
एक दिवस माझा असेल ठरवलं होते मनाशीच.
कारण विद्यार्थीनी वयातच ते स्वप्न पहायचं असतं.
जीवन हे असचं असतं.

या शालेय जीवनात बऱ्याच आठवणींतून जाताना ओलावल्या डोळ्याच्या कडा, जिव्हाळ्याची नाती आणि मैत्रिणी दुरावताना पडतो अश्रूंचा सडा.
कारण येणाऱ्या अश्रूंना कधी थांबवायचं नसतं.
जीवन हे असच असतं.
परिस्थिती माणसाला बनविते सर्व काही
नियतीपुढे कुणाचाच इलाज चालत नाही.
कारण नियतीला सोडून कधीच वागायच नसतं.
जीवन हे असचं असतं.
दुर होताना मैत्रिणींपासून मन ठसाठसा रडत होते.
डोळ्यातून येणाऱ्या अश्रूंना डोळेच आडवत होते.
कारण दूर होताना मन मात्र तिथेच ठेवायचं असतं.
जीवन हे असचं असतं.
भेटलात भविष्यात कधी
तर मैत्रिणींनो तसेच पुढे जावू नका.
बोलावे अशी इच्छा नाही
पण हास्यवंदन करायला विसरू नका.
कारण हृदय आहे जवळ म्हणून
श्वास घ्यायचा कधी विसरायचं नसतं.
जीवन हे असच असतं.
धैर्याने सामोरे जायचं असतं.
कधीही मागे सरायचं नसतं.

काही व्यक्ति अशा असतात; जर समोरचा रागावला असला तरी तो व्यक्ति त्याचा राग आपल्या हास्यातून घालवत असतो, पण काही व्यक्ति तर अशा असतात की, त्या दुसऱ्याचे मन आपल्या हास्यातून वळवून घेत असतात. माणूस भरपूर प्रकार हास्यातून व्यक्त करत असतो. जर जास्त अत्यानंद झाला असेल तर खळखळून हसतात आणि जर एखादी बातमी चांगली असून ती आपल्याला आवडली नाही, तर सगळ्यासमोरचे चेहऱ्यावरती थोडं हसू असतं. काहीजण मनातून विनोद घडला तर ते हसू

दुसऱ्याला न दाखवता आतून हसू येते ते हसू असतं. मानव आपले जीवन कधी-कधी हसण्याच्या प्रकारातून जगत असतो. हसलो तर चेहऱ्यावर तेज येते आणि आपले मन मोकळीक बनते आणि जगात सर्वच मानव जातीच्या जीवनात सुखदु:खाचे पाऊल पडत असते. त्याला सावरण्याची इच्छा शक्ती लागते. तेव्हा माणसाला आनंद होतो तेव्हा तो पूर्ण लख्ख प्रकाशात खुलून दिसतो. पण.....

जेव्हा माणसाच्या अंगावर एखादा डोंगर कोसळल्यागत दु:ख कोसळले तर माणूस हसणंच विसरतो. म्हणूनच मी म्हणेन की..... ?

हास्य हरवलं तर... ? मानवी जीवन कसे जगावला मिळेल आपल्याला... ? जर असं झालं तर माणूस एकमेकांशी संवाद साधू शकणार नाही आणि मानवी प्रेम, जिव्हाळा, माया, ममता, वात्सल्य याच गोष्टी नाहीशा होतील या जगातून आणि आपल्या माणसातील आपलेपणा नाहिसा होईल.

कारण माणसाच्या जीवनातीलच हास्य हरवणार आहे. आता हेच घ्या ना ? आपल्याच जवळ झालेल्या शहरातला बॉम्बस्फोट ते शहर म्हणजे 'मुंबई' मला या आपल्या देश बांधवांच्याबद्दल एवढेच म्हणावेसे वाटते की,

''माणसा माणसा कधी होशिल तू माणूस''

जगत असताना धर्माला मध्ये नको आणूस, नसतो मानवाला कोणताही धर्म, मोठे बनवते त्याला स्वत:चेच कर्म, पण एक वेळ अशी येते माणूस म्हणून जगत असताना वाटे माणसाचीच भीती. जगात सर्वात श्रेष्ठ काय असा वाद असताना पैशापुढे फिकी पडतात सगळी माणुसकीची नाती. दहशतवादी कृत्यामध्ये 'मुंबई' सारी हादरली. पाषाण हृदयी माणसे सुद्धा त्यावेळी भेदरली. ताजमध्ये उठला होता आगीचा डोंब. आतील माणसांनी जीवाच्या आकांताने मारली बोंब. निष्पाप असे अनेकजण होते, आयुष्य संपणार आहे क्षणात त्यांना माहित नव्हते. आगीच्या त्या वणव्यात लढता-लढता अनेकजण शहिद झाले. माणूसकीच्या रक्षणासाठी त्यांचे लाखमोलाचे प्राण गेले. धन्य आहे. ती माता. जिनं त्यांना जन्म दिला. धन्य आहे, ती सखी जिनं त्यांच्याबरोबर संसार केला.

संसाराच्या सुखामध्ये भरगच्चं होती माया. आयुष्य वाढण्याआधी अनेक पिलांची हरवली होती छाया. वाढणाऱ्या वृक्षाची पालवी आता खुंटली होती. माणसांचे डोळे पाण्याने डबडबले होते. माणूसकीच्या या हत्याकांडात खंबीर आता रहायला हवं. शोधात तुमच्या निघालो आहोत. आता जगच काय ? पण.....लावण्यासाठी तुम्हांला पुरणार नाही. दहशतवादाविरूद्ध होवू या एकत्र सारे.

आपल्या देशासाठी माझे प्राण नेहमीच असतील अर्पण, या धक्यातून सुद्धा त्यांनी ते दु:ख झेलले म्हणूनच त्याच्या सगळ्या भावना गंभीर होवू लागल्या.

''दु:खी साऱ्या भावना, आतल्या आत गिळायच्या ओठात साखर पेरून. फक्त गोड स्मृती जपायच्या. कितीही संकट आली तरी हसत सामोरे जायचं. निर्धारात लढून पुढची वाट काढत रहायचं. आशा-अपेक्षा साऱ्या मनातल्या मनात लोपवायच्या. मदतीचा हात पुढे करून कोसळणाऱ्या भिंती सावरायच्या. माणूस म्हणून जन्मल्यावर चांगल्या गोष्टी करायच्या. चंदनाप्रमाणे झिजून सुगंधी स्मृती मागे ठेवायच्या.....''

खरचं कसं असताना मानवाच्या जीवनात दु:ख काय आलं ही गेलं ही आणि सुख सुद्धा येतं ही जातं ही, पण यात बऱ्याच आठवणी असतात. त्यातल्या काही दु:खाच्याही आणि सुखाच्याही असतात. म्हणून आनंदाला पारावार नाही. म्हणून त्याच्या चेहऱ्यावर हसूच हसू उमटत असतं.

पण..... ? पण जर आपल्याच आयुष्यात जर एकदम आभाळ कोसळलं तर ते दु:खातच आपण व्यक्त करतो. तेव्हा आपल्या चेहऱ्यावर हसूच नसतं. म्हणूनच म्हणेन की,

''वाट धावते धावते
चढ उतार घेऊन.
दु:ख गिळते हसत
आत हुंदका पिऊन''

या उक्तीप्रमाणेच मला काय म्हणायचे आहे ते तुम्हांला समजलेच असेल. तुम्हीच बघा ना... ?

जेव्हा सुख येते तेव्हा दु:खाच्या गोष्टी कधीच आठवत नाहीत आणि जेव्हा दु:ख येते तेव्हाच आपल्याला दु:खाच्या गोष्टी कळतात हा सगळा नियतीचा खेळ असतो म्हणूनच मी म्हणेन.

'जीवनातील हास्य हरवलं तर..... ?' आणखी काय होईल आणि या जीवनाच्या हरवलेल्या हास्याचा माझ्या जीवनातील शेवट..... ?

❑ ❑ ❑ ❑

## एक होतं माळीण गाव

एक होतं माळीण गाव, त्यावर घातला नियतीनं घाव
माती सोबत साखरझोपेत, गाडला गेला सारा गाव ।। १ ।।

माणूस-काणूस गुरं ढोरं, काहीच तिथं न्हायलं न्हाय
भांडी-कुंडी जमीन जुमला, सारं काही माती मोल ।। २ ।।

दिवस रात्र खोदती ढिगारे, मातीमधुनी निघती प्रेते
कोणकोणाचे ना कळले नाते, अश्रूंचे हे पाट वाहते ।। ३ ।।

कितीक प्राणी, कितीक माणसे या मातीने केली मोठी
या मातीच्या कुशीत पिकले, हे सारे माणिक मोती ।। ४ ।।

असा कसा रे, नियतीचा घाव, मातीमोल झाला माळीण गाव
माती सोबत साखर झोपेत, गाडला गेला सारा गाव ।। ५ ।।

कुणीच नसते कुणाचे वाली, आपण आपले प्राक्तन घ्यावे
सोबत घेऊन जगत रहावे, या नियतीच्या रखवालीखाली ।। ६ ।।

एक होतं माळीण गाव, त्यावर घातला नियतीने घाव
एक होतं माळीण गाव, त्यावर घातला नियतीने घाव ।। धृ ।।

कु. स्नेहल घाडगे
बी.ए. भाग - ३



## वर्षा

नाही आषाढाची ओळ
नाही श्रावणांच्या सरी
कोरड्या या दऱ्याखोऱ्या
झाले उघडे डोंगर
जंगलाची ओळख
किती गेली दूरवर
उघड्या शेतात
रानातल्या झोपडीत
बिबट्याचे येणे जाणे
आता गावच्या वस्तीत.

कु. मोनाली पिसाळ
बी.ए. भाग - २

# पाल खंडोबा देवस्थान : धार्मिक स्थळ



कु.कोमल पवार
बी.ए.भाग-३

मध्यजीव महाकल्पातील (मेसोझोइक इरा) ज्युरासिक कालखंड हा डायनोसॉरचा सुवर्णकाळ होता. या कालखंडामध्ये कोंबडीएवढ्या डायनोसॉरपासून ते प्रचंड, धिप्पाड, आकाराच्या डायनोसॉर्सचा संचार भूतलावर होता. हे प्राणी जसे शाकाहारी होते, तसेच हिंस्त्र व मासाहारीही होते. काही जमिनीवर राहत तर काही जलचर होते आणि काही तर चक्क आकाशात उड्डाण करीत. अचानक हे प्राणी नाहिसे झाले आणि मागे ठेवून गेले. आपले जीवाश्मरूपी अवशेष ! त्या जीवाश्मावरूनच संशोधकांनी या प्राण्याची रचना, आकार, प्रतिकृती तयार केली. त्यांच्या पावलांच्या ठशावरून ते एकटे राहत की कळपाने यांचा वेध घेतला. त्यांच्या सवयी, वर्तन, आहार, पर्यावरण, प्रजोत्पादन आदी सर्व गोष्टींचा अभ्यास करून ठोस निष्कर्ष काढले. आज जगभर डायनोसॉर्सच्या जीवाश्मांचा शोध घेतला. अनेक संग्रहालयमध्ये सांगाड्याची मांडणी केलेली दिसते. अमेरिकेच्या न्यूयॉर्क येथील नॅचरल हिस्ट्री म्यूझियमच्या तळमजल्यावरील डायनोसॉरचा भव्य-दिव्य सांगाडा पाहूनच माणूस दिपून जातो. जिवंतपणी हा प्राणी किती महाकाय असेल यांची कल्पना येते.

हे प्राणी का नामशेष झाले असावेत ? त्या काळात तर मानवाचा विकासही झालेला नव्हता. त्यामुळे कोणत्या नैसर्गिक कारणांमुळे ह्या प्राण्यांनी जगाचा कायमचा निरोप घेतला असावा, हे संशोधकांनी अजूनही न उलगडलेले कोडे आहे.

मी भूगोलशास्त्राची विद्यार्थीनी ! शिकत असून या अद्‌भूत प्राण्यांबद्दल मला जिज्ञासा निर्माण झाली म्हणून प्राध्यापकांच्या साहाय्याने माहिती मिळविली आणि लेख मांडण्याचा प्रयत्न केला.

**डायनासोरचे वर्गीकरण :**

सर रिचर्ड ओव्हेन यांनी १८४२ मध्ये सरीसृप प्राण्यांमधील नव्या गटाला डायनोसॉरिया (Dinosauria) हे नाव दिले गेले. १८८७ पर्यंत हे नाव प्रचलित होते. त्यानंतर मात्र सिले (Seeley) ह्या ब्रिटीश सरीसृप जीवाश्मतज्ज्ञाने ओळखले की डायनोसॉर हे दोन ठळक गणांचे सरीसृप आहेत. त्या दोन्ही गणाचा विकास थिकोडोंट या पूर्वजांपासून झाला असेही त्यांनी नमूद केले. तसेच या दोन स्वतंत्र गणाना सिले याने सॉरिशिया आणि ऑर्निथिशिया अशी नावे दिली आणि आजही त्यांचा उपयोग डायनोसॉर्सच्या वर्गीकरणासाठी केला जात आहे.

परंतू, त्या काळी डायनोसॉरबद्दल कुणालाही पुरेशी माहिती नव्हती कारण ते भूगर्भात जीवाश्मांच्या रूपातच दडलेले होते. त्यामुळे त्यांचे वर्गीकरण करण्याचा प्रश्नच नव्हता. पण जेव्हा डायनोसॉर्सचा शोध सुरू झाला तेव्हा ओघाने त्यांच्या हाडांवरून सांगाड्यावरून त्यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास सुरु झाला.



अशा रितीने डायनोसॉरचे वर्गीकरण पाच श्रेणी मध्ये करण्यात आले ते पुढील प्रमाणे आहेत.

**सॉरिशिया गण :**

या गणात शाकाहारी व मांसाहारी डायनोसॉर्स होते. तसेच द्विपाद सॉरिशियन्सचे पाय पक्ष्यांच्या पायाप्रमाणे होते आणि पायाचे पहिले बोट मागच्या बाजूस वळलेले होते. तीन बोटे पुढे होती, त्याला पाचवे बोट मात्र नव्हते. त्यांना थेरोपोडा म्हणजे पशूंचे पाय असलेले प्राणी असे अयोग्य नाव दिलेले होते. ते मांसाहारी होते.त्यांचे दात चाकूसारखे घट्ट बसलेले होते.

चतुष्पाद सॉरिशियन डायनोसॉर्स हे सर्वात मोठे, अजस्त्र होते. त्यांचे आकार व पाय हत्तीसारखे होते. त्या डायनोसॉर्सची मान, लांब, निमुळती व शेपूट चाबकासारखी होती तसेच त्यांच्यातला एक प्रकार सेम्नोसॉरिया हा मंद गतीने चालणाऱ्या डायनोसॉर्सचा उपगण आहे. सेम्नोसॉरिया डायनोसॉर्सचे शरीर लांबीच्या मानाने हलके होते. त्यांची लांबी १५ ते ३० फूट होती. त्यांचे तोंड चोचीप्रमाणे व गालातील दात तीक्ष्ण होते.

**थेरोपोडा :**

या उपगणात हिंस्त्र व मांसाहारी डायनोसॉर्सचा समावेश होतो. हे प्राणी द्विपाद असून त्यांचे पुढील पाय हातांप्रमाणे होते व त्यांचे दात तीक्ष्ण होते व त्याचा उपयोग मांसाचे लचके तोडण्यासाठी ते उपयुक्त होते. शेपटी मजबूत व लांब होती. पाठीवर जाड खवले होते.

**सिल्युरोसॉरिया :**

यात लांब मानेचे व हलक्या देहाचे डायनोसॉर्स होते. सिल्युरोसॉरियाचा अर्थ पोकळ शेपटीचा सरडा. उत्तर ट्रियसिक ते उत्तर क्रिटेशियस (सुमारे २० ते ९ कोटी वर्षापूर्वी) काळातील मोठ्या थरात या लहान प्राण्यांची प्रजाती आढळली. त्यांचे वजन कमी, मान निमुळती व लांबलचक तोंडात लहान व तीक्ष्ण दात व पुढील पायांचा उपयोग ते हाताप्रमाणे करत.

**कार्नोसॉरिया :**

प्रचंड आकाराचे, हिंस्त्र, शिकारी वृत्तीचे, द्विपाद मांसाहारी डायनोसॉर्स यात होते. ॲल्लोसॉरस, सेरॅटो सॉरस टायरॅनोसॉर याचा या उपगणात समावेश होता.

**ऑर्निथिशिया :**

या गणातील सर्व डायनोसॉर्स शाकाहारी होते. त्यांचा अत्युच्च विकास ज्युरासिक काळात झाला होता. या गणाचे तीन उपगण पडतात त्यात,

१) पक्ष्यांच्या पायाप्रमाणे पाय असलेले डायनोसॉर्स,
२) चतुष्पाद स्टेगोसॉर,
३) चिलखती देह असलेले ॲकिलोसॉर

या गणात,कॅम्प्टोसॉरस, प्रोटोसेराटॉप्स्, इग्वानोडॉन इ. डायनोसॉर्सचा समावेश होतो.

**डायनासोरचे प्रकार**

भूतलावर अनेक विविध प्रकारचे डायनोसॉर्स होते. काही डायनोसॉर द्विपाद होते, तर काही डायनोसॉर्स चतुष्पाद होते तर काही कोंबडीच्या आकाराएवढे, तर काही प्रचंड धिप्पाड देहयष्टीचे डायनोसॉर्स होते. त्यांच्या आहारावरून ही गोष्ट लक्षात येते की, त्यात काही शाकाहारी होते तर काही मांसाहारी होते. तर शिकारी प्रवृत्तीचेही होते. त्या काळी भूतलावर जवळपास ५००० जातीचे डायनोसॉर्स होते. नैसर्गिक आपत्तीमुळे जर एखादी जात जरी नष्ट झाली तरी त्या जातीची जागा लगेच दुसरी जात घेत असे, या हजारो जातींना एक विशिष्ट सामान्य नाव असे नव्हते.

काही विशिष्ट डायनोसॉर्सचे प्रकार खालीलप्रमाणे आपल्याला पाहता येईल.

**पहिला डायनासोर :**

**१) प्लेटीओसॉर (Plateosaurs)**

सर्वप्रथम भूतलावर कोणता डायनोसॉर अवतरला असेल ? तो म्हणजे प्लेटीओसॉर होय.

काही पुरातत्व शास्त्रज्ञांच्या मते हा सुरुवातीचा डायनोसॉर होय. हा मोठा व भव्य व हिंस्त्र आणि त्याची लांबी ६ मीटर होती. परंतु तो हिंस्त्र नव्हता. तो शाकाहारी द्विपाद डायनोसॉर होता. तो शरीराने बोजड होता. तसा तो बुद्धीनेही मंदच होता. शरीराच्या मानाने त्याचे डोके खूपच लहान त्यामुळे त्याच्या कवटीतील मेंदूही लहान होता. म्हणूनच तो चतुर व बुद्धिमान नव्हता.

२) छोटे व मध्यम आकाराचे डायनासोरस् :

सर्वच डायनोसॉर्स काही भीमकाय नव्हते. काही तर अगदी कोंबडीच्या पिलांएवढे लहान आकाराचे होते. त्याचे उत्तम उदाहरण म्हटले तर कॅम्पोसोग्नॅथस (Compsognathus) डायनोसॉर. हा डायनोसॉर बव्हेरियामध्ये उत्तर ज्युरासिक १५०५ कोटी वर्षांपूर्वीच्या काळात तळ्यांच्या किनाऱ्यावर राहत होता. हा डायनोसॉर मांसाहारी होता. न्युफिओसॉरस नावाचा ४ मीटर लांबीचा डायनोसॉर होता. इतर द्विपाद डायनोसॉर्समध्ये तो दिसत होता. अशा प्रकारच्या प्राण्यांना सर्वसामान्यपणे ऑस्ट्रिच सारखा म्हणून डायनोसॉर असे म्हणत. त्यांचे पाय बळकट आणि मजबूत होते म्हणून त्यांना वेगाने पळता येत होते. तो प्राणी, कीटक, फळे व इतर प्राण्यांची अंडी खात असे. त्यांचे नाव डायनोसॉर्स ओव्हीरॅप्टर (Oviraptor) म्हणून परिचित होता.

३) ॲलोसॉरस (Allosaurus)

उत्तर ज्युरासिक काळात उत्तर अमेरिकेत सापडलेला ॲलोसॉरस हा डायनोसॉर्स जवळ-जवळ ११ मीटर लांबीचा होता. हा भयानक डायनोसॉर मोठा तर होताच पण तो मांसभक्षीही होता. भक्ष्याचा पाठलाग करून हा डायनोसॉर त्यांच्या मजबूत पायांनी भक्ष्यावर झेप घेऊन त्यांना पकडत असत. म्हणूनच त्याला "झेप घेणारा डायनोसॉर" या नावानेही ओळखले जात असे. हा डायनोसॉर धिप्पाड, भीमकाय व हिंस्त्र होता. अमेरिकेतील ज्युरासिक [illegible] हा ॲलोसॉरसच्या निम्म्या आकाराचा होता.

सर्वात मोठा व हिंस्त्र डायनोसॉर :

४) टायरॅनोसॉरस (Tyrannosaurus)

भूतलावर त्या काळी सर्वात मोठा डायनोसॉर कोणता होता ? असा प्रश्न जर कुणी विचारला, तर सर्वात पहिल्यांदा धिप्पाड व हिंस्त्र टायरॅनोसॉरस यांचे नाव येते. कारण त्यांची नाकापासून ते शेपटीपर्यंत त्यांची लांबी १६ मीटर आणि उंची ६ मीटर होती. तर त्यांची कवटी १.५ मीटर लांब होती. टायरॅनोसॉरसचा जबडाही एवढा मोठा होता की तो उघडल्यानंतर १ मीटर रुंद होत असे. त्याचे तोंड एवढे विशाल होते की कल्पनाही येत नाही. हा डायनोसॉर क्रूर व हिंस्त्र होता. मजबूत दात व नखे असलेले पाय यांच्या साहाय्याने तो भक्ष्याला मारून त्यांची चिरफाड करत असे. तसेच त्याचे अवयव आत्मरक्षणासाठीही उपयुक्त होते.

चिलखतधारी डायनासोर :

५) स्टेगोसॉरस (Stegosaurus)

हा डायनोसॉर चिलखती देह असलेला प्राणी होता. चालण्यासाठी तो त्यांच्या चारही पायांचा उपयोग करत असे. पण त्यांचे मागचे पाय मोठे आणि पुढचे पाय लहान व आखूड असल्यामुळे त्यांचे डोके जमिनीला टेकायला येत होते. या डायनोसॉरचे खास व लक्षात पटकन येणारे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या डोक्यापासून ते मध्यावरून ते शेपटीच्या टोकापर्यंत जाणाऱ्या चकत्यांच्या दोन रांगा असत. शेपटीच्या टोकाला मात्र चार धारदार काटे होते. हा डायनोसॉर ७ मीटर लांबीचा होता. त्यांच्या शरीरातील [illegible] वाढ मेंदूच्या आकारमानाच्या वीसपट झालेली होती. यांचा विचार करता शास्त्रज्ञांच्या मते डायनोसॉरमध्ये दोन मेंदू असावेत. एक म्हणजे डोक्याच्या कवटीतील मेंदू व दुसरा म्हणजे पाठीच्या मणक्यातील मेंदू असे दोन मेंदू या प्राण्यामध्ये कार्यरत होते.



सर्वात लांब डायनोसॉर :

६) डिप्लोडोकस (Diplodocus)

डिप्लोडोकस हा भूतलावर चालणारा सर्वात लांब आणि एकमेव डायनोसॉर होता. त्यांच्या नाकाच्या टोकापासून ते शेपटीच्या टोकापर्यंत त्यांची लांबी ३० मीटर एवढी होती. यापेक्षा लांब प्राणी या भूतलावर अस्तित्वात नाही. हा दिसायला तर अत्यंत विचित्र होता. हा डायनोसॉर जलचर असावा. जलाशय व दलदलीच्या प्रदेशात वाढणाऱ्या वनस्पतीवर तो आपली उपजीविका करीत असे. हा अजस्त्र व धिप्पाड होता. त्याचे वजन जवळपास २५ टनांपर्यंत होते. या डायनोसॉर्सचे लांब शेपूट संरक्षणासाठी अत्यंत उपयुक्त होते. त्यांचा संपूर्ण सांगाडा शिप क्रीक व्योमिंग येथे बोन केबीन क्वारीपासून १५ केमी. लांब दूरवर मिळाला आणि तो सांगाडा कार्नेगी म्युझियम, पिट्सबर्ग येथे उभारला आहे. त्याचे दात मात्र फारच कमकुवत होते.

अजस्त्र डायनासोर :

७) ब्रॉंटोसॉरस (Brantosaurus)

'अजस्त्र' सॉरोपोडांपैकी सर्वात अधिक परिचयाचा डायनोसॉर म्हणजे ब्रॉंटोसॉरस तथा ॲपेटोसॉरस हा प्राणी होय. हा डिप्लोडोकसचा जवळचा नातेवाईक म्हणून ओळखला जातो. या दोन्ही डायनोसॉर्सचे सांगाडे जगातील अनेक संग्रहालयांमध्ये उभारलेले आहेत. या डायनोसॉर्सची लांबी २६ मीटर होती आणि तो सर्वात जाड होता. त्यांचे वजन जवळपास ३५ टनांपर्यंत होते. हा प्राणी जास्त करून समुद्रामध्ये राहत असे. जलाशयात राहिल्यामुळे त्यांचे शत्रूपासून आपोआप रक्षण होई. या प्रकारचे सॉरोपोड त्यांचा बहुतेक वेळ दलदलीत, सरोवरात व नद्यात घालवीत असे. या डायनोसॉर्सची कवटी कमी वजनाची होती व त्यांच्या मुखात अनेक मोठे दात असल्याने खाणे सोपे होते.

ढालधारी डायनासोर :

८) प्रोटोसेराटॉप्स (Protoceratops)

मानेवर हाडांची झालर असलेला हा पहिला सेराटॉप्सियन होता. त्यांच्या अंगावर मानेपासून मागच्या बाजूला वाढलेल्या हाडांची झालर असे. त्यांची लांबी दोन २ मीटरपेक्षा कमी होती. त्यांच्या डोक्यावर शिंगे नव्हती. परंतु त्यांच्या तोंडात दात होते. क्रमविकासामुळे या डायनोसॉर्सच्या आकारमानात वाढ झाली. त्यांना मोठी व भीतीदायक शिंगे आली. उत्तर अमेरिकेतील मोनोक्लोनिअसच्या नाकावर एकच लांब शिंग होते.

काटेरी चिलखतधारी डायनासोर :

९) ॲंकिलोसॉरस (Ankylosaurus)

हा डायनोसॉर्स म्हणजे जणू चिलखतधारी रणगाडेच होते. त्यांच्या शरीरावर हाडांचे आवरण होते. या डायनोसॉर्सचा उदय क्रिटेशियस काळात झाला. हे प्राणी कासवासारखे बुटके आणि चपटे शरीराचे होते. त्यातील काही डायनोसॉर्सची लांबी ७ मीटर होती. तर काहींची ५ मीटर लांबी होती आणि त्यांची उंची १.५ अशी होती. आत्मरक्षणासाठी निसर्गाने या प्राण्याला जणू सैन्यातील रणगाड्याप्रमाणेच मजबूत बनविले होते. म्हणूनच त्यांना मध्ययुगीन युगातील "रणांगणावरील रणगाडा" म्हटले जाते. हा प्राणी शाकाहारी असावा असे मानले जाते. परंतु त्याबद्दल निश्चित माहिती कोणत्याही शास्त्रज्ञाला माहिती उपलब्ध नाही.

❑ ❑ ❑ ❑

# भावनिक बुद्धिमत्ता करिअरसाठी आवश्यक

कु.राजश्री कुम्हार
बी.ए.भाग-२



समाजात विविध क्षेत्रात निर्माण होणारे ताणतणाव लक्षात घेता मानसिक रूग्णांची संख्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर मानसोपचारतज्ज्ञांची निकड मोठ्या प्रमाणावर जाणवू लागली आहे. भविष्यातील या क्षेत्रातील व्यापकता लक्षात घेऊन अनेकांनी मानसोपचारतज्ज्ञ होण्याकडे आपला कल ठेवायला हवा......

माणसाला आयुष्यात मार्गदर्शनाची गरज पदोपदी जाणवते. ते कारकिर्दीविषयी दिले जाणारे किंवा आयुष्यातील विविध टप्प्यांवर येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी दिले जाणारे मार्गदर्शन असो, या दोन्हींची उपयुक्तता सारखीच आहे. कारकिर्द घडवण्याच्या दृष्टीने हा एक चांगला पर्याय मानायला हवा. बदलत्या काळाच्या गरजा ओळखून कारकीर्दीची उपाययोजना करायची असेल तर इतर अनेक क्षेत्रांप्रमाणेच मानसशास्त्रज्ञ किंवा सल्लागार या भूमिकेतही शिरायची तयारी असायला हवी. माणसाला जीवनाच्या विविध टप्प्यांमध्ये वेगवेगळ्या समस्या जाणवत असतात. त्यावर उपाययोजना करण्यासाठी वेगवेगळे मार्ग अवलंबले जातात. त्यात मानसशास्त्रीय उपचार घेण्याची निकड आता अधिकाधिक जाणवणार आहे. घरचे वाढते प्रश्न, स्पर्धात्मक जगातील धावपळीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या किंवा येणारे नैराश्य अशा अनेक कारणांसाठी मानसोपचाराची गरज वाढणार हे लक्षात घेऊनच नव्या क्षेत्रात कारकीर्द घडवण्याची संधी घ्यायला हवी.

हे शिक्षण पदवी परीक्षेत अंतर्भूत असतेच. बी.ए., बी.एस्सी. अशा पदव्या मिळवताना या विद्यार्थ्यांना मानसशास्त्र हा विषय निवडता येतो. पुढे त्यात कारकीर्द घडवायची असेल तर पदव्युत्तर अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत. तुम्हाला आवडेल अशा विषयात हे शिक्षण मिळवण्याचीही सोय आहे. मानसशास्त्र या विषयात अनेक विषयांचा अंतर्भाव होत असल्याने कोणत्या विषयासाठी मार्गदर्शक म्हणून काम करायचे हे उमेदवारानेच ठरवायला हवे.

मानसशास्त्राच्या विविध शाखा आहेत. त्यात प्रामुख्याने औद्योगिक मानसशास्त्र, गुन्हेगारी मानसशास्त्र, कुटूंब मानसशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र, क्रीडा मानसशास्त्र आणि कारकीर्द मानसशास्त्र असे भाग पाडता येतात. त्यापैकी एका विषयात स्पेशलायझेशन करून तुम्ही मानसशास्त्र विषयाचे सल्लागार होऊ शकता. मानसोपचारतज्ज्ञ आणि त्यांचे कार्यक्षेत्र याची निश्चित माहिती अनेकांना उपलब्ध नसते.

मानसोपचारतज्ज्ञ नक्की काय करतो याची जाणीव नसते. मानसोपचारतज्ज्ञही डॉक्टरही असतो. फक्त तो मनाचे व्यवहार नियंत्रित करतो इतकाच काय तो फरक. माणसाचे मन आणि त्यांचे वर्तन यांचा निकटचा संबंध असतो. तो व्यवस्थित राहावा हे प्रामुख्याने मानसशास्त्र तज्ज्ञाला पहावे लागते. त्याच्या अंगी संवाद कला, तर्कशुद्ध विचार करण्याची कुवत आणि समोरच्या माणसाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेण्याची आणि त्याला तितक्याच शांतपणे समजावण्याची कला अवगत पाहिजे. तरच या क्षेत्रात प्राविण्य मिळवता येईल.

वेगवेगळ्या शाखांमध्ये मानसशास्त्रज्ञ म्हणून काम करताना त्या त्या शाखेची माहिती असणे आवश्यक ठरते. उदा. औद्योगिक क्षेत्रात मानसशास्त्रज्ञ म्हणून काम पाहताना त्या क्षेत्रात येणाऱ्या नव्या समस्यांना मार्गदर्शकाने समजावून घेतले पाहिजे. सध्या औद्योगिक क्षेत्रात स्वेच्छानिवृत्तीधारकांची लाट मोठ्या प्रमाणावर आली आहे. त्यांना मानसिक आधाराची गरजही अधिक आहे. अकाली घेतलेली निवृत्ती आणि योग्य गुंतवणूकीअभावी निर्माण होणाऱ्या समस्या यामुळे मानसिक संतुलन बिघडण्याची शक्यता सर्वाधिक असते. अशा वेळी त्यांचे प्रश्न काय आहेत हे समजून घेणे महत्त्वाचे असते. अशा व्यक्तींना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी कोणते उपाय योजावेत यासंबंधी या विषयात योग्य मार्गदर्शन करण्यात येते तर क्रीडा प्रकारात मानसशास्त्रज्ञाची भूमिका थोडी वेगळी असते. प्रामुख्याने खेळाडूंना नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी मानसशास्त्रज्ञाला वेगवेगळे उपाय योजावे लागतात. त्याचप्रमाणे त्याला खेळातील बारकावे तसेच खेळासाठी लागणाऱ्या वैद्यकीय उपचारांची माहिती असणेही अगत्याचे आहे. वेगवेगळ्या उपायांनी खेळाडूचे मानसिक स्वास्थ्य संतुलित राखणे ही मानसशास्त्रज्ञासमोरची कसोटी असते.

मात्र समाजात सर्वाधिक मानसशास्त्रज्ञाची खरी गरज कुठे असेल तर ती कुटूंबप्रधान समाजात. कौटुंबिक समस्या आणि त्यामुळे निर्माण होणारे ताणतणाव वाढत आहेत. अशा समस्या मुळात समस्या आहेत हेच मान्य केले जात नाही. त्यामुळे त्यांचे स्वरूप गंभीर होते. अजूनही पांढरपेशा समाजात मानसशास्त्रज्ञाकडे जावून उपचार घेणे हे कमीपणाचे समजले जाते. त्यामुळे वैवाहिक नोकरी संदर्भातील किंवा कुटूंबातील समस्यांवर मार्गदर्शनाची खरी गरज आहे. आता लोकांचा कल मानसशास्त्रज्ञाचा सल्ला घेण्याकडे हळूहळू वाढत आहे. त्यामुळे उद्या या क्षेत्रातील मानसशास्त्रज्ञाला मानाचे स्थान मिळेल यात शंका नाही.

मानसशास्त्राची निकड असणारे आणखी एक क्षेत्र म्हणजे शैक्षणिक क्षेत्र. आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहायचे असेल तर कारकिर्दीची योग्य जडणघडण होणे सर्वात महत्त्वाचे असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना वेळीच योग्य मार्गदर्शन देणे हेही मानसशास्त्रज्ञाचे काम आहे. अशा प्रकारे व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र अस्तित्वात असला तरी त्यावरील मानसशास्त्रज्ञाचा दृष्टिकोन अधिक महत्त्वाचा ठरू शकतो.

याखेरीज मुलांच्या मनातील न्युनगंड काढणे, बौद्धिक मापन करून त्याला योग्य त्या शाखेत प्रवेश घेण्यासाठी मार्गदर्शन करणे किंवा स्पर्धेचा ताण आल्यामुळे निराश झालेल्या विद्यार्थ्याला नवी उभारी प्राप्त करून देणे अशा विविध अंगांनी या क्षेत्रातील मानसशास्त्रज्ञाला काम पहावे लागते. म्हणूनच मानसशास्त्रज्ञासमोरील आव्हाने मोठी आहेत आणि त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी त्याला करावी लागणारी मेहनतही अधिक आहे.

❑ ❑ ❑ ❑

# आपला मेंदू जग कसं हलवून टाकतो

कु.ऋतुजा पवार
बी.ए.भाग-२



आपला मेंदू ही एक मिस्ट्री आहे. तो (Co-relation) कोरिलेशन कसं ओळखतो, प्रॉब्लेम्स कसे सोडवतो, तथ्य कशी लक्षात ठेवतो आणि भविष्याचं नियोजन कसं करतो ? काही माणसं इतरांपेक्षा जलद विचार कशी करू शकतात ? मेंदू तज्ज्ञांना बुद्धिमत्तेचं जीवशास्त्र शोधून काढायची आशा आहे. परंतू आश्चर्याचे धक्के बसतच राहतात.

संगीताची देणगी लाभलेल्या मुलांद्वारा बऱ्याचदा गणितीय प्रतिभा प्रदर्शित केली जाते. डॅनिईल बॉईको या सहावीतील मुलानं दोन वर्षांपूर्वीच ६० संगीतरचना कंपोज केल्या. त्यात एका ऑपेराचाही समावेश होतो. त्यानं काही कॉम्प्युटर प्रोग्रॅमही लिहिले. अध्ययनातून असं लक्षात आलंय की वाद्य वाजवणं शिकणाऱ्या लहान मुलामध्ये मेंदूच्या दोन भागांना जोडणाऱ्या कॉर्पस कॅलोसम भागात (Corps-calosum) चेतापेशींची घनता अधिक असते.

माली सोमस्टेड या आता सहा वर्षाच्या असलेल्या मुलीनं दोन वर्षापूर्वी अशी काही चित्रं रंगविली. की ती जणू आधुनिक पोक्त चित्रकारानं रंगवलेली वाटावीत. सर्जनशीलता आणि बुद्धिमत्ता एकमेकांशी निगडीत असले तरी परस्परावलंबी नाहीत. अतिशय कुशाग्र बुद्धी असलेले लोक समस्येची उकल करताना मळलेली वाट चोखाळू शकतात आणि अस्तित्वात असलेल्या पॅटर्नचा अवलंब करू शकतात. सर्जनशीलतेमध्ये वेगळ्या विचारधारेला वाव असतो. त्या वेळी मेंदू संलग्न पॅटर्नमध्ये काम करत भावभावना आणि अगदी वेगळ्या कल्पनांना एकत्रितपणे चितारत असतो.

डे ड्रिमिंग किंवा दिवास्वप्न बघणं किंवा दिवसाउजेडी वेगळ्याच विश्वात असण्यामध्ये देखील मेंदू डोळसपणे समस्येची उकल करण्याइतकाच गुंतलेला असतो. निरूद्योगी विचारप्रक्रियेच्या वेळी प्रामुख्यानं मेंदूचं काम हे नेटवर्क त्या वेळी ॲक्टिव्ह असतं. स्मृती आणि भावनांशी माहिती जोडण्याचं काम या वेळी आपला मेंदू करीत असतो आणि त्या वेळी आपल्या इम्प्रेशन्स बनवून त्यांच्याशी जुळवून घेत असतो. पंख लावूनी मुक्त उडावे : बुद्धिमत्ता कशी हालचाल करते आणि संमिलित होते.

लहानपणी खेळांमध्ये रममाण होण्यामुळे बुद्धिमत्ता वाढीस लागते. एका आंतरराष्ट्रीय संशोधन गटानं सैनिकी सेवेत असताना सुमारे १२ लाख स्वीडिश पुरूषांचं अध्ययन केलं. जे शारीरिकदृष्ट्या तंदुरूस्त (फिट) होते. त्यांचा बुध्यांकही चांगला होता. अचूक ओरिएंटल प्राप्त होण्यासाठी व्यायाम आणि हालचाल करताना मेंदू बहुधा जास्त संदेश पाठवत असावा. जेव्हा शरीर ॲक्टीव्ह असत, तेव्हा मेंदूतील रक्तप्रवाहदेखील चांगला असतो. त्याचं सर्क्युलेशनही उत्तम असतं.

प्रथम जन्माला आलेली मुल त्यांच्या लहान भावा-बहिणींपेक्षा बुध्यांक चाचणीत २-३ गुण अधिक प्राप्त करतात, असं एका नॉर्वेजियन अभ्यासातून दिसून आलय. त्यांनी सुमारे अडीच लाख तरुण लोकांच्या बुध्यांकाची चाचणी घेतली. या उपपत्तीमागे असलेल्या कारणांपैकी एक कारण संशोधकांनी सुचवलंय ते खुपच गमतीदार आहे. त्यांच्या मते, मोठ्या भावंडाला त्यांच्या लहान भावंडाना खूप स्पष्टीकरण द्यावं लागतं.

बऱ्याच वेळा अशी धारणा प्रचलित असल्याचं दिसतं. की वयानुसार भावना आणि फिलींग्जमुळे बुद्धिमत्तेवर पडदा पडतो. परंतू आज संशोधकांचं याप एकमत आहे, की स्वत:च्या भावना समजून घेणारे लोक बऱ्याचदा अधिक स्मार्ट निर्णय घेत असावेत. मात्र बहुतेक वैज्ञानिकांचं मत आहे की भावनिक 'बुध्यांकांसारखी' लोकप्रिय संकल्पना बुद्धिमत्तेला जरा जास्तच 'ओव्हर स्ट्रेच' करत असावी. शिवाय या गुणधर्माचं मापन करणं कठीण असल्यामुळे त्याचं वैज्ञानिक दृष्टीनं मुल्यांकन करणं कठीण आहे.

मोठा आणखी मोठा, सर्वात मोठा ? मानवी बुद्धिमत्तेच्या सीमारेषेची उलटतपासणी.

एक लहान मूल म्हणून मॅरलीन व्हॉस स्पांत या सध्या ६७ वर्षाच्या महिलेचा बुध्यांक जगातील सर्वात मोठा म्हणजे २२८ होता. परंतू वैज्ञानिकांच्या मते १५० पेक्षा अधिक मोठा बुध्यांक तसा काही फारसा उपयोगी पडत नसावा. इतरांच्या मते या बुध्यांक चाचण्या खरं म्हणजे खऱ्याखुऱ्या बुद्धिमत्तेच्या

❑ ❑





अंदाजापेक्षा आधुनिक जगाशी जुळवून घेत वागण्याचं मोजमाप असाव्यात. अर्थात बुध्यांक चाचण्यांद्वारा शैक्षणिक-व्यावसायिक परफॉर्मन्सचा अंदाज २५ टक्के दरानं अचूक मांडता येतो.

नेहमी अथवा वारंवार बोर्ड गेम्स खेळणं, नाचणं किंवा संगीत यामुळे डिमेन्शिया (विसराळूपणा) होण्याची शक्यता कमी होते किंवा आणखी वृद्धत्व वाढेपर्यंत पुढे ढकलली जाते. चांगली दैवी देणगी लाभलेल्या ८०० लोकांच्या अभ्यासामध्ये असं दिसलं की बुध्यांक १३५ पासून सुरूवात करून त्यापेक्षा जास्त असल्यास रोगामुळे मृत्यू येण्याची जोखीम प्रत्येक अतिरिक्त बुध्यांकानुसार दोन टक्क्यांनी कमी होते.

मानवी मेंदूला काही मर्यादा/सीमा रेषा आहेत का ? उत्क्रांतीच्या प्रक्रियेत आपला मेंदू इतका तावून सुलाखून निघाला आहे, की तो अधिक पॉवरफुल बनलाय. त्यामुळेच अभय अष्टेकरसारखे भौतिकशास्त्रज्ञ लूप क्वांटम ग्रॅव्हिटीसारख्या अत्यंत गुंतागुंतीच्या विषयांमध्ये मास्टरी मिळवताना दिसतात; परंतू मानसशास्त्रज्ञांच्या मते आपली बुद्धिमत्ता कदाचित जैविक शिखरावर पोचली असावी. काही विशिष्ट केसेसमध्येच यामध्ये आणखी सुधारणा शक्य असून कदाचित त्यासाठी अन्य कोणत्या तरी क्षेत्रात नुकसान सहन करावं लागेल.

❑ ❑

# भारतीय बँकिंगमधील अलिकडील प्रवाह

कु. अश्विनी बाळासाहेब शेळके
बी.ए.भाग-२



भारतामध्ये अलीकडील काळात मोठ्या प्रमाणात बदल होत चालला आहे. भारतात ई-बँकिंग, MICR निगम, ए.टी.एम., क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, किसान क्रेडिट कार्ड, व्यापारी बँक, डीमॅट खाते अशा नवीन सुविधा सुरु झाल्या. त्यांची माहिती खालीलप्रमाणे-

१) ई-बँकिंग-

ई-बँकिंग म्हणजे 'इलेक्ट्रॉनिक बँकिंग' होय. जेव्हा बँकेच्या सुविधांसाठी माहिती तंत्रज्ञानाची आधुनिक साधने वापरली जातात तेव्हा त्याला ई-बँकिंग असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर केला जातो म्हणून बँक व्यवहाराला ई-बँकिंग असे म्हटले जाते. ई-बँका सर्व प्रकारचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करतात.

ई-बँकिंगमध्ये इंटरनेटचा वापर केला जातो. यासाठी सर्व बँका संगणकीकृत केल्या जातात. बँकेच्या सर्व प्रकारच्या व्यवहारांची संगणकात नोंद केली जाते. इंटरनेटद्वारे देशातील सर्व बँकांचे संगणक जोडले जातात. देशभरातील कोणतीही व्यक्ती इंटरनेटद्वारे बँकेशी व्यवहार करु शकते. रक्कम खात्यावर जमा करणे, रक्कम काढणे, रकमेचे हस्तांतरण करणे यासारखे व्यवहार इंटरनेटद्वारे करता येतात. यासाठी हे व्यवहार करण्यासाठी समक्ष बँकेत जाण्याची गरज नसते.

२) MICR निगम-

MICR म्हणजे 'Magnetic Ink Character Recognition' होय. एका विशिष्ट प्रकारच्या लिपवर मॅग्नेटिक शाईचा वापर करुन छपाई केली जाते. त्यात डिजिटल माहिती अंतर्भूत असते. यामुळे धोटाळे अगर गैरवापराला प्रतिबंध होतो. सन १९६२ मध्ये अमेरिकेत अशा चेकचा सार्वत्रिक वापर झाला. MICR ला iso-2004 मानांकन देण्यात आले. MICR चेक तंत्राचा वापर भारतात सर्वप्रथम १९८० मध्ये झाला. प्रारंभी मुंबई, चेन्नई, नवी दिल्ली आणि कोलकता या शहरांत ही प्रणाली सुरु करण्यात आली. त्यानंतर देशभरात ही पद्धती लागू करण्यात आली. रिझर्व्ह बँकेतील माहिती तंत्रज्ञान विभागाने सर्वसमावेशक अशा मार्गदर्शक सूचना देऊन ही सेवा बँका आणि नियंत्रण केंद्राकडे पाठविले. MICR निगमद्वारे पैशाचे व्यवहार सुरक्षितपणे होण्यासाठी बारकोडचा अवलंब करण्यात आला. पैशांचे ऑनलाईन स्थानांतर होण्यास त्यामुळे मदत झाली.

३) ए.टी.एम.-

ए.टी.एम. हे 'Automated Teller Machine' चे संक्षिप्त रुप आहे. यालाच मराठीत 'स्वयंचलित गणक तंत्र' असे संबोधले जाते. ''ग्राहकांना पैसे देणारे व त्यांच्या पैशाचा स्वीकार करणारे बँकेतील स्वयंचलित यंत्र म्हणजे ए.टी.एम.होय.'' ग्राहकाने ए.टी.एम. सेवेसाठी अर्ज केल्यानंतर बँक संबंधित ग्राहकास 'ए.टी.एम.सभासदत्व' देते. त्याचप्रमाणे सभासदास ए.टी.एम.कार्ड देते. ग्राहक ए.टी.एम.कार्डद्वारे खात्यावरील रक्कम काढू शकतो. ए.टी.एम. कार्डावर बँकेचे नाव, क्रमांक आणि कार्ड संपण्याची अंतिम तारीख दिलेली असते. कार्डाच्या पाठीमागील बाजूस कार्डधारकाची सही आणि सूचना दिलेल्या असतात. ए.टी.एम. कार्डला सांकेतिक क्रमांक दिलेला असतो. हा क्रमांक केवळ कार्डधारकाला व बँकेला माहिती असतो. सामान्यपणे बँक, रेल्वे स्टेशनचा परिसर, एस.टी.स्टँडचा परिसर अशा वर्दळीच्या ठिकाणी ए.टी.एम. यंत्र बसविले जाते. या यंत्राद्वारे ए.टी.एम. सेवा रात्रंदिवस दिली जाते. ग्राहकाने ए.टी.एम. कार्ड यंत्रात सरकविल्यानंतर संगणकाद्वारे संबंधित ग्राहकाची खात्री पटविली जाते. त्यानंतर संगणकाद्वारे ग्राहकाला रक्कम दिली जाते. ग्राहकाला आपल्या सोयीनुसार केव्हाही पैसे काढता येतात. यामुळेच ए.टी.एम.ला 'All Time Money' असेही म्हणतात.

४) क्रेडिट कार्ड सेवा-

बँकेच्या ग्राहकांना वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी आणि बँकेच्या कोणत्याही शाखेतील खात्यावरुन पैसे काढण्यासाठी क्रेडिट कार्डचा फार उपयोग होतो. ''बँकेने ग्राहकांना विशिष्ट मर्यादेपर्यंत कर्ज रकमेची उचल करण्यासाठी उपलब्ध करुन दिलेले कार्ड म्हणजे क्रेडिट कार्ड होय.'' यालाच 'पतपत्र' असेही संबोधले जाते. बँका ग्राहकांना या कार्डद्वारे कर्जपुरवठा करतात. कार्डधारकाला जास्तीत जास्त किती रक्कम वापरता येईल ते ठरवून दिले जाते. त्या मर्यादेच्या आतील रक्कम ग्राहक उचल करु शकतो. क्रेडिट कार्ड स्वीकारणाऱ्या दुकानदारांकडून ग्राहक वस्तूंची खरेदी करु शकतो. ग्राहक क्रेडिट कार्डच्या साहाय्याने निरनिराळे व्यवहार करु शकतो. वेगळ्या शब्दांत क्रेडिट कार्डचा वापर चलनासारखा होतो म्हणूनच याला 'प्लॅस्टिक चलन' किंवा 'प्लॅस्टिक पैसा' असे म्हटले जाते.

५) डेबिट कार्ड-

डेबिट कार्ड म्हणजे 'नावेपत्र' किंवा 'नामेपत्र' होय. ''बँकेने ग्राहकांना त्यांच्या खात्यातील शिल्लक रक्कम काढण्यासाठी उपलब्ध करुन दिलेले कार्ड म्हणजे डेबिट कार्ड होय.'' बँकेच्या खातेदाराला या कार्डचा वापर करुन खात्यातील रक्कम काढता येते. बँकेच्या कोणत्याही शाखेतून या कार्डद्वारे रक्कम मिळविता येते. डेबिट कार्ड हे क्रेडिट कार्डसारखेच असते. तथापि, या दोहोंत फरक आहे. बँक क्रेडिट कार्डद्वारे खातेदाराला जी रक्कम देते त्याचे स्वरुप कर्जासारखे असते. डेबिट कार्डद्वारे खातेदाराला दिली जाणारी रक्कम मात्र खातेदाराच्या खात्यातील शिल्लक रक्कम असते. क्रेडिट कार्डधारकाला वापरलेल्या रकमेवर व्याज द्यावे लागते. तर डेबिट कार्डधारकाला व्याज भरण्याची गरज नसते.

डेबिट कार्डचा उपयोग खात्यातील पैसे काढणे आणि वस्तू व सेवांची खरेदी करणे या दोन्ही कारणांसाठी होतो. बऱ्याच बँका ए.टी.एम.सह डेबिट कार्ड देतात. हे कार्ड वापरण्याची कार्यपद्धती ए.टी.एम. कार्डसारखीच असते.

६) किसान क्रेडिट कार्ड-

भारतात सन १९९८-९९च्या अंदाजपत्रकीय भाषणात शेतकऱ्यांना 'किसान क्रेडिट कार्ड' देण्याबाबत नाबार्ड आदर्श योजना तयार करेल असे जाहीर करण्यात आले. त्यानुसार नाबार्डने विविध बँकांशी चर्चा करुन 'किसान क्रेडिट कार्ड योजना' तयार केली. ही योजना रिझर्व्ह बँकेमार्फत सर्व व्यापारी बँकांपर्यंत, तर नाबार्डमार्फत सर्व सहकारी बँकांपर्यंत पोहोचविण्यात आली. ऑगस्ट १९९८ पासून व्यापारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांनी किसान क्रेडिट कार्ड योजना सुरु केली.

किसान क्रेडिट कार्ड योजनेनुसार शेतकऱ्यांना क्रेडिट कार्ड आणि पासबुक किंवा क्रेडिट कार्डसह पासबुक देण्यात येते. त्यात लाभार्थीचे नाव, पत्ता, धारणक्षेत्र, कर्जाची मर्यादा, वैधता, कालावधी

इ.तपशील असतो. क्रेडिट कार्ड हे शेतकऱ्याचे ओळखपत्र असते. तसेच ते पासबुकही असते. शेतकऱ्यांना पुरेसा पतपुरवठा वेळेत करणे, त्यांना आदानांची खरेदी लवचिक पध्दतीने करण्यास मदत करणे, लागवडीविषयक गरजा भागविणे, शेतकऱ्यांचा निधी मिळविण्यासाठी खर्च कमी करणे इ. उद्देशांनी ही योजना राबविली जाते.

७) **प्रवासी चेक-**

व्यापारी बँका आपल्या ग्राहकांना प्रवासी धनादेश उपलब्ध करुन देतात. प्रवास करताना मोठी रक्कम बाळगणे धोक्याचे असते. यावर मात करण्यासाठी ग्राहक बँकेत रक्कम जमा करुन प्रवासी चेक प्राप्त करु शकतात. चेकसोबत बँका संबंधित ग्राहकाला ओळखपत्र देतात. त्यावर ग्राहकाची स्वाक्षरी असते. ओळखपत्रावरील नमुना स्वाक्षरीप्रमाणे सही करुन तो ग्राहक कोणत्याही बँकेत तो वटवू शकतो. बऱ्याचदा मोठे हॉटेल्स, पेट्रोल पंप येथेही हे चेक स्वीकारले जातात. रोख पैशाऐवजी असे चेक वापरले जातात. ग्राहकांकडून चलनी नोटांचा पर्याय म्हणून या चेकचा वापर केला जातो.

प्रवासी चेकचा सर्वप्रथम वापर १९७२ मध्ये लंडन क्रेडिट एक्सचेंज कंपनीने केला. त्यानंतर प्रवासी चेकचे साधन सर्वत्र लोकप्रिय झाले. विदेशात सुट्टीत प्रवास करताना मोठी रक्कम जवळ बाळगण्याचा धोका टाळण्यासाठी प्रवासी धनादेशाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असे. भारतातही अशा धनादेशांचा वापर वाढला आहे. तथापि, १९९०च्या दशकानंतर डेबिट कार्ड, क्रेडिट कार्डाचा वापर वाढल्याने प्रवासी चेकचे व्यावहारिक महत्त्व कमी झाले आहे.

❑ ❑

प्रवासी धनादेश विभिन्न चलनात उपलब्ध करुन दिले जात असते. उदा.अमेरिकन डॉलर, कॅनेडियन डॉलर, पौंड, येन इ.

८) **डीमॅट खाते-**

भारतात डिसेंबर, १९९६ पासून राष्ट्रीय रोखेबाजारात तर डिसेंबर, १९९७ पासून मुंबई रोखेबाजारात डीमॅट व्यवहार सुरु झाले. जानेवारी १९९९ पासून गुंतवणूकदारांना शेअर्स डीमॅट करुन घेणे अनिवार्य ठरविण्यात आले आहे. डीमॅट प्रक्रियेसाठी 'NSDL' (National Securities Depository Ltd.) आणि 'CSDL' (Central Depository Services Ltd.) या दोन संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. डीमॅट खाते कोणत्याही बँकेत किंवा वित्तीय संस्थेत उघडता येते. अर्थात, यासाठी पॅनकार्ड घेणे आवश्यक असते.

डीमॅट खात्याबाबत बँक दोन पासबुक देते. १) डीमॅट विनंती पुस्तक आणि २) व्यवहार सूचना पुस्तक. भागधारकाकडे कागदपत्रांच्या स्वरुपात भाग असतील तर ते डीमॅट विनंती पुस्तकाद्वारे विनंती करुन 'निक्षेपस्थान सहभागीदाराकडे' (DP Depositroy Participant) पाठवावे लागते. एखादी व्यक्ती जेव्हा भाग खरेदी करते, तेव्हा ब्रोकरला भागाची किंमत प्राप्त झाल्यानंतर डीमॅट खात्यावर भाग जमा केले जातात.

अशाप्रकारे इ-बँकिंग, MICR निरसन, ए.टी.एम., क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, किसान क्रेडिट कार्ड, प्रवासी चेक, डीमॅट खाते इ.साधनांची माहिती दिली. या साधनांचा वापर कसा करावा याची माहिती आम्हांला अर्थशास्त्र या विषयांतर्गत मिळाली.

❑ ❑





# सौ.मंगलताई व रामचंद्र जगताप या उभयतांची प्रकट मुलाखत

कु.मनिषा घाडगे
बी.ए.भाग-३

सौ.मंगलताई रामचंद्र जगताप व श्री.रामचंद्र ज्ञानदेव जगताप या उभयतांची प्रकट मुलाखत घेताना आम्हां सर्व प्राध्यापकांना, शिक्षकेतर सेवकांना आणि विद्यार्थिनींना मनस्वी आनंद होत आहे. सौ.मंगलताई या आदर्श पत्नी, आदर्श माता आणि आदर्श शिक्षीका म्हणून रयत सेवकांना परिचित आहेत. ताईंना सामान्य वर्गाबद्दल प्रेम आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वसा पुढे चालू ठेवणाऱ्या आणि आपल्या नोकरीचे येणारे संपूर्ण मानधन रयतेच्या विद्यार्थ्यांना खर्ची करणाऱ्या एकमेव शिक्षीका आहेत.

श्री.रामचंद्र ज्ञानदेव जगताप हे देखील कर्मवीरांच्या विचाराने भारावून गेलेले एक आदर्श शिक्षक, आदर्श मुख्याध्यापक आणि आदर्श समाजसेवक या नावांनी ओळखले जाणारे महान व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचे नाव घेता येईल. सामान्य वर्गामध्ये जन्माला येऊन देखील गरीब, अस्पृश्य या वर्गाबद्दल प्रेम असणारा आणि संस्थेने टाकलेल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडणारा एक आदर्श रयत सेवक आहे. सरांनी प्रथम माध्यमिक शिक्षक म्हणून नोकरी स्वीकारली. नंतर मुख्याध्यापक आणि त्यानंतर रयत शिक्षण संस्थेच्या मध्यविभाग, दक्षिणविभाग येथे त्यांना 'इन्स्पेक्टर' म्हणून अनेक वर्षे अत्यंत प्रामाणिकपणे काम पाहिले. पुढे रयत सेवक को.बँक लि.सातारा या बँकेचे चेअरमन म्हणून काम केले.

'सर' आणि 'ताई' हे दोघेही पति-पत्नी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचाराने व



आशिर्वादाने एक आदर्श कुटुंब ठरले. रयत मधील प्रत्येक मुलांच्यावर त्यांचे प्रेम आहे. बहुजन वर्गातील मुले-मुली शिकली पाहिजेत; ती स्व-कर्तृत्वावर उभी राहून रयत शिक्षण संस्थेचे नाव भारतभर केले पाहिजे असे या दोघांचेही स्वप्न आहे. या ध्येयातूनच त्यांनी ग्रामीण भागातील महिला महाविद्यालय, उंब्रज या शाखेला रु.२० लाख देऊन मुलींच्या उच्च शिक्षणाचा प्रश्न कायम स्वरुपी सोडविला. अशा या महान त्यागी पति-पत्नीची मुलाखत....

- ताईसाहेब आपले पूर्ण नाव ?
  सौ.मंगलताई रामचंद्र जगताप
- आपली शैक्षणिक पात्रता ?
  बी.ए.बी.टी.
- आपले मूळगाव कोणते ?
  कोल्हापूर जिल्ह्यातील रुकडी
- आपल्या वडिलांचे नाव ?
  डॉ.गोविंदराव बाळाजीराव पवार

- ताईसाहेब आपल्या वडिलांचे शिक्षण ?

एस.टी.बी.एस.

- आपल्या आईचे नाव ?

सौ.सोनुबाई गोविंदराव पवार

- आईचे शिक्षण त्या काळात किती झाले ?

जुनी मॅट्रिक

- ताईसाहेब आपणास एकूण किती भावंडे आहेत ?

पाच भाऊ व दोन बहिणी

- ताईसाहेब आपण प्रथम नोकरी कोठे केली ?

रयत शिक्षण संस्थेचे महात्मा गांधी विद्यालय, रुकडी जि.कोल्हापूर

- रयत संस्थेच्या विद्यालयात काम करताना तुम्हाला प्रथम काय वाटले ?

रयत संस्था बहुजन वर्गाची संस्था आहे. अनेक जाती-धर्मांचे विद्यार्थी अनेक विद्यालयामध्ये शिक्षण या विद्यार्थ्यांना शिकवताना खूप मोठा आनंद होतो.

- ताईसाहेब रयत शिक्षण संस्थेबद्दल तुम्हांला काय वाटते ?

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या त्यागातून ही संस्था उभी आहे. अनेक जाती धर्मांचे शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी यांच्या समवेत काम करताना खूप मोठी प्रेरणा व उत्साह वाटतो. संस्थेची धोरणे व विकास हा इतर संस्थेत पहावयास मिळत नाही. 'कमवा व शिकवा' या योजनेचे महाराष्ट्रात इतर संस्था व विद्यापीठांनी केले आहे.

- ताईसाहेब आपला विवाह किती साली झाला ?

सन १९५८

- आपला विवाह जुन्या पध्दतीने की, नवीन पध्दतीने ?

माझा विवाह त्या काळात जुन्या रुढी-परंपरेने झाला. डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी हा विवाह घडवून आणला. यामध्ये श्री.एम.एस.निकम यांचाही महत्त्वपूर्ण वाटा आहे.

- ताईसाहेब आपली मुले व त्यांचे शिक्षण ?

मला एकूण ४ मुले पहिला-डॉ.रणजित, एम.एस., एम.सी.एच., दुसरा-श्री.विवेक, ॲटोमोबाईल इंजिनिअर तीन-उर्मिला, एम.ए.इंग्रजी व एम.एम.मराठी, चार-डॉ.वैजयंती, बी.ए.एम.एस.

- ताईसाहेब आपणास जगताप साहेबांचे सहकार्य लाभते का ?

होय, निश्चितच. मला प्रत्येक क्षेत्रात त्यांचे सहकार्य लाभते. मुलांच्या शिक्षणाचे प्रश्न असो, सामाजिक प्रश्न असो, शैक्षणिक प्रश्न असो अगर कुटुंबाचे प्रश्न असो ते या सर्व कामामध्ये सक्रिय सहभाग दाखवतात त्यांच्या भक्कम पाठिंब्यामुळेच मी जीवनात यशस्वी झाले.

- जगताप साहेब आपले पूर्ण नाव ?

रामचंद्र ज्ञानदेव जगताप





- आपली शैक्षणिक पात्रता ?

बी.ए., बी.टी., एम.एड., बी.पी.एड.

- जगताप साहेब आपल्या गावामध्ये तुमच्या इतके कोण शिकले आहे का ?

मीच आमच्या घरामध्ये, गावामध्ये प्रथम शिकलो. गाव शेतीप्रधान असल्यामुळे शिक्षण त्या काळात कोणाचेच झाले नाही. अनेकांना शिक्षण घेण्याची इच्छा असून देखील गरिबीमुळे शिकता आले नाही. याची खंत आजही माझ्या मनाला आहे.

- जगताप साहेब आपले आई-वडिल आपल्या लहानपणीच देवाघरी गेले. परंतु तुमचे शिक्षण पुढे कोणी केले ?

माझे पुढील संपूर्ण शिक्षण माझे काका आबा रामा जगताप व मावशी अनुसया आबा जगताप या दोघांनी माझे शिक्षण पूर्ण केलेच पण त्याबरोबर त्यांनी सामाजिक, कौटुंबिक व शैक्षणिक जाणिवही करुन दिली. शिक्षणाचे खरे धडे या उभयतांच्याकडून मिळाले. तेच माझे खरे आई-वडील आहेत.

- जगताप साहेब आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कोठे झाले ?

प्राथमिक शिक्षण औंध संस्थेत 'कोडोली' येथे व माध्यमिक शिक्षण टिळक हायस्कूल, कराड व उच्च शिक्षण पुणे येथे झाले.

- जगताप साहेब आपण शिक्षक क्षेत्राकडे कसे काय वळलात ?

सन १९५४ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील ससून हॉस्पीटलमध्ये ॲडमिट होते त्यावेळी मी बोर्डींगमध्ये राहात होतो. त्यांची सेवा करण्यासाठी आम्ही बोर्डींग मधील मुले आळीपाळीने जात होतो. तेव्हा आण्णांच्या इच्छेने मी 'शिक्षक' या क्षेत्राकडे वळलो.

- जगताप साहेब आपणास शिक्षणा व्यतिरिक्त कोणकोणत्या क्षेत्रात आवड आहे ?

मला लहानपणापासून विविध खेळांची आवड आहे. यामध्ये कुस्ती, कब्बडी माझा आवडीचा खेळ. तसेच 'लग्न जुळविणे' हे सामाजिक कार्य आजही करीत आहे. तसेच 'शेती' आधुनिक पध्दतीने करणे इत्यादी क्षेत्रांची आवड आहे.

- जगताप साहेब आपणास शिक्षण क्षेत्रातील पुरस्कार मिळाला आहे का ?

होय. महाराष्ट्र राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार, रयत शिक्षण संस्थेचा डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार आणि कै.रा.तू.भोईटे स्मृति आरोग्य प्रतिष्ठान, बारामती यांचा राजमान्य राजश्री सखल गुणाले सदा यशवंत ज्येष्ठ व आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

- जगताप साहेब आपण लेखन केले आहे का ?

होय. मी अनेक मासिकामधून कविता, विविध विषयांवरचे लेख लिहिले आहेत. पण पुस्तकरुपाने प्रसिध्द केले नाहीत. याची खंत अजूनही मनाला आहे.

- जगताप साहेब आपले शैक्षणिक गुरु कोण ?

माझे शैक्षणिक गुरु प्रथम डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील व दुसरे माझे मामा श्री.पांडुरंग बापू माने.

- जगताप साहेब आपण 'नोकरी' आणि 'समाजकार्य' करीत असताना कौटुंबिक सहकार्य मिळते का ?

होय. माझ्या या एकूणच वाटचालीमध्ये सौभाग्यवतींचा मोठा वाटा आहे. त्या प्रत्येक गोष्टीची आठवण

करुन देतात पण त्याबरोबर सामाजिक कार्यातही मला त्यांचे सहकार्य मिळते.

- जगताप साहेब आपल्या घरांमध्ये पिढीजात व्यवसाय कोणता ?
आमचा पिढीजात व्यवसाय 'शेती' हाच आहे. आजोबा-पणजोबा पासून ते आजअखेर 'शेती' हा व्यवसाय आहे.

- जगताप साहेब आपल्या मुलांनी पुढे काय करावे असे तुम्हांला वाटते ?
नोकरी/व्यवसाय याबरोबरच समाजकार्यही करावे. आज माझा मोठा मुलगा डॉ.रणजित वैद्यकीय क्षेत्रात पुणे शहरामध्ये मोठा नावलौकिक मिळवलेला आहे. तो गरीब कुटुंबांची मोफत तपासणी करुन औषधेही देतो. तसेच बाबा आमटे यांचा 'आनंदवन' व 'हेमलकसा' या दोन ठिकाणी आपल्या वैद्यकीय टीमसह जाऊन आदिवासी रुग्णांची मोफत तपासणी करतात व माझा दुसरा मुलगा विवेक ॲटोमोबाईल इंजिनिअर असून त्याचे कराड येथे वर्कशॉप आहे. तो आर.टी.ओ.च्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन करतो. या माझ्या दोन्ही मुलांचा अभिमान वाटतो.

- जगताप साहेब आपण उंब्रज येथील महिला महाविद्यालयाला नाव द्यायचे कसे ठरविले ?
सौ.लक्ष्मीबाई पाटील व डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील या उभयतांनी बहुजन समाजातील मुला-मुलींच्यासाठी आयुष्यभर त्याग केला. हे माझ्या व सौभाग्यवतीच्या ध्यानी होते. आपणही त्यांच्या या त्यागामध्ये सहभागी व्हावे अशी मनस्वी इच्छा होती. या हेतूनेच आम्ही नाव देण्याचे ठरविले. बहुजन समाजाच्या मुला-मुलींनी शिकावे त्यांचे शिक्षण पैशाअभावी थांबू नये म्हणून आम्ही या महिला महाविद्यालयास मोठे आर्थिक सहकार्य करुन संस्थेच्या परवानगीने नाव देण्याचे ठरविले.

- जगताप साहेब या महाविद्यालया संदर्भात आपल्या अपेक्षा कोणत्या आहेत ?
हे महाविद्यालय फक्त 'कला' शाखेचे आहे. परंतु पुढे कॉमर्स, सायन्स याही शाखा निघाव्यात. तसेच मुलींच्यासाठी निरनिराळे कोर्सेस, M.P.S.C., U.P.S.C. याचे मार्गदर्शनपर वर्ग चालू आहेत, पुढे त्याचा विस्तार व्हावा व कोर्सेस सवलतीच्या दरात मिळावेत अशी आमची अपेक्षा आहे. तसेच क्रीडा क्षेत्रही सुविधांनी बनावे. यासाठी जास्तीत जास्त सहकार्य करावे.

जगताप साहेब आपण दोघा उभयतांनी जी आम्हांस मुलाखतीद्वारे जी माहिती दिली त्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने आम्ही आपले मनापासून आभारी आहोत !

❑ ❑ ❑ ❑





## || कार्यक्रम त्रिविधा ||



ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



सामाजिक शास्त्रांचे उद्घाटन प्रसंगी प्रा.डॉ.शर्मा यांचे स्वागत करताना प्रा.यादव, प्रा.डॉ.पाटील, प्रा.डॉ.साळुंखे व प्रा.निर्मळे



२ ऑक्टोबर गांधी जयंती निमित्त "स्वच्छ भारत, स्वस्थ भारत" अभियाना अंतर्गत प्राध्यापकांना शपथ देताना प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



भूगोल विभागातर्फे वृक्ष संवर्धन कार्यक्रमात वृक्षांना राखी बांधून कर्तव्य पार पाडताना प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे व प्राध्यापक वर्ग



पद्मश्री डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जयंती निमित्त प्रतिमा पूजन करताना प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



भित्तीपत्रकातील साहित्याची विद्यार्थिनींना माहिती देताना डॉ.अभय पाटील व प्रा.मारुती तांबे

## ।। कलादालन ।।


तेजस्वी पवार बी.ए.भाग १


स्नेहा चव्हाण बी.ए.भाग २


स्नेहा चव्हाण बी.ए.भाग २


स्नेहा चव्हाण बी.ए.भाग २


रोहिणी जाधव बी.ए.भाग २


रोहिणी जाधव बी.ए.भाग २



## ।। महाविद्यालय परिवार ।।


मा.प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे साहेब यांच्या समवेत 'त्रिवेणी' नियतकालिक विभागीय संपादक मंडळ


मा.प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे साहेब यांच्या समवेत वरिष्ठ महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्ग


मा.प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे साहेब यांच्या समवेत शॉर्ट टर्म कोर्सचे अध्यापक वर्ग


मा.प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे साहेब यांच्या समवेत महाविद्यालयाचा शिक्षकेतर सेवक वर्ग

## || सांस्कृतिक विभाग : मनोरंजन ||



'माझ्या डोळ्यातील काजळ ग' नृत्य सादर करताना कु.काजल व कु.धनश्री



'राधा नाचेंगी' कॉकटेल नृत्य सादर करताना कु.मिनाक्षी व कु.प्रियांका



'आयो रे मारो ढोलना' नृत्य सादर करताना कु.सविता म्हेत्रे



'शाळेतील गंमती जंमती' हास्य नाटिका सादर करताना बी.ए.भाग १ च्या विद्यार्थिनींनी



'दुनियादारी' नृत्य सादर करताना इंग्रजी विभागाच्या विद्यार्थिनींनी



'लावणी' सादर करताना कु.आरती कुडाळकर

रयत शिक्षण संस्थेचे
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज

## || कार्यक्रम विविधा ||



ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



सामाजिक शास्त्रांचे उद्घाटन प्रसंगी प्रा.डॉ.[illegible] करताना प्रा.यादव, प्रा.डॉ.पाटील, प्रा.डॉ.[illegible] व प्रा.[illegible]



२ ऑक्टोबर गांधी जयंती निमित्त ''स्वच्छ भारत, स्वस्थ भारत'' अभियाना अंतर्गत प्राध्यापकांना शपथ देताना प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



भूगोल विभागातर्फे वृक्ष संवर्धन कार्यक्रमात वृक्षांना राखी बांधून कर्तव्य पार पाडताना प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे व प्राध्यापक वर्ग



पद्मश्री डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जयंती निमित्त प्रतिमा पूजन करताना प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



भितीपत्रकातील साहित्याची विद्यार्थिनींना माहिती देताना डॉ.अभय पाटील व प्रा.मारूती तांबे

## || सांस्कृतिक विभाग : मनोरंजन ||



'माझ्या डोळ्यातील काजळ ग' नृत्य सादर करताना कु.काजल व कु.धनश्री



'राधा नाचेंगी' कॉकटेल नृत्य सादर करताना कु.मिनाक्षी व कु.प्रियांका



'आयो रे मारो ढोलना' नृत्य सादर करताना कु.सविता म्हेत्रे



'शाळेतील गंमती जंमती' हास्य नाटिका सादर करताना बी.ए.भाग १ च्या विद्यार्थिनी



'दुनियादारी' नृत्य सादर करताना इंग्रजी विभागाच्या विद्यार्थिनी



'लावणी' सादर करताना कु.आरती कुडाळकर

# अहवाल विभाग


- वार्षिक वैयक्तिक अहवाल — १०४
- विभागीय समिती अहवाल सन २०१४-२०१५
  - १) सांस्कृतिक विभाग — ११४
  - २) लैंगिक छळ प्रतिबंधक समिती — ११५
  - ३) शॉर्ट टर्म कोर्सेस समिती — ११५
  - ४) तक्रार निवारण समिती — ११५
  - ५) प्रवेश समिती — ११६
  - ६) ॲकॅडमीक कॅलेंडर व टाईम टेबल, रोल कॉल कमिटी — ११६
  - ७) परीक्षा विभाग समिती — ११७
  - ८) स्टाफ वेलफेअर कमिटी — ११७
  - ९) शिस्त समिती — ११८
  - १०) जिमखाना विभाग — ११८
  - ११) विद्यार्थी कल्याण मंडळ — ११८
  - १२) कमवा व शिका योजना — ११९
  - १३) स्टाफ ॲकेडमी कमिटी — ११९
  - १४) स्पर्धा परिक्षा व करिअर मार्गदर्शन — १२०
  - १५) प्रत्यार्भरण समिती — १२०
  - १६) ग्रंथालय विभाग — १२१
  - १७) राष्ट्रीय सेवा योजना — १२१
  - १८) अग्रणी महाविद्यालय योजना — १२२
  - १९) UGC Committee — १२३
  - २०) IQAC Committee — १२३
- आम्ही सहकारी.... — १२४


विभागीय संपादक

**प्रा.श्रीमती मनिषा माळी**

४) शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद - ११वे अधिवेशन - पेपर वाचन 'आगाशिव बौध्द लेणी' दि. १४ व १५ जानेवारी २०१४.

५) शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद - ११वे अधिवेशन - पेपर वाचन सत्राध्यक्ष - आधुनिक विभाग - १५ जानेवारी २०१४.

६) शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद - 'कार्यकारिणीवर निवड-सातारा जिल्हा, १५ जानेवारी २०१४.

७) शिवाजी विद्यापीठ बी.ए. भाग २ पेपर सेटिंग कामकाज-जागतिक क्रांत्या भाग १ व २ फेब्रुवारी २०१४

८) शिवाजी विद्यापीठ-बी.ए. भाग २ पेपर सेटिंग कामकाज-आय.डी.एस. भाग १ व २ फेब्रुवारी २०१४

९) शिवाजी विद्यापीठ परीक्षा सिनीअर सुपरव्हिजन कामकाज सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज मार्च २०१४

१०) शिवाजी विद्यापीठ परीक्षा सिनीअर सुपरव्हिजन बहिस्थ कामकाज शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड मार्च २०१४

११) शिवाजी विद्यापीठ दूर शिक्षण विभाग बैठक, मराठी सत्तेचा उदय-सहलेखन कामकाज एप्रिल २०१४

१२) शिवाजी विद्यापीठ दूर शिक्षण विभाग बी.ए. भाग २ आणि एम.ए. भाग २ सहलेखन कामकाज. फ्रेंच राज्यक्रांती व चीनची राज्यक्रांती बी.ए. भाग २/एम.ए.भाग २ जागतिक तत्ववेत्ते व आधुनिक भारताचा आर्थिक इतिहास जून २०१४

१३) आर्ट्स व कॉमर्स कॉलेज नागठाणे कार्यशाळा सुधारीत अभ्यासक्रम- बी.ए. भाग २ ऑगस्ट २०१४

१४) ज्ञानप्रबोधिनी एज्युकेशन तासवडे सन्मानपत्र ५ सप्टेंबर २०१४

१५) नॅशनल सेमीनार-बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण-पेपरवाचन : पेशवेकालीन सामाजिक परीस्थिती (गावगाडा) दि. ७ सप्टेंबर २०१४

१६) गांधी जयंती प्रमुख मार्गदर्शक : डी.पी. भोसले कॉलेज, कोरेगांव २ ऑक्टोबर २०१४

१७) शिवाजी विद्यापीठ बी.ए.भाग २ पेपर सेटिंग कामकाज-जागतिक क्रांत्या भाग १ व २ ऑक्टोबर २०१४

१८) शिवाजी विद्यापीठ परीक्षा-सिनीअर सुपरव्हिजन बहिस्थ कामकाज-कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु॥ दि २८ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर २०१४

१९) बी.ए. भाग ३ कॅप सेंटर-स.गा.म. कॉलेज, कराड नोव्हेंबर २०१४

२०) बी.ए.भाग ३ बी.ओ.एस.सब कमिटी शिवाजी विद्यापीठ अभ्यासक्रम तयार करणे दि. ५ व ६ जाने.२०१५

२१) अग्रणी महाविद्यालय योजना 'तज्ञ मार्गदर्शक' म्हणून वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड-शिवछत्रपतींचे युध्दनिती दि. १२ जानेवारी २०१५

२२) शिवाजी विद्यापीठ एल.आय.सी. कमिटी-श्रीमती बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव दि. १६ जानेवारी २०१५

२३) बी.ए. भाग ३ बी.ओ.एस. सब कमिटी शिवाजी विद्यापीठ-अभ्यासक्रम तयार करणे दि. २७ व २८ जानेवारी २०१५





२४) नॅशनल सेमिनार : स.गा.म. कॉलेज, कराड-पेपर वाचन : स्वातंत्र्य चळवळीतील कराडचे योगदान-सत्राध्यक्ष-आधुनिक विभाग दि. ३० व ३१ जानेवारी २०१५

२५) राज्यस्तरीय कार्यशाळा-ए.एस.सी. कॉलेज,कासेगांव, सत्राध्यक्ष-आधुनिक विभाग दि. ३फेब्रुवारी २०१५

२६) शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद-२०वे अधिवेशन-सत्राध्यक्ष आधुनिक विभाग दि.१४ व १५ फेब्रु.२०१५ प्रा.डॉ.एन.डी. पाटील कॉलेज मलकापूर, ता. शाहूवाडी.

२७) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर एम.फिल. मार्गदर्शक म्हणून शिवाजी विद्यापीठांमार्फत निवड.

❑ ❑ ❑

**प्रा.रामचंद्र यादव**
**समाजशास्त्र विभाग**



१) सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज स्थानिक व्यवस्थापन समितीचा सदस्य शिक्षकांचा प्रतिनिधी बिनविरोध नियुक्ती.

२) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर बी.ए. भाग तीन समाजशास्त्र या विषयाचा पेपर सेटर म्हणून नियुक्ती.

३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर बी.ए.भाग तीन समाजशास्त्र पेपर नं. ११ व १६ आदिवासी समाजशास्त्र अभ्यासक्रम कसा असावा यासाठी सदस्य म्हणून नियुक्ती.

४) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर सेमिस्टर १ ते ६ पर्यंत बहिस्थ पर्यवेक्षक म्हणून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर परीक्षा विभागामार्फत नियुक्ती. (बापूजी साळुंखे कला व वाणिज्य महाविद्यालय, कराड)

५) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर बी.ए.भाग एक ते एम.ए.सेमीस्टर एक ते सहा पर्यंत पेपर तपासणी व मॉडरेशन म्हणून शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागातून नियुक्ती.

६) सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज वसतीगृहासाठी, महाविद्यालय मदतीसाठी सतत देणगी संकलनासाठी आघाडीवर.

७) सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय उंब्रजच्या विविध कमिटीचा चेअरमन-सदस्य-प्रवेश कमिटी, परीक्षा कमिटी, अॅकॅडमीक कॅलेंडर, टाईम टेबल, रोल कॉल लिस्ट चेअरमन.

८) राष्ट्रीय, राज्यस्तरीय समाजशास्त्र, इतिहास विषयाचे सेमिनार समाजशास्त्र बी.ए.भाग २ च्या अभ्यासक्रमाचे कार्यशाळेत उपस्थिती.

९) एल.बी.एस. कॉलेज, सातारा येथे ऑगस्ट २०१४ रोजी बी.ए.भाग एक, दोन व तीनच्या परीक्षेस येणाऱ्या अडचणी संदर्भात सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयाचे परीक्षा विभाग व एक शिक्षकेतर सेवक यांची कार्यशाळेला उपस्थिती.

१०) नॅशनल सेमिनार, एस.जी.एम. कॉलेज कराड येथे दिनांक ३०, ३१ जानेवारी २०१५ रोजी ''स्त्रीयांचे प्रश्न व उपाय'' या चर्चासत्रात सक्रिय सहभाग.

११) दिनांक ५-२-२०१५ रोजी वर्ये सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील एम.बी.ए. कॉलेज सातारा येथील राज्यस्तरीय चर्चासत्रात सक्रिय सहभाग.

❑ ❑ ❑

**प्रा.दिनेश पाटील**

शारिरीक शिक्षण विभाग



१) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर पुरस्कृत दि.७ ऑगस्ट २०१४ रोजी यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स विद्यानगर कराड येथे 'खेळाडूंची पात्रता प्रमाणापत्र व खोखो खेळातील बदललेले नियम' कार्यशाळेत सहभाग.

२) यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा येथे दि.२२ व २३ ऑगस्ट २०१४ रोजी झालेल्या 'रिसेंट ट्रेन्डस् इन फिजिकल एज्युकेशन अँण्ड स्पोर्टस्' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेत सहभाग.

३) रयत शिक्षण संस्था साताऱ्याच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत घेण्यात येणाऱ्या प्रश्नमंजुषा स्पर्धेसाठी क्रीडा प्रश्नसंच तयार करणेस दि.११ नोव्हेंबर २०१४ रोजी मध्यविभाग कार्यालय सातारा येथे उपस्थित राहून प्रश्नसंच तयार केले.

४) यशोदा शिक्षण संस्था सातारा संचलित लोकनेते सुबराव कदम ज्युनि. कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स, सायन्स सातारा येथे दि.२ डिसें. २०१४ रोजी 'क्रीडा सप्ताह उद्घाटनास' प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती.

५) कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दि.१ जानेवारी २०१५ रोजी आयोजित केलेल्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत छात्रसभेत (सातारा जिल्हा) सहभाग घेतला.

❑ ❑ ❑

**प्रा.डॉ.तानाजी पाटील**

मराठी विभाग



१) भारतीय कला अकादमी मार्फत सांगली जिल्ह्यातील पुरुषांसाठी विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून काम पाहिले. दि.२ ऑगस्ट २०१४

२) आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेज, कासेगाव मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आयोजित एक दिवसीय महाविद्यालयीन शिक्षक प्रशिक्षण शिबीरमध्ये सहभाग. दि.२७ ऑगस्ट २०१४

३) दिनांक २० जुलै २०१४ रोजी आधार सोशल रिसर्च अँण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती व संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वडगाव जि.अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने इंटरनॅशनल जनरल अंकामध्ये 'युगप्रवर्तक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक कार्य' या विषयावर पेपर प्रसिध्द.

४) दिनांक २३ जाने.२०१४ रोजी श्री.शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर येथे नॅशनल सेमीनारमध्ये 'आदिवासी साहित्य व संस्कृती' या विषयावर पेपर वाचन.

५) दिनांक २० जानेवारी २०१४ रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व मराठी विभागाने आयोजित केलेल्या 'पीएच.डी., एम.फिल्. मार्गदर्शक कार्यशाळेत सहभाग.





६) दिनांक १३ सप्टेंबर २०१४ रोजी श्रीमती प्रभुबाई गरवारे कला महाविद्यालय सांगली व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने बी.ए.भाग-२ (अभ्यासपत्रिका क्र-४ आणि ६ पद्य आणि संपादन प्रक्रिया) या बदललेल्या अभ्यासक्रमावर आधारित एक दिवसीय चर्चासत्रात सहभाग.

७) दिनांक २७ डिसेंबर २०१४ रोजी आधार सोशल रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्स्टिटयुट, अमरावती व जी.एस.टोंपे आर्टस्, कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज, चंदूर बजार यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल कॉन्फरन्समध्ये 'लोकसंस्कृती जपणारा-महाराष्ट्रातील भटका धनगर समाज' या विषयावर पेपर प्रसिध्द.

८) 'डोंगरापल्याड : स्वरुप आणि समीक्षा' या ग्रंथाचे 'सुंबरान' ओवीगीताचे स्वरुप या विषयावर समीक्षात्मक लेखन. दिनांक ६ डिसेंबर २०१४

९) दिनांक १ जून २०१४ रोजी 'धनगरी ओवीगीतांचा चिकित्सक अभ्यास' हा समीक्षात्मक ग्रंथ प्रकाशित.

१०) महात्मा ज्योतिबा फुले कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भातकुली जि.अमरावती व आधार सोशल रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती येथे एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत 'संत रामदास यांचे वाङ्मयीन कार्य' या विषयावर पेपर प्रसिध्द.

११) मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगाव व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय चर्चासत्रात ''आत्मचरित्रातील स्त्री'' या विषयावर पेपर वाचन.

१२) सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज 'स्थानिक व्यवस्थापन समितीचा' सदस्य म्हणून बिनविरोध निवड.

❑ ❑ ❑

**प्रा.लालासाहेब पवार**

अर्थशास्त्र विभाग



१) रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी, सातारा मार्फत आयोजित दि. ७ व ८ मे रोजीच्या शैक्षणिक चर्चासत्रात सहभाग. ठिकाण-डी.जी. कॉलेज, सातारा

२) कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगांव येथे झालेल्या दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्रात 'Role of FDI in Economic Development of India' शोधनिबंध वाचन व राष्ट्रीय जरनलमध्ये प्रसिध्द.

३) आण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर येथे झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात 'Green revolution in India' शोधनिबंध वाचन व आंतरराष्ट्रीय जरनलमध्ये प्रसिध्द.

